

# शिवाजी कोण होता?

गोविंद पानसरे

MR 891.46
P 195 S



"जनतेच्या सच्च्या पुढाऱ्यांजवळ जी देशातील सर्वोत्कृष्ट व्यक्तींना आपल्याकडे आकर्षित करण्याची शक्ती असते ती शिवाजीजवळ मोठ्या प्रमाणात होती. अशी शक्ती लुटारूंकडे वा धर्मवेड्या पुढाऱ्यांजवळ नसते. वर्ग, जात, पंथ आणि वर्ण यांना दूर सारून समाजातील सर्व सर्वोत्कृष्ट माणसे शिवाजीभोवती गोळा असत. कारण समाजाच्या आशा-आकांक्षांचे अगदी उत्कट स्वरूपामध्ये शिवाजी प्रतिनिधित्व करीत होता."

**न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, राईज ऑफ मराठा पॉवर**

"शिवाजीच्या स्वराज्यात प्रथम राज्यव्यवहाराचा प्रत्यक्ष अनुभव राष्ट्रास मिळू लागला. परंतु त्यास विद्येची जोड नसल्यामुळे राष्ट्राचे बौद्धिक दैन्य कायम राहिले. प्रत्यक्ष अनुभवाने राष्ट्राची एक बाजू जोरात आली. अगदी अप्रसिद्ध आणि हीन स्थितीस असलेले लोक भराभर पराक्रम गाजवू लागले. भिक्षुकांचे मुत्सदी झाले, शेतकऱ्यांचे सेनापती व जागीरदार झाले. कारकुनांचे अंमलदार बनले. त्यास शास्त्रीय विद्येची जोड असती तर राष्ट्राचा भावी इतिहास निराळा बनला असता."

**रियासतकार गो. स. सरदेसाई, शककर्ता शिवाजी**

"वडील मुलगा दारा हा बापाचा संकल्पित युवराज असतानाही औरंगजेबाच्या ढोंगी कुटिलतेपुढे टिकाव धरू शकला नाही, ही ऐतिहासिक घटना या देशास फारच मारक ठरली. त्यामुळे या अफाट देशाचे एकीकरण एकाच राजवटीखाली होऊन हा देश बळकट होण्याचा संभव निर्माण झाला होता, तो नष्ट झाला. हिंदू-मुसलमान प्रश्न योग्य रीतीने मार्गावर असता, तो मोका जाऊन एका धर्मयुद्धाची जबाबदारी येथील लोकांवर कोसळली. मुसलमान राज्यकर्त्यांकडून हा प्रश्न सुटत नाही असे झाले तेव्हा एका हिंदू राजाला स्वतःच्या मतीने सोडविण्याची बुद्धी झाली. हा पुरुष शककर्ता शिवाजी होय."

**प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, श्रीशिवछत्रपती**

"जनतेच्या ध्यासातील आदर्श राजा शिवाजीच्या रूपाने अवतरला. शिवाजीने तडकाफडकी जुनी वतने खालसा केली. जुन्या करपद्धती रद्द केल्या. भूदासांवरील अमर्याद हुकूमत नष्ट केली आणि जमीन महसुलाचे मक्ते द्यायची पद्धत बंद केली. प्रत्येकाला कसायला जमीन, कुळाला स्थिरता, प्रत्यक्ष पैदा केलेल्या पिकावरच कर आकारणी, शेतकऱ्याच्या उत्पन्नावर वतनदाराचा हक्क नाही, या शिवाजीच्या आर्थिक सुधारणा होत."

**कॉ. श्रीपाद अमृत डांगे, बारा भाषणे**

# शिवाजी कोण होता?

गोविंद पानसरे

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

दर्ज
Entered

लोकवाङ्मय गृह

शिवाजी कोण होता?
गोविंद पानसरे

MR
891.46
P 195 S

म / १०२६
© गोविंद पानसरे

124298
31.3.08

मुखपृष्ठ / कमल शेडगे

मूल्य / २० रुपये

ISBN 81-86995-39-0

पहिली आवृत्ती : एप्रिल १९८८ ३००० प्रती
दुसरी आवृत्ती : मे १९८८ ३००० प्रती
तिसरी आवृत्ती : सप्टेंबर १९८८ ५००० प्रती

**पुनर्मुद्रण**

| | |
|---|---|
| ऑगस्ट १९८९ | ५००० प्रती |
| फेब्रुवारी १९९० | ५००० प्रती |
| ऑक्टोबर १९९० | १००० प्रती |
| फेब्रुवारी १९९१ | ५००० प्रती |
| १९९३ | ५००० प्रती |
| जून १९९५ | २००० प्रती |
| फेब्रुवारी १९९६ | ३००० प्रती |
| जून १९९८ | ३००० प्रती |
| जून १९९९ | ३००० प्रती |
| ऑक्टोबर २००० | ३००० प्रती |
| एप्रिल २००१ | २००० प्रती |
| एप्रिल २००२ | ३००० प्रती |
| मार्च २००३ | ३००० प्रती |
| ऑक्टोबर २००३ | ५००० प्रती |
| नोव्हेंबर २००४ | ५००० प्रती |
| जानेवारी २००६ | ५००० प्रती |
| जानेवारी २००७ | ५००० प्रती |
| नोव्हेंबर २००७ | ३००० प्रती |

**पुस्तके मिळण्याची ठिकाणे**

**लोकवाङ्मय गृह**
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

५६२, सदाशिव पेठ
चित्रशाळा प्रकल्प, पुणे - ४११ ०३०

६३५, सी वॉर्ड, बिंदू चौक
कोल्हापूर - ४१६ ००२

**पिपल्स बुक हाऊस**
मेहर हाऊस
१५, कावसजी पटेल स्ट्रीट
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

**समाजवादी प्रबोधिनी**
इंडस्ट्रीयल इस्टेट, इचलकरंजी

**म. फुले समता प्रतिष्ठान**
८३२, ई, शाहुपुरी, कोल्हापूर

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भ
८५, सयानी रो
मुंबई - ४०० ०

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
श गुप्ता भवन
, सयानी रोड
देवी
- ४०० ०२५

Library IIAS, Shimla
MR 891.46 P 195 S
00124298

JUSTICE P. B. SAWANT

HIGH COURT
सत्यमेव जयते
AT BOMBAY

Tel { Res 223695
{ Off 272152

Sarang, Flat No. 14
General Jagannath Bhosale Marg
Bombay 400 021

२८ मे १९८८

प्रिय गोविंदराव,

आपले 'शिवाजी कोण होता' हे पुस्तक वाचले. हे पुस्तक लिहून आपण पुरोगामी महाराष्ट्रावर व समाजावर फार मोठे उपकार केले आहेत. या पुस्तकाचा प्रसार सर्वत्र झाला पाहिजे. विशेषतः धार्मिकांच्या जाळ्यात अडकलेल्या तरुणांपर्यंत ते पोचले पाहिजे हे आजचे तातडीचे व महत्त्वाचे कार्य आहे. सर्व जातिविरोधी संघटनांचे जे असंख्य कार्यकर्ते व विद्यार्थी कार्यकर्ते आहेत त्यांच्यापर्यंत जरी ते आरंभाला पोचले तरी चळवळीच्या कार्याला साधेल. आपण याचा जरूर विचार करावा व योजना आखावी. आपले दुसरे पुस्तक अजून वाचायचे आहे. भेटीची आशा आहे.

आ. स्नेहांकित

(पी. बी. सावंत

हे पत्र लिहिले तेव्हा न्यायमूर्ती पी. बी. सावंत मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती होते. नंतर लवकरच सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

\- लेखक

Library IIAS, Shimla
MR 891.46 P 195 S
00124298

# पहिल्या आवृत्तीच्या निमित्ताने

११ मे १९८७ रोजी कोल्हापुरातील 'आम्ही भारतीय' या लोक-आंदोलनाच्या वतीने 'शिवकालाचे खरे अंतरंग' असा विषय ठेवून माझे व्याख्यान झाले. समाजवादी प्रबोधिनीचे सहचिटणीस प्रा. सुभाष पाटील अध्यक्ष होते. 'आम्ही भारतीय' या नावातून व्यक्त होणाऱ्या विचाराचे व व्यवहाराचे शहरातील बरेच कार्यकर्ते हजर होते. व्याख्यान बरे झाले.

ह्या व्याख्यानाचे टेपरेकॉर्डिंग केले होते. ए.आय.एस.एफ. व ए.आय.वाय.एफ.च्या कार्यकर्त्यांनी त्याचा जिल्ह्यात व बाहेरही प्रसार केला.

नंतर बऱ्याच ठिकाणी या विषयावर मी बोललो. या व्याख्यानातील मांडणीची व आशयाची उपयुक्तता सर्वांना जाणवतच होती. म्हणून मग ते व्याख्यान लिहून काढले. छापायचे तर नीट दुरुस्त व्हावे म्हणून प्रा. अशोक चौसाळकर यांनी ते दुरुस्त केले. खूप चांगली भर घातली.

दरम्यान कुठे कुठे व्याख्याने होत होती. व्याख्यानांनंतर कार्यकर्ते टीकाटिप्पणी करीत होते. दुरुस्त्या सुचवीत होते. भर घालीत होते. मीही वाचत होतो. मूळ व्याख्यानाची दिशा घट्ट झाली पण विस्तार वाढला. तपशील वाढला. मग मी पुन्हा लिहून काढले. मला व्याख्यानं द्यायची सवय आहे, तशी लिखाणाची नाही. ही छोटीशी पुस्तिका पूर्ण करायलाही मला खूप वेळ लागला. समाजवादी प्रबोधिनीचे दुसरे सहचिटणीस श्री. बाळ पोतदार यांचा लकडा नसता तर आणखी वेळ लागला असता.

शिवाजी महाराजांचा नाही पण येणाऱ्या शिवजयंतीचाही लकडा होता. या वर्षीच्या शिवजयंतीपूर्वी ही पुस्तिका प्रसिद्ध व्हावी म्हणून घाईगर्दीने सारे केले.

पुस्तिकेत मी 'शोधलेले' काहीच नाही. पूर्वी इतरांनी लिहून ठेवले त्याचीच सारी उसनवारी आहे. तपशील व संदर्भ अर्थातच इतरांचे. मांडणी फक्त माझी.

**गोविंद पानसरे**

१० एप्रिल १९८८ १७, आयडियल सोसायटी

# तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

११ मे १९८७ रोजी मी दिलेल्या व्याख्यानाचे पुस्तक व्हायला तब्बल ११ महिने लागले होते. या पुस्तकाची पहिली आवृत्ती एप्रिल १९८८च्या सुरुवातीस प्रेसमध्ये छापायला गेली. १० एप्रिल १९८८ रोजी मी पहिल्या आवृत्तीचे प्रास्ताविक लिहिले. पुस्तक तयार करायला ११ महिने लागले. पण छापून झाल्यानंतर पहिल्या आवृत्तीच्या ३००० प्रती १५ मे १९८८ पूर्वीच म्हणजे एका महिन्यातच संपल्या.

पहिल्या आवृत्तीत छपाईचे असंख्य आणि असह्य दोष होते. ते कमी करण्याचा प्रयत्न करून आणि अगदीच जुजबी दुरुस्ती करून मे १९८८ मध्येच ३००० प्रतींची दुसरी आवृत्ती काढली. या आवृत्तीस स्वतंत्र प्रस्तावनाही लिहिली नव्हती. ही दुसरी आवृत्तीसुद्धा १५ ऑगस्ट १९८८च्या सुमारास संपली आणि तिसरी आवृत्ती काढावी असे ठरले.

दरम्यान मी या विषयावर २५-३० ठिकाणी व्याख्याने दिली. नागपूरला तर तिथल्या सर्वात मोठ्या धनवटे रंग मंदिरात चक्क तिकिटे लावून २ दिवस २ व्याख्याने झाली. यवतमाळला तिथल्या शिवसेनेने व्याख्यान बंद पाडण्याचाही प्रयत्न करून पाहिला.

प्रत्येक व्याख्यानानंतर मी काही शिकत होतो. श्रोते प्रश्न विचारत असत. सूचना करीत असत. संदर्भ विचारीत असत आणि सांगतही असत.

महाराष्ट्रातून अनेकांची पत्रे आली. बहुतेक सर्व कौतुकाची. काही सूचना करणारीसुद्धा. त्यांचाही उपयोग झाला.

लेखनाच्या सर्व अवस्थांत सातत्याने लक्ष घालणारे डॉ. अशोक चौसाळकर दक्ष होतेच. त्यांनाही अनेक सूचना आल्या होत्या. त्यांनी पुन्हा काही भर घातली. खरे म्हणजे या लेखनातली त्यांची कामगिरी जवळ जवळ सह-लेखकाची आहे. माझे एक ज्येष्ठ सहकारी प्राचार्य ए. ए. पाटील यांनी लक्ष घालून, टिपणे काढून मार्गदर्शन केले. माझे मित्र, सांगली-कोल्हापूर 'केसरी'चे संपादक वासुदेव कुलकर्णी यांच्या दुरुस्त्या अन् सूचना चालूच होत्या.

या पुस्तिकेच्या पहिल्या आवृत्तीनंतर त्या वर्षीच्याच शिवजयंतीस शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी, अनिल गोटे आणि राजीव बसर्गेकर यांचे 'शेतकऱ्यांचा राजा शिवाजी' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. या पुस्तकानेही काही सुचविले.

मी स्वत:सुद्धा आणखी थोडा अभ्यास केला.

या सर्व बाबींमुळे काही भर घालून ही तिसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे. काही मजकुराची भर आणि बरी छपाई यामुळे ही आवृत्ती पहिल्या आवृत्त्यांपेक्षा फार चांगली नसली तरी बरी आहे असे वाटते.

पुस्तकाच्या शेवटी शिवाजी महाराजांची तीन पत्रे परिशिष्ट म्हणून जोडली आहेत. अभ्यासकांना ती उपयुक्त ठरतील. पुस्तिकेतील मजकूर समजायलाही उपयुक्त ठरतील.

शिवाजी महाराज, शिवकाल इत्यादी अभ्यासास उपयुक्त ठरतील अशा पुस्तकांची यादी शेवटी दिली आहे. पुस्तिकेत वापरलेले बहुतेक उतारे या पुस्तकांमधून घेतलेले आहेत. या पुस्तकाच्या हिंदी, उर्दू व कानडी आवृत्त्या निघण्याची शक्यता आहे.

मुंबई हायकोर्टाचे मान्यवर न्यायाधीश न्यायमूर्ती पी. बी. सावंत यांचे कौतुकाचे पत्र प्रसिद्ध करतोय. त्यांचे मन:पूर्वक आभार.

आणखी एक कौतुकाचा उल्लेख करायला हवा. तो म्हणजे भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय सचीव मंडळाचे सदस्य कॉम्रेड ए. बी. बर्धन यांचा. त्यांच्याकडून कौतुक मिळविणे एकूण कठीणच असते, असा माझा आजवरचा अनुभव आहे. त्यांचे जाहीर आभार मानले तर ते मला दोष देतील याची जाणीव आहे. तरीही त्यांचे आभार मानतो.

पुस्तक इतक्या झपाट्याने खपले व त्याचे कौतुक झाले त्याला माझे कर्तृत्व कारणीभूत नसून विषयाचे महत्त्व व ज्या काळात पुस्तक प्रसिद्ध झाले त्या काळातील या विषयाचे महत्त्व हे प्रामुख्याने कारणीभूत आहे याचे भान मला आहे.

२० सप्टेंबर १९८८

**गोविंद पानसरे**
१७, आयडियल सोसायटी
सागरमाळ, कोल्हापूर

# चौथ्या आवृत्तीच्या निमित्ताने

एप्रिल १९८८ ते जानेवारी १९९१ या तीन वर्षांहून कमी काळात या पुस्तिकेच्या २२,००० प्रती विकल्या गेल्या. ही चौथी आवृत्ती वेगळ्या आकारात छापतोय. कागदाच्या भरमसाठ वाढलेल्या किमती लक्षात घेता या आकाराचे पुस्तक पाच रुपये किमतीस विकणे हा अव्यवहारीपणा आहे. पण पुस्तिकेचे प्रयोजन व्यवहार नाहीच. त्यामुळे अडचण असूनही किंमत ५/- रु. ठेवली आहे.

माझे सहकारी श्री. सुरेश शिपूरकर यांचा ठाम आग्रह असा की आणखी काही करू पण किंमत वाढवायची नाही. त्यांनी हीच किंमत ठेवायला त्यांच्या ज्ञानाची व कौशल्याची मदत केली. त्यांचे आभार मानण्याचा औपचारिकपणा मी करणे योग्य नाही.

२२ फेब्रुवारी १९९१

**गोविंद पानसरे**

# आगळा राजा शिवाजी

तसं पाहिलं तर छत्रपती शिवाजी महाराजांवर आजवर बरंच लिखाण झालं आहे. कथा, कादंबऱ्या, नाटके, तमाशे, गाणी, पोवाडे, इतिहास, चरित्रे इत्यादी वाङ्मयाचे जेवढे म्हणून प्रकार आहेत, त्या सर्व वाङ्मयप्रकारांत शिवाजी आणि शिवकाल हा विषय अनेक वेळा येऊन गेला आहे. चित्रपटही निघालेत, व्याख्यानेही खूप झालीत आणि होत आहेत. पण एवढं सारं होऊनही शिवकालाची, शिवाजी महाराजांची आणि त्यांच्या कार्यास प्रेरणा ठरलेल्या कारणांची जी प्रतिमा सामान्य जनमानसात निर्माण झाली आहे ती इतिहासाशी इमान असलेली प्रतिमा आहे, असे म्हणवत नाही.

## 'लोकशाहीत' 'राजा'चे कौतुक

खरं म्हणजे सरंजामशाही आणि राजेशाही ही कालबाह्य झालेली समाजरचना आहे. शिवाजीचा काळ हा सरंजामशाहीचा काळ होता आणि शिवाजी हासुद्धा एक सरंजामशाहीतलाच राजा होता. जगाने आणि आपल्या देशाने राजेशाही त्याज्य ठरवली. राजेरजवाडे नाहीसे व्हावेत म्हणून संघर्ष केले, राजेरजवाडे नाहीसे केले आणि हे सर्व बरोबरच केले. राजेशाही मोडून त्या जागी आपण लोकशाही आणली हेसुद्धा बरोबरच केले. शिवाजीने स्थापून केलेल्या राज्याचे शिवाजीनंतर जे काही झाले त्यावरूनसुद्धा राजेशाही ही स्वीकारण्याजोगी व चालू ठेवण्याजोगी समाजव्यवस्था नव्हती, हेच सिद्ध होते. प्रगत अशा ब्रिटिश भांडवलशाही-साम्राज्यशाहीसमोर भारतातील सरंजामशाही टिकाव धरू शकली नाही. यावरूनसुद्धा सरंजामशाही व राजेशाही टाकाऊ समाजव्यवस्था ठरते हेच पुन्हा दिसते. पण मग या आधुनिक लोकशाहीत एका राजाचा उदो उदो का व्हावा? त्या राजाच्या विचारांत, व्यवहारांत आणि

चरित्रात असे काय आहे की त्यामुळे लोकशाहीतसुद्धा त्याचे स्मरण स्फूर्तिदायक ठरावे?

तसे राजे खूप होऊन गेले. पण सर्व राजांची काही अशी आठवण केली जात नाही. त्या राजांच्या जयंत्या किंवा मयंत्या कुणी साजऱ्या करीत नाही. त्या त्या राजांचे जे कुणी वारस हयात असतील ते कदाचित करीत असतील. क्वचित कुणाच्या बाबतीत त्या त्या राजांच्या संस्थानात समाविष्ट असलेल्या प्रदेशातील काही लोक कुठे कुठे असे करीत असतील. परंतु शिवजयंती जितक्या विस्तृत प्रदेशात, जितक्या मोठ्या प्रमाणात आणि ज्या उत्साहाने, उमेदीने व स्फूर्तीने साजरी केली जाते तसे इतर कुणाही राजाच्या बाबतीत घडत नाही. असे का व्हावे? इतर राजांपेक्षा या राजात काय वेगळेपण होते की ज्यामुळे असे घडत आले आहे?

शिवकालीन किंवा त्याच्या आगेमागे होऊन गेलेल्या इतर राजांपेक्षा शिवाजीत असे काय वेगळेपण होते? हे वेगळेपण समजावून घेतलं तर शिवकालाचा व शिवचरित्राचा नीट उलगडा होईल.

## राज्य-संस्थापक

पहिली गोष्ट म्हणजे शिवाजी हा कुणी अगोदर तयार केलेल्या गादीवर वारसा हक्काने बसलेला आयतोबा नव्हता. आयत्या पिठावर रेघोट्या उठवणे सोपे असते. त्यात फारसे कौतुकास्पद काही नसते. वारसा हक्काने राजे बनलेले अनेक होऊन गेले. शिवाजी वारसा हक्काने राजा बनला नव्हता. त्याने राज्य 'निर्माण' केले. तो राज्य-संस्थापक होता. राज्य निर्माण करणे सोपे नव्हते व नसते. शिवाजीने ते केले. इतरांनी स्थापलेल्या राज्यावर बसणे आणि स्वकर्तृत्वावर राज्य निर्माण करणे यात खूप फरक़ आहे.

शिवाजीने जेव्हा राज्य निर्माण केले तेव्हा इतरांच्या मनात तसा विचारसुद्धा येत नव्हता. मग तसा व्यवहार होण्याची गोष्ट दूरच. या किंवा त्या शाहीची इमानेइतबारे चाकरी करावी, या किंवा त्या दरबाराची मर्जी राखावी, त्यासाठी लाचारी पत्करावी आणि कसेतरी करून इनाम मिळवावे, जहागिरी मिळवावी आणि त्यातच आयुष्याची इतिकर्तव्यता मानावी असे इतर राजे करीत त्या काळात शिवाजीने राज्यस्थापनेची मनीषा बाळगली, तसा विचार केला, त्याची नीट योजना आखली आणि तसा व्यवहार करून राज्य स्थापन केले.

तथापि राज्य स्थापन करणारा शिवाजी हा काही एकमेव राजा नव्हता.

काही थोडे इतरही होते. त्या थोड्या इतरांनासुद्धा जनमानसात शिवाजीला मिळाले तसे स्थान मिळालेले नाही.

## 'आपले कार्य - आपले राज्य'

शिवाजी महाराजांच्या कार्याचे आणि राज्याचे इतर राजांच्या कार्यांहून आणि राज्यांहून सर्वात ठळक वेगळेपण कोणते? शिवाजीचे कार्य आणि शिवाजीचे राज्य त्या राज्यात राहणाऱ्या सर्वसामान्य माणसाला—रयतेला—आपले वाटत होते, हेच ते ठळक वेगळेपण आहे असे मला वाटते. खरं म्हणजे एखादे राज्य चांगले की वाईट हे ठरवण्याची सर्वोत्तम कसोटी कोणती? ज्या राज्यातील प्रजेला, सामान्य प्रजेला—बहुसंख्य प्रजेला, बहुजनाला—हे राज्य आपले आहे असे वाटते, ते राज्य उत्तम समजावे.

आपण सध्या लोकशाही राज्यात राहतो. जगात अनेक देशांत आपल्या देशातल्यासारखी लोकशाही आहे. या लोकशाही राज्यातील प्रजेला, बहुसंख्य सर्वसामान्य प्रजेला ही राज्ये आपली वाटतात का? आपल्या देशात जे काही चालले आहे ते आपल्यासाठी चालले आहे असे बहुसंख्य जनतेला वाटते का? मला वाटते याचे प्रामाणिक उत्तर 'नाही' असे आहे. लोकांनी निवडून दिले असले तरी सध्याचे लोकशाही राज्य व त्या राज्यात जे कार्य चालू आहे ते प्रजेला आपले आहे, आपल्यासाठी चालले आहे असे वाटत नाही.

शासनसंस्थेची एक उत्तम व्याख्या आहे, 'जी लोकांतून निर्माण होते पण वाढत्या गतीने लोकांपासून अलग पडते' ती शासनसंस्था.

सध्याचे लोकशाही राज्य लोकांतून निर्माण झाले आहे व लोकांपासून अलग पडते आहे, वाढत्या गतीने अलग पडते आहे.

याचा अर्थ आजच्या तथाकथित लोकशाहीपेक्षा शिवकाळातली सरंजामशाही प्रगत होती असा नाही. शिवकाळ आणि आपण यात ३५० वर्षांचे अंतर आहे. आता सरंजामशाही तर उपयोगाची नाहीच पण सध्या जी व जशी लोकशाही आहे तीसुद्धा सामान्य जनांच्या दृष्टीने उपयोगाची राहिलेली नाही, असा याचा अर्थ आहे.

## आत्माहुतीच्या प्रेरणा

शिवाजीचे कार्य हे आपले कार्य आहे, असे त्या काळातील रयतेला वाटत होते. याची अनेक उदाहरणे आहेत.

प्रचंड फौजफाट्यासह सिद्दी जोहर अन् फाजलखान पन्हाळगडाला वेढा देऊन बसले होते. महिने उलटले तरी वेढ्यात ढील पडली नव्हती. नेताजी पालकराने सिद्दी हिलालच्या साहाय्याने वेढ्यावर केलेला हल्ला नाकामयाब झाला होता. छत्रपतींच्या सेनापतीला हार पत्करून पळून जावे लागले होते. स्वत:च्या मुलाला वाचवायला गेलेला इमानी सिद्दी हिलाल शत्रूच्या हाती सापडला होता. वेढ्यात अडकून पडलेल्या शिवाजीराजांना सुटकेचा मार्ग सापडत नव्हता. अशा वेळी वेढ्यातील पातळ जागा शोधून गुपचूपपणे विशाळगडावर पळून जाण्याचा बेत रचला गेला. या बेताचा एक भाग म्हणून एक खोटा शिवाजी तयार करण्यात आला. पालखीत बसलेला हा शिवाजी शत्रूच्या हातात सापडला. ओळख पटेपर्यंत सिद्दी जोहर अन् त्याचे साथीदार गाफील राहिले आणि राजांना दूर जायला उसंत मिळाली.

खोटा शिवाजी बनला होता शिवा न्हावी. एक सामान्य गरीब मनुष्य. या शिवा न्हाव्याला हे ठाऊक होते की आपण स्वत:ला पकडून घ्यायचे आहे. तसे आपण पकडले जाणार व पकडले गेलो की आपला खातमा होणार. पण तरी तो तयार झाला. शेवटी सापडला अन् शत्रूच्या तलवारीने हसत हसत खतमही झाला.

जाणूनबुजून मृत्यूला कवटाळायला गेलेला शिवा न्हावी कुण्या जहागिरीच्या लोभाने गेला नव्हता. आपण मेलो तरी चालेल पण शिवाजीराजा जगला पाहिजे, अशी त्याची जिद्दीची व ठाम भूमिका होती. कारण शिवाजी करतो ते आपले स्वत:चे कार्य आहे; साऱ्या रयतेसाठी तो करतो आहे अशी शिवा न्हाव्याची खात्री होती.

अशी खात्री असणारा शिवा न्हावी एकटाच नव्हता.

पन्हाळगडाच्या वेढ्यातून महाराज निसटले. सिद्दी जोहर सावध झाला अन् वेगाने पाठलाग सुरू झाला. विशाळगडावर पोहोचण्यापूर्वी तो त्यांना गाठता तर खैर नव्हती. पण वाटेत घोडखिंड होती अन् ती खिंड अडवून मूठभर मावळ्यांसह बाजीप्रभू देशपांडे खडा ठाकला होता. महाराजांना विशाळगड गाठायला उसंत मिळावी म्हणून खिंडीत जान कुर्बान करायला तो अन् त्याचे सवंगडी तयार होते. शेवटी तसेच झाले. बाजीप्रभू पडला, अनेक मावळे कापले गेले. त्यांची नावेसुद्धा इतिहासाला माहीत नाहीत.

बाजीप्रभू अन् ते बेनाम मूठभर मावळे का लढले? पुन्हा तीच भावना; आपण मेलो तरी चालेल पण जे कार्य आरंभले होते ते पूर्ण करायला शिवाजी

जगायला हवा. ते कार्य पूर्ण व्हायला हवे. ज्याच्यासाठी हसत हसत मरण पत्करावे असे ते कार्य होते. अशीच त्यांची भावना होती.

अशी अनेक उदाहरणं इतिहासानं नमूद करून ठेवली आहेत.

शहेनशहा औरंगजेबाचा इमानी सरदार मिर्झाराजे जयसिंग याच्यासमोर महाराजांना हार पत्करावी लागली. नामुष्कीचा तह स्वीकारून आग्र्यास जावे लागले. आग्र्याच्या कैदेतून सुटकेचा मार्ग गवसेना. पुन्हा शक्कल लढवली गेली अन् महाराज पसार झाले. पसार होताना बिछान्यावर एकजण शिवाजीचे सोंग घेऊन झोपला होता अन् एकजण त्याचे पाय चेपत होता. पसार व्हायला संधी मिळावी, डाव उघडकीस यायला उशीर व्हावा अन् मिळेल तेवढ्या वेळेत राजांनी दूर निघून जावे म्हणून ही रचना केली होती.

मृत्यूला सामोरे जायला मागे राहिले होते मदारी म्हेतर अन् हिरोजी फर्जंद. लवकर असो अगर उशिरा असो डाव उघडकीस येणार, आपण पकडले जाणार, अन् बेमौत मारले जाणार, याची मदारी म्हेतरला अन् हिरोजी फर्जंदला जाण नव्हती? मृत्यूला कवटाळून आत्माहुती द्यायला ते दोघे का तयार झाले? पुन्हा तेच उत्तर. शिवाजीने आरंभलेले कार्य मोलाचे आहे. ते पूर्ण व्हायला हवे, टिकायला हवे, आपण मेलो तरी चालेल. हीच ती भावना.

आपण मेलो तरी चालेल पण शिवाजी जगला पाहिजे असं वाटायला लागावं, अशी किमया शिवाजीराजे करू शकले. इतर राजांना ते शक्य नव्हते. इतर राजांसाठीही लढणारे होते, नाही असं नाही. अशा लढाईत अनेक मृत्युमुखी पडले पण त्यांचं लढणं हे मर्दुमकी गाजवून जहागिरी अन् इनाम मिळवण्यासाठी होतं. ते मेले ते जहागिरीसाठी अन् इनामासाठी, उदात्त कार्यासाठी नव्हे.

शिवकार्यात लढवय्ये सैनिक तर सहभागी होतेच परंतु सर्वसामान्य रयतसुद्धा आपल्या परीनं सहभागी होती आणि हे फार महत्त्वाचं होतं. राजाच्या कार्यात जेव्हा रयत मनापासून सहभागी असते तेव्हा ते कार्य यशस्वी होतं. खरं म्हणजे ते कार्य राजाचं नसतं तर सर्व रयतेचं असतं आणि म्हणूनच यशस्वी होतं!

रयतेच्या स्वराज्य कार्यातील सहभागाचं ऐतिहासिक सत्य एका प्रतिभावान कवीनं सोप्या अन् रोखठोक भाषेत कविता करून नोंदवून ठेवलं आहे. कवितेचं धृपद आहे,

*खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे चिंधड्या*
*उडवीन राई राई एवढ्या...*

कवी वर्णन करतो एका छोट्या प्रसंगाचं. धामधुमीचा काळ आहे. सैनिक-शिपाई तर सोडाच पण शेत नांगरणारा साधा शेतकरीसुद्धा सावध आहे. कुणाचे सैनिक कुठे जातात इकडे त्यांचं लक्ष आहे. स्वराज्य कार्यात दगाफटका करणारा कुणी आढळला तर त्याला हटकला पाहिजे, अशी सगळीकडे भावना आहे.

बांधावरून चार घोडेस्वार जाऊ पहात आहेत. शेतकऱ्याचा १०-१२ वर्षांचा कोवळा पोरगा धिटाईनं त्यांना अडवतो आणि सांगतो, "खबरदार! पुढे जाल तर चिंधड्या उडवीन!! तुम्ही कोण आहात? कुठे चाललात?" वगैरे वगैरे. हा चिमुरडा पोरगा शस्त्रसज्ज घोडेस्वारांना दम देतो. भीत नाही. त्याला वाटतं आपणसुद्धा हे केलं पाहिजे. हे आपलं कार्य आहे. शिवाजीराजा काहीतरी चांगलं करतोय, आपण त्यात भाग घ्यायला पाहिजे. पुढे कवी सांगतो, 'हा चिमुरडा पोरगा ज्या घोडेस्वाराला दम देत होता, तो स्वत: शिवाजीराजाच होता.' त्या पोराने शिवाजी पाहिलाच नव्हता. ओळखदेख काही नाही, देणंघेणं काही नाही. पण तो शिवाजीच्या कामात मदत करू पाहतो, त्यासाठी धोका पत्करतो.

शिवकाळामध्ये शिवाजीच्या सर्व सहकाऱ्यांत, सर्व सैनिकांत आणि सर्व रयतेत ही भावना शिवाजी तयार करू शकला; यातच त्याचं वेगळेपण सामावलेलं आहे.

असामान्य पराक्रम होतात ते असामान्य कार्याच्या सिद्धीसाठी केलेल्या लढायांतच. इस्टेटीच्या लोभाने जे लढतात अन् मरतात त्यांची नोंद ठेवावी असं इतिहासाला वाटत नाही.

लढाईच्या धुमश्चक्रीत अनेकदा छोटी-मोठी माणसं भीमपराक्रम गाजवतात. युद्धाच्या धुंदीत मरणही पत्करतात. जहागिरी मिळवण्यासाठी किंवा मिळवलेल्या टिकवण्यासाठी पराक्रमसुद्धा केले गेले आहेत. पण लोभा-प्रलोभनाविना जाणूनबुजून मृत्यूला कवटाळणाऱ्या पराक्रमाची जातच वेगळी असते.

शिवाजीचे सहकारी व त्याची रयत शिवाजीच्या कार्यात सर्वस्वाचा त्याग करीत सहभागी होती, ही गोष्ट निर्विवाद आहे. शिवाजीच्या काळातील त्याच्या

रयतेला शिवाजीचे कार्य व शिवाजीचे राज्य हे आपले राज्य आहे असे वाटत होते, या बाबत शंका घ्यायला जागा नाही.

पण असं का होतं? शिवाजीनं असं काय केलं होतं की, रयतेला त्यानं आरंभलेलं कार्य आपलं वाटावं? इतर समकालीन किंवा मागेपुढे झालेल्या राजांना जी रयतेची निष्ठा मिळाली नव्हती, ती शिवाजी राजांना का मिळाली? असा खरा प्रश्न आहे.

इतर राजे रयतेशी वागत ती रीत आणि शिवाजी महाराज रयतेशी वागत ती रीत यात जो फरक होता, त्या फरकात या प्रश्नांचे उत्तर आहे.

## जहागिरी-इनामदारी-वतनदारी व गावगाडा

त्या काळी सर्वसामान्य जनता राजा कोण आहे, कोण आला, कोण गेला, यासंबंधी फिकीर करीत नसे. कुणीही राजा आला किंवा गेला, कुणाचेही राज्य आले तरी सामान्य रयतेच्या जीवनात फरक पडत नव्हता.

गाव जवळ जवळ स्वयंपूर्ण होते. गावगाड्याची स्वयंपूर्ण यंत्रणा होती. पाटील होता, कुलकर्णी होता, बारा बलुती होती. ते गाव चालवत होते; गावगाडा हाकीत होते. राजे बदलले तरी या गावगाड्यात फरक पडत नव्हता. वतनदार होते ते भरमसाठ वसुली करीत होते, रयतेवर अन्याय करीत होते, त्यांच्याविरुद्ध दाद मिळत नव्हती आणि मिळणार नव्हती म्हणून कुणी मागत नव्हते. राजे बदलले तरी कुलकर्णी, पाटील, वतनदार, देशमुख, जहागीरदार तेच असत. हे सर्वजण पटापट निष्ठा बदलत. ज्याचा जय झाला असेल; ज्याचं राज्य असेल त्याला निष्ठा अर्पण करीत. स्वत:ची वतने शाबूत राखीत, रयतेला छळीत, वसुली करीत, अन् राजाला हिस्सा नेऊन देत. जोवर छळ चालू होता तोवर रयतेला आपल्याकडून वसूल केलेला पैसा व माल वतनदार कोणत्या राजाला नेऊन देतात व किती देतात, याच्याशी कर्तव्य नव्हते.

सर्वच राजे लुटारू किंवा लुटारूंचे म्होरके, अशी रयतेची रास्त समजूत होती. म्हणून ते राजाराजांत फरक करीत नसत. यासंबंधी इतिहासाचार्य राजवाडे यांनी 'महिकावतीची बखर' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, "...गेल्या तीन हजार वर्षांत हिंदुस्थानात जी देशी आणि परदेशी सरकारे होऊन गेली, ती सर्व प्रकारच्या पोटभरू चोरांची झाली व सरकार म्हणजे उपटसुंभ चोरांची टोळी, अशी हिंदू गावकऱ्यांची अंतस्थ प्रामाणिक समजूत आहे..."

ज्यांची सतत चोरीच होत असे त्यांचा चोर कोण आहे, त्याची जात काय आहे, याच्याशी संबंधच काय? म्हणून राजा कोण आला किंवा कोण गेला याच्याशी रयतेला कर्तव्य नव्हते.

दूर ब्रिटनमध्ये जगाच्या इतिहासाचा अभ्यास करीत असलेल्या मार्क्सनेसुद्धा अपुरी साधने असताना असाच निष्कर्ष काढला होता. मार्क्सने त्याचा थोर सहकारी एंगल्सला १४ जून १८५३ रोजी एक पत्र लिहिले आहे. त्या पत्रात भारतातील त्या काळच्या लढाया, खेडी व बदलणारे राजे यासंबंधी मार्क्स लिहितो,

"जरी काही वेळेला खेड्यांनाच युद्ध, दुष्काळ, साथी यांनी धोका पोचला तरी तेच नाव, त्याच सरहद्दी, तेच हितसंबंध, तीच कुटुंबेसुद्धा शतकानुशतके सातत्य टिकवून आहेत. राज्य मोडणे अगर दुभंगणे याची झळ हे रहिवाशी स्वत:ला कधीच लावून घेत नाहीत. जोपर्यंत खेडे अखंड राहते तोवर ते राज्य कुठल्या सत्तेकडे गेले किंवा कुठल्या सार्वभौमत्वाखाली ते येते, याची फिकीर ते करीत नाहीत. त्यांची अंतर्गत व्यवस्था बदलत नाही."

राज्याच्या अंतर्गत व्यवस्थेत राजाचा संबंध नव्हता. राजाचा आणि रयतेचा संबंध नव्हता. राजाच्या धर्मामुळे रयतेच्या जीवनात फरक पडत नव्हता. राज्य बदलले तरी जुनीच राज्ययंत्रणा ते राज्य राबवत होती व प्रजेला नागवत होती. वतनदाराने रयतेला छळले, लुटले, नागवले तरी राजाला पर्वा नव्हती. जोवर त्याचा वसूल वतनदार आणून देत होते, तोवर ते रयतेशी कसा व्यवहार करतात याच्याशी राजाला कर्तव्य नसे.

शिवाजीचे कार्य सुरू झाले. शिवाजीचे राज्य आले आणि एकदम बदल झाला. राजा आणि रयत यांचा संबंध आला. राजा रयतेला दिसू लागला, भेटू लागला, त्यांची विचारपूस करू लागला. त्यांचा छळ होऊ नये म्हणून दक्ष राहू लागला. त्यांना मदत व्हावी म्हणून राज्य चालवू लागला. जहागीरदार-देशमुख-वतनदार-पाटील-कुलकर्णी यांच्या बेलगाम व्यवहाराला लगाम घालू लागला. वतनदार हे मालक नाहीत तर राज्याचे नोकर आहेत, असे शिवाजी सांगू लागला व त्याप्रमाणे रयतेला अनुभव येऊ लागला. वतनदारांच्या व्यवहारावर राजाचे नियंत्रण आले. त्यांनी कसे वागावे व कसे वागू नये याचे नियम झाले.[१]

वतनदार राजाच्या नियमाविरुद्ध वागू लागले, रयतेला छळू लागले व

अत्याचार करू लागले तर त्यांच्याविरुद्ध रयतेला दाद मागण्याचे धाडस आले. कारण रयतेने केलेल्या तक्रारींची चौकशी होऊन प्रसंगी मुजोर वतनदारांना जरब बसेल अशी कठोर शिक्षा होऊ लागली.

शिवाजीच्या रयतेला हे सारेच नवे होते. कुठे घडत नव्हते असे होते. त्यांना फरक जाणवत होता आणि राजाकडे व राजाच्या कार्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलत होता. राजा व राज्यकार्य त्यांना आपले वाटू लागले होते.

□□□

# रयतेची कणव असलेला राजा

पुणे परगणा ही शिवाजीचे वडील शहाजी यांची जहागीरदारी होती. अगदी लहान वयात दादोजी कोंडदेव यांच्या देखरेखीखाली शिवाजीने या परगण्याची व्यवस्था पहावी अशी व्यवस्था केली गेली होती.

हा परगणा मोगल व आदीलशाही यांच्या सरहद्दीवरील प्रदेश होता. या प्रदेशात वारंवार एकमेकांच्या स्वाऱ्या होत, आक्रमणे होत, शहरे व गावे भस्मसात होत, वस्त्या उजाड होत. सभासदाची बखर म्हणून प्रसिद्ध असलेल्या बखरीत याचे वर्णन आहे. वस्त्या उजाड होऊन जंगले वाढली होती. त्यांतून कोल्हे, लांडगे व इतर रानटी श्वापदे माजली होती.

शेतीच्या व शेतकऱ्यांच्या अशा व्यवस्थेत शिवाजी व दादाजी कोंडदेव या मुलखाची व्यवस्था पाहू लागले.

उद्ध्वस्त झालेली गावे शिवाजीने कौलनामे देऊन पुन्हा वसवली. नव्याने जमीन कसायला घेणाऱ्यांना बी-बियाणे देऊन व औतफाट्यास मदत करून शेती कसायला प्रोत्साहन दिले. नवीन लागवडीस आणलेल्या जमिनींना सुरुवातीची ४-५ वर्षे महसूलसुद्धा कमी ठेवला.[२]

मन मानेल तसा वसूल करण्याचा शिरस्ता मोडून काढला. जमिनी मोजून घेतल्या. मोजलेल्या जमिनींचा महसूल निश्चित केला. ठरलेला महसूलच वसूल करण्याचा दंडक घालून दिला व तो अमलात आणला.

दुष्काळात महसूल माफ केला. पिकलेच नाही तर शेतकरी देणार कोठून? हे समजून घेऊन शिवाजी राजा वागला. उलट दुष्काळात शेतकऱ्याला मदत केली जाई.

वतनदारांच्या व्यवहाराचे हे वर्णन पहा :

"अशी पुरातन वहिवाट होती की, महालगे, महालकी व गावगन्ना देशमुख, देशपांडे, देसाई, पाटील, कुलकर्णी, खोत, मिरासदार, जमीनदार वगैरे असत. त्यांच्या ताब्यात महाल व गाव असून रयतेकडून जमिनीचा वसूल त्यांनी करावा असे असे. सरकारी अधिकारी रयतेकडून प्रत्यक्ष वसूल घेत नसत. त्याची सर्व जबाबदारी देशमुख वगैरे जमीनदारांकडे असे. त्यामुळे सर्व रयत मिरासदारांच्या ताब्यात असे. त्याला वाटेल तसा तो रयतेकडून वसूल चोपून घेत असत. एखाद्या गावचे सरकारी देणे दोनशे किंवा तीनशे रुपये असेल तर त्या गावचे हे मिरासदार रयतेकडून दोन हजार किंवा तीन हजार रुपये वसूल उकळीत असत. अशा तऱ्हेने आपला तळीराम गार करण्यासाठी रयतेस नाहक त्रास देत व सरकारासही फसवीत. ते आपल्या वस्तीच्या गावात हुडे, वाडे, कोट वगैरे बांधून शिपाई, प्यादे व बंदूक, तलवारी बाळगून बळावत असत. त्यांचा हा बेकायदेशीर कारभार सरकारी अधिकाऱ्यांच्या कानी गेला म्हणजे ते त्यांचेकडे सरकारी देणे अधिक मागत. परंतु त्यास कित्येक देशमुख वगैरे प्रबळ जमीनदार दाद देत नसत. प्रसंग पडल्यास त्यांच्याशी भांडावयासही तयार होत. अशा व्यवस्थेमुळे जिकडे तिकडे पुंड पाळेगारांचा सुळसुळाट झाला होता."[३]

अशा अवस्थेतील शेती वसुलावर शिवाजीने नियंत्रण आणले. आता हे वर्णन पहा :

"स्वराज्यातील एकंदर जमिनीची मोजणी करून ती लागवड करणाऱ्यांच्या नावे लावून तिची नोंद महालकऱ्याच्या दप्तरी असे. जमीन मापण्यासाठी काठी केली असे. ती पाच हात, पाच मुठी लांब असे. एका हाताची लांबी चौदा तसू असून काठीची लांबी ८२ तसू असे. वीस काठ्यांचा एक बिघा व एकशेवीस बिघ्यांचा एक चावर, असे मोजणीचे प्रमाण धरिले असे. प्रत्येक बिघ्यास किती पीक व्हावे हे उभ्या पिकाची पाहणी करून ठरवीत. ह्या उत्पन्नाच्या पाच तक्षिमा करून तीन तक्षिमा लागवड करणाऱ्या शेतकऱ्याने भोगाव्या व दोन तक्षिमा सरकारला द्यावा, असा करार असे. हे सरकार-देणे शेतकऱ्याने धान्याच्या किंवा नगदीच्या रूपाने द्यावे असे असे. अवर्षणादी संकटसमयी शेतकऱ्यांना सढळ हाताने तगाई देत. ही तगाईची रक्कम त्यांनी चार व पाच वर्षांच्या हप्त्यांनी फेडावी असे असे. लागवडीस न आलेल्या जमिनी नव्या रयतेस द्यावयास झाल्या म्हणजे तिच्यापाशी गुरे-ढोरे नसल्यास तिला

ती सरकारांतून द्यावी, तिला बीजास दाणा द्यावा व पीक होईपर्यंत निर्वाहासाठी धान्य व पैसा द्यावा. दोन-चार वर्षांनी हा ऐवज उजवून घ्यावा. ह्याप्रमाणे रयतेत कौल देऊन जमिनी इस्ताव्याने दिल्या व बहुतेक सुपीक जमीन लागवडीखाली आणली. उत्पन्नाचा आजमास पाहून रयतेवर कर बसवावा, जुलूम असा कोणावर करू नये अशी अधिकाऱ्यांस सक्त ताकीद असे.''[४]

''वतनदार व जमीनदारांची अव्यवस्था महाराजांनी पार मोडून टाकली. रयतेकडून वसुलीची कामगिरी करण्यासाठी सर्वत्र अधिकारी नेमून दिले. पूर्वीच्या जमीनदारांनी व मिरासदारांनी रयतेला कोणत्याही बाबतीत काडीइतका त्रास देऊ नये, त्यास पूर्वीच्या अंमलात जितके मिळत असत त्यांचे प्रमाण ठरवून, त्यास ते सरकारी कामगाराकडून प्रतिवर्षी मिळत जावे, त्यांनी ते प्रत्यक्ष रयतेकडून वसूल करू नये असे ठरविले, हा जो सरकारी उत्पन्नाचा ठरीव अंश त्यांना कोणतीही जोखीम शिरी न बसता मिळत असे. त्यास सरकारातून प्रतिवर्षी मंजुरी मिळावी लागे. त्यामुळे त्यांच्या वर्तनावर पुरा दाब बसून रयत त्यांच्या कचाट्यातून साफ सुटली. सुखी, स्वतंत्र झाली. रयतेस गुलाम करणाऱ्या ह्या देशमुख-देशपांडे ग्रामाधिकाऱ्यांचे वाडे, हुडे, कोट पाडून महाराजांनी जमीनदोस्त केले व त्यांनी इत:पर असले धंदे करू नयेत, इतर रयतेसारखी साधी घरे बांधून रहावे असा हुकूम सोडला.''[५]

शेतकऱ्यांची व त्यांच्या शेतीची अशी काळजी वाहणाऱ्या राजासंबंधी रयतेला मग प्रेम का नाही वाटणार? शिवाजीचे कार्य टिकले पाहिजे व वाढले पाहिजे असे का नाही वाटणार? अशा शेतकरी रयतेचा कोवळा पोरगा मग, 'खबरदार जर....' वगैरे का नाही म्हणणार?

रयत राजाशी कशी वागते हे राजा रयतेशी कसा वागतो यावरून ठरते. राजा रयतेची एकपट काळजी करू लागला, तर रयत राजाची दसपट काळजी करते. राज्य ही आपली खाजगी मिळकत नसून 'जनतेची अमानत' आहे, अशा भावनेने राज्यकर्ते वागू लागले तर जनता राज्य आपले आहे असे मानते आणि त्याच्या उलट, 'जनताबिनता कुछ नहीं राज्य ही आमची बापजाद्यांची मिळालेली खाजगी दौलत आहे', अशा भावनेने राज्यकर्ते वागू लागले म्हणजे जनता अशा राज्यकर्त्यांना उलथून टाकते, असा जगाचा इतिहास आहे.

## शिवाजी व स्त्रियांची अब्रू

शिवचरित्रातील काही बाबी अगदी निर्विवाद आहेत. कुणाच्या मनात त्यांसंबंधी शंका नाही. परंतु या बाबींचे महत्त्व सर्वांनीच नीट ध्यानात घेतले आहे असे म्हणवत नाही.

स्त्रियांच्या अब्रूसंबंधीचा छत्रपती शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन ही अशीच एक बाब आहे.

शिवाजी महाराजांच्या काळी आणि सरंजामदारीच्या काळात एकूणच स्त्रियांच्या अब्रूला—विशेषत: गोरगरिबांच्या स्त्रियांच्या अब्रूला—किंमत नव्हती. राजेरजवाडे व राजपुत्र तर सोडाच पण सरदार, वतनदार, जमीनदार, देशमुख, पाटील यांच्या दृष्टीने गोरगरिबांच्या लेकी-सुना म्हणजे त्यांना हव्या त्या वेळी उपभोगण्याच्या वस्तू होत्या. दिवसाढवळ्या त्यांची अब्रू लुटली जात होती आणि त्याविरुद्ध कुणाकडे दाद मागता येत नव्हती. ज्यांच्याकडे दाद मागायची तेच अब्रू लुटत होते, अब्रू लुटणाऱ्यांना मानमरातब अन् पदव्या देत होते.

अशा काळात शिवाजीचा यासंबंधीचा दृष्टिकोन मूलत:च वेगळा होता.

रांझ्याच्या पाटलाची गोष्ट प्रसिद्ध आहे. गावच्या वतनदार पाटलाने गरीब शेतकऱ्याच्या तरण्या पोरीला दिवसाढवळ्या सर्वांसमक्ष उचलून नेली अन् भोगली. माती झालेल्या जिण्यापेक्षा मरण बरं, म्हणून पोरीनं जीव दिला. सारा गाव हळहळला. पण मुकाच राहिला.[६]

शिवाजीच्या कानी ही गोष्ट आली. पाटलाच्या मुसक्या बांधून पुण्याला आणले गेले आणि हातपाय तोडायची शिक्षा झाली. नुसती झाली नाही तर अमलात आली आणि साऱ्या मावळखोऱ्यात आश्चर्य पसरले. गरीब रयतेच्या पोरीची अब्रू घेतली म्हणून वतनदार पाटलाला जबर शिक्षा झाल्याचं पाहून रयत शिवाजीवर फिदा झाली अन् रयतेच्या अब्रुरक्षणासाठी शिवाजी कार्य करीत असेल तर त्या कार्यासाठी मरायला तयार झाली.

ज्यांच्या पाठबळावर राज्य करायचं अशा वतनदारांचीसुद्धा गय न करायला न्यायावर एक जबर निष्ठा लागते. शिवाजीपाशी ती होती म्हणून रयत शिवकार्यात सहभागी होती. आजही गोरगरीब रयतेच्या लेकी-सुनांवर खेडोपाडी अन् शहरांतसुद्धा अत्याचार अन् बलात्कार होतात पण शिवाजीचा वारसा सांगणारे अन् उठसूट शिवाजीच्या नावाचा जयघोष करणारे आज काय करतात? अत्याचार करणाऱ्याला शिक्षा होतात का? हात-पाय तोडायचे सोडा,

कोर्टात केस तरी होते का? की अत्याचार करणारा जितका मोठा 'वतनदार', जितका मोठा 'मालदार' तितक्या लवकर त्याची सुटका होते? का अटकच होत नाही?

लोकशाहीतसुद्धा शिवाजी आठवतो तो यामुळे. आठवावा तो यासाठी.

स्वत:च्या नातेवाईकांच्या अन् अधिकाऱ्यांच्या पापावर पांघरूण घालून पुन्हा वर कुणी शिवाजीचं नाव घ्यायला लागला, तर शिवाजीची आठवण करून त्याला जाब विचारायला पाहिजे. शिवाजी आठवावा तो यासाठी.

रांझ्याच्या पाटलाची हकिगत हा अपवाद नाही. अशा इतरही कथा आहेत.

१६७८ मध्ये सकुजी गायकवाड नावाच्या सेनापतीनं बेळवाडीच्या किल्ल्याला वेढा दिला. या किल्ल्याची किल्लेदार एक स्त्री होती. तिचे नाव सावित्रीबाई देसाई. या बहादूर स्त्रीने २७ दिवस किल्ला लढवला. पण सकुजीने शेवटी किल्ला जिंकला आणि विजयाच्या उन्मादात सूड भावनेने सावित्रीबाईवर बलात्कार केला. ही बातमी ऐकून शिवाजी संतापला. त्याने सकुजी गायकवाडचे डोळे काढावयास लावले व त्यास जन्मभर तुरुंगात डांबले. आपल्या विजयी सेनापतीनं शत्रू असलेल्या स्त्रीवर बलात्कार केला म्हणून गय केली नाही. कारण शिवाजीची भूमिका होती, ''स्त्रियांची इज्जत कायम राहिली पाहिजे. मग ती कुणी असो!''[७]

कल्याणच्या सुभेदाराची सून दरबारात हजर केल्यानंतर तिच्यासंबंधी गैरउद्‌गार न काढता व गैरव्यवहार न करता तिची चोळी-बांगडी करून पाठवणी करण्याची कथा तर अनेक काव्यांचा विषय झाली आहे. मुसलमान शत्रूची तरणीताठी अन् देखणी सून पाहून आईची आठवण व्हावी अन् 'आपलीही आई इतकी सुंदर असती तर काय झाले असते,' असे उद्‌गार निघावेत यासाठी चारित्र्यसंपन्नता आणि सौंदर्यासंबंधीचा निरोगी दृष्टिकोन असावा लागतो. आजच्या भडभुंज्या तथाकथित शिवभक्त 'वतनदारा'समोर अन् 'राजासमोर' अशी कुणी सुंदर स्त्री आली असती, तर त्यांनी काय उद्‌गार काढले असते अन् काय केले असते याची कल्पना करून पहा म्हणजे खरा शिवाजी अन् खोटे शिवभक्त यांच्यातला फरक उमगेल.

लढाईत किंवा लूट करताना मुसलमान किंवा हिंदू कोणत्याही धर्माच्या स्त्रिया हाती आल्या तर त्यांना तोषिस लागता कामा नये व त्रास होता कामा नये, अशा सक्त आज्ञा शिवाजी महाराजांनी दिलेल्या आहेत व त्याचा अंमल करून घेतला आहे.

त्या काळात हिंदू व मुसलमान, राजेरजवाडे, इनामदार यांचा लढाईस जाताना जनानखाने, कुणबिणी व कलावंतिणी बरोबर नेण्याचा रिवाज होता. परमुलखातल्या स्त्रियांना बटकिणी बनवण्याचा अन् भ्रष्ट करण्याचा परिपाठ होता. त्या काळी शिवाजी महाराजांनी सक्त हुकूम दिला होता की, 'मोहिमेस जाताना कुणीही बटकिणी, कुणबिणी अगर कलावंतिणीस बरोबर घेऊ नये. कुणाही स्त्रीस बटकीण बनविता कामा नये.'[८]

२१व्या शतकाच्या उंबरठ्यावर असलेल्या भारतातील 'पुरोगामी', 'न्यायी' महाराष्ट्र राज्यात आजही स्त्रियांवर बलात्कार होतात अन् बलात्काराकडे दुर्लक्ष करणारे इतकेच नव्हे, तर बलात्कार करणाऱ्यास पाठीशी घालणारे शिवाजीच्या नावाने जयजयकार करतात आणि आपण शिवाजीचे वारसदार आहोत म्हणून सांगत फिरतात. समजा, शिवाजी आज आला तर या शिवभक्तांचे काय करील?

## शिवाजी व राज्यकारभाराची भाषा

भारतात भाषिक राज्ये होऊन ३७ वर्षे होऊन गेली. महाराष्ट्र हा एकभाषिक प्रांत होऊनही ३० वर्षे होत आली पण अजूनही महाराष्ट्रातला राज्यकारभार इंग्रजीत चालतो. ज्यासाठी एकभाषिक राज्य केले तो हेतू कधी साध्य होणार आहे कुणास ठाऊक! परकीय इंग्रज साहेबाला दीडशे वर्षे लढून समुद्रपार घालवला पण साहेबांची भाषा जी बोकांडी बसली; ती काही दूर केली नाही. अजूनही एतद्देशीय साहेब इंग्रजीतच बोलतात. चांगलं इंग्रजी बोलणं प्रतिष्ठेचं समजतात अन् ज्याला इंग्रजी येत नाही वा चांगलं येत नाही त्याला गावंढळ समजतात.

शिवकालीन राज्यकारभाराची भाषा मुख्यत्वे फारसी होती. कोणतीही भाषा चांगली किंवा वाईट नसते. पण लोकांना फारसी समजत नव्हती. साहजिकच न समजणाऱ्या भाषेतील राज्यकारभार रयतेला आपला वाटत नव्हता. काय चालतं कळत नव्हतं. शिवाजीनं विचारपूर्वक राज्यभाषा कोश करायचं काम सुरू केलं. प्राकृतात कारभार सुरू केला. तो लोकांना आपला वाटू लागला. शिवाजीचे राज्य लोकांना आपले राज्य वाटू लागले.

## शिवाजी आणि रयत

रयतेचा—सामान्य गोरगरीब जनतेच्या—लेकी-सुनांच्या अब्रूसंबंधी शिवाजी

महाराजांचा दृष्टिकोन जसा त्या काळातील इतरांपेक्षा वेगळा होता तसाच रयतेच्या संपत्तीसंबंधीचा दृष्टिकोनही खूप वेगळा होता.

रयतेची संपत्ती म्हणजे कुणाही दांडगेश्वराने लुटायची वस्तू अशी त्या काळी रीत होती. त्या काळी सारख्या लढाया होत. पायदळ व घोडदळ हे सैन्य सारखे एका ठिकाणाहून दुसरीकडे मोहिमांसाठी फिरत असे.

हे सैन्य गावाहून जाऊ लागले किंवा मुक्कामास राहिले तर रयतेच्या संपत्तीचे काय होईल?

उभ्या पिकातून घोडदळ सुसाट जाई. वर्षभर राबून निढळाच्या घामाने पोसलेले अन् हातातोंडाला आलेले तयार पीक बघता बघता भुईसपाट होई. ज्याच्या राज्यात राहतो त्याच राजाचे सैन्य असे करीत असे, मग तक्रार कुणाकडे करणार? अन् दाद कोण घेणार? स्वतःच्या नशिबाला दोष देत घरातल्या घरात रडतकुढत बसण्याखेरीज दुसरे काही करायला वाव नसे.

असं बेगुमान वागण्याची सैन्याला मुभा होती त्या काळात शिवाजीनं सैन्याला आदेश दिले आहेत की, 'कोणत्याही मोहिमेवर कोणत्याही सैन्याच्या तुकडीने शेतकऱ्यांच्या उभ्या पिकातून जाता कामा नये. पिकाची नासाडी होता कामा नये.'

कल्पना करून पाहा! उभ्या पिकातून बेदरकारपणे दौडत जाणारे व उभे पीक मातीमोल करणारे सैन्य वर्षानुवर्षे पाहण्याचा प्रसंग ज्यांच्यावर येत असेल, त्यांना जर पिकातून न घुसता रस्त्याने जाणारे आणि 'पिकाचे जराही नुकसान होऊ नये' अशी दक्षता घेणारे शिवाजीचे सैन्य पहायला मिळाले तर त्यांना काय वाटले असेल? रयतेच्या पिकांची काळजी करणारा राजा, त्याच्या आज्ञेप्रमाणे वागणारे सैन्य आणि हे सर्वजण करीत असलेले कार्य यासंबंधी रयतेला काय वाटले असेल? हा राजा, हे सैन्य आणि हे कार्य आपले आहे, असे रयतेला का नाही वाटणार?

इतरांकडून त्या काळी नुसती पिकाची नासधूसच होत नसे तर बळजबरीही होत असे. सैन्याचा आणि सरदारांचा गावी मुक्काम पडला तर काय होई? सैन्यातील घोड्यांची दाणा-वैरण गावातल्या रयतेकडून घेतली जाई. सैन्याची सरबराई गावालाच करावी लागे अन् मग गावचा वतनदार पाटील किंवा कुलकर्णी गावातील ज्यांच्याकडे जे असेल ते काढून घेऊन मुक्कामास आलेल्यांची बडदास्त ठेवी. ज्या काळात सैन्य आणि सरदार असे वागायला

चटावले होते, दैवावर भरवसा ठेवून अशा आपत्ती सहन करायची सवय ज्या काळी रयतेला झाली होती, त्या काळी हा एक्र सत्पुरुष येतो आणि सक्त आज्ञा करतो की,

"रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये."

"सैन्यातील घोड्यांना दाणा-वैरण लागली तर रोख रक्कम देऊन खरेदी झाली पाहिजे."[१]

"सैन्याचा रयतेला त्रास होता कामा नये."

आणि नुसत्या आज्ञा देत नाही तर त्याची सक्त अंमलबाजवणी करतो. रयतेच्या कष्टाची ही अपूर्व कणव शिवाजीला रयतेच्या निष्ठा देऊन गेली.

आज तसे 'सरदार' नाहीत अन् तसे 'घोडदळ'ही नाही. पण नवे सरदार आहेत. घोडदळ नसले तरी 'मोटारदळ' आहे. मोहिमेवर नसले तरी आजही हे नवे सरदार मोटारीच्या काफल्यासह 'पाहणी करण्यास' अन् 'भेट देण्यास' गावोगाव मुक्कामास असतात. आज हे 'नवे दळ' गावोगाव कसे वागते? सरबराईस कामी आलेल्या कोंबड्यांचे पैसे मालकाला मिळतात का? सरबराईचा खर्च मुक्कामास आलेले नवे सरदार स्वतःच्या मिळणाऱ्या पगारातून अन् कमाईतून करतात का? गावगन्नाचे पाटील, कुलकर्णी अन् छोटे अंमलदार रोख देऊन वस्तू खरेदी करतात का? काय करतात हे?

या सर्वांच्या घरात आणि हपिसात शिवाजी महाराजांचा फोटो लावलेला असतो अन् हे शिवाजी महाराजांचा जयजयकार करीत असतात. शिवाजीपासून हे काय शिकले? यांचा शिवाजी कोणता? खरा शिवाजी कोणता?

रयतेच्या भाजीच्या देठालासुद्धा हात न लावण्याची शिवाजीची आज्ञा यांना सांगावी की नको?

स्वराज्य संरक्षणाच्या कार्यासाठीसुद्धा रयतेला जाच होऊ नये म्हणून हा राजा कमालीची काळजी करताना आढळतो.

शिवकालीन राजनीती रामचंद्रपंत आमात्य यांच्या 'आज्ञापत्रात' आढळून येते. या 'आज्ञापत्रा'तील वेगळेगळ्या आज्ञांमधून आमात्यांचा बारकावा स्पष्ट दिसतो. रयतेसंबंधी प्रीती, मनाचा कोमलपणा आणि सूक्ष्म दृष्टी या सर्वांसाठी पुढील आज्ञा पहा :

छत्रपतींच्या आरमार उभारणीच्या कार्यात लाकडाचे महत्त्व कितीतरी मोठे.

त्याशिवाय आरमार कसे उभारणार? त्या काळी जंगले दाट होती अन् लाकूडही विपुल प्रमाणात उपलब्ध होतं. तरीसुद्धा खालील आज्ञा कशी आहे पहा :

"स्वराज्यातील आंबे, फणस हेही लाकडे आरमाराच्या प्रयोजनाची. परंतु त्यांस हात लावू देऊ नये. काय म्हणून तर ही झाडे वर्षा-दोन वर्षांत होतात असे नाही. रयतांनी ही झाडे लावून लेकरांसारखी ही बहुतकाळ जतन करून वाढविली. त्यांचे दु:खास पारावार काय? कदाचित एखादे झाड बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असले, तरी त्याचे धन्यास राजी करून घेऊन द्रव्य देऊन त्याचे संतोषे तोडून घ्यावे."[१०]

राजवाडे यांच्या आठव्या खंडात खुद्द शिवाजी महाराजांच्या तोंडचे उद्‌गार नोंदवलेले आढळतात. चिपळूणजवळ पागेचा तळ पडला असता अधिकाऱ्यांनी कसे वागावे यासंबंधी राजे म्हणतात :

"जवळ पावसाळ्याकरिता प्रयासाने साठवलेले गवत पडले आहे, हे लक्षात न घेता कुणी रंघनाळ्या करतील, कुणी आगट्या करतील, कोणी चिलीम असे करून गवतास आग लावून अनर्थ ओढवेल. मग सारी पागाच बुडेल. मग घोडी तुम्ही लोकांनी मारिली असे होईल." किंवा हे पहा... "तुमच्या पदरी पैसा घातला आहे. लागेल तो जिन्नस पैसा खर्च करून बाजारातून आणवावा. तसेच न करता प्रजेस पीडा कराल तर मोंगल बरे असे प्रजेस हाईल..."[११]

रयतेसंबंधी ही कणव त्या काळी कुणाही राजाने व सरंजामदाराने दाखवल्याचे आढळत नाही. राजाची रयतेसंबंधीची ही कणव आगळी होती. म्हणून रयतेची राजासंबंधीची निष्ठा आगळी होती.

ज्या काळात इतर राजांचे सैन्य जनतेला बटीक समजत असे, रयतेच्या संपत्तीची नासधूस व लूट करीत असे, रयतेच्या लेकी-सुनांची अब्रू बेगुमानपणे लुटीत असे, अशा काळात शिवाजी महाराजांचे सैन्य रयतेशी इतके चांगले का वागले? या सैन्यात हा बदल कशामुळे झाला? त्याचे कारण काय?

हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे.

या प्रश्नाचे उत्तर नुसत्या शिवाजीराजांच्या चारित्र्यात सापडणार नाही. केवळ त्यांच्या आज्ञाच या बदलास कारणीभूत होत्या असे म्हणणे अपूर्ण होईल. त्यासाठी या सैन्याची रचना आणि हे सैन्य ज्या हेतूकरता लढत होते ती रचना व तो हेतूच नीट समजून घेतला पाहिजे.

## शेतकऱ्यांचे सैन्य

त्या काळातील इतर राजांचे सैन्य हे खडे सैन्य होते. लढाया करणे हाच त्यांचा व्यवसाय होता, उपजीविकेचे साधन होते. बाराही महिने ते सैन्य त्याच कामावर असे. घरादारापासून दूर असलेल्या सैन्यातील शिपाई, कुटुंबापासून व शेतीभातीच्या कामापासून दूर असलेले सैन्य बेगुमानच असते. त्यांना कशाची पर्वा नसते. अशा शिपायांत हडेलहप्पी प्रवृत्तीच असते. लग्न झालेले व पोरेबाळे असलेले, बारामाही शिपाईगिरी करणारे रयतेची पर्वा करत नसतात. रयतेच्या संपत्तीची व अब्रूची पर्वा करण्याची मानसिकता त्यांच्यात नसते.

शिवाजीचे सैन्य बारमाही शिपायांचे सैन्य नव्हते. काही खडे सैन्य होते, नाही असे नाही, पण बहुतेक शिपाई शेतीभाती करीत. बायका-मुलांत राहत आणि शिपाईगिरीसुद्धा करीत. दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघन करून मुलूखगिरीला बाहेर पडायचे आणि अक्षयतृतीयेला पुन्हा घरी येऊन शेतीभातीच्या कामाला लागून बायका-मुलांत रहायचे असा रिवाज होता.

शेतीशी व कुटुंबाशी असे जिवंत व सातत्याने संबंध असणाऱ्या शिपायांची मानसिकता दुसऱ्या शेतकऱ्यांच्या शेतीची व संपत्तीची काळजी करण्याची असते; इतरांच्या लेकी-सुनांचा आदर करण्याची असते. दुसऱ्यांची शेती व पिके पाहून त्यांना स्वत:ची पिके आठवतात. दुसऱ्यांच्या लेकी-सुना पाहून त्यांना स्वत:च्या लेकी-सुना आठवतात आणि ते अत्याचार करीत नाहीत. नासधूस व लूट करीत नाहीत. अब्रू घेत नाहीत. शेतीशी जिवंत संबंध असलेला मनुष्य लुटारू होत नाही.

सैन्यातला शिपाई समाजातल्या कोणत्या थरातून येतो, कोणत्या वर्गातून येतो हे महत्त्वाचे असते.

यात दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा आहे.

इतर राजांचे आणि सरदारांचे सैन्य हे लुटारूंचे सैन्य होते. लूट करणे हाच तर त्यांचा हेतू होता. इतरांना राज्ये तरी कशासाठी हवी होती? लुटीसाठीच ना? मग ते लूट करणार नाहीत तर काय करणार? सैनिकी सामर्थ्याच्या जोरावर चैन करायची हाच ज्यांचा हेतू ते रयतेच्या अब्रूची व संपत्तीची पर्वा कशी करणार? शिवाजीच्या राज्याचा हेतू, शिवाजीच्या शिपाई बनलेल्या शेतकरी सैन्याचा हेतू लूट करणे नव्हता तर लूट थांबवणे हा

होता. वर्षानुवर्षे केलेल्या लुटीचा, अन्यायाचा प्रतिकार करायला जे सैन्य उभे ठाकले होते, ते लूट कसे करणार? अन्यायाचा प्रतिकार करायला जे उभे राहतात ते स्वत: अन्याय करीत नसतात.

याचा अर्थ शिवाजी महाराजांच्या सैन्यानं कधीही आणि कुठेही लूट केली नाही असा नाही. परमुलखांत जाऊन लूट केली होती. सुरतेची लूट तर प्रसिद्ध आहे. परंतु ही लूट करताना गरज म्हणून व आवश्यक म्हणून 'संपत्तीची' लूट केली. इतरांच्या 'अब्रूची' नव्हे.

यात आणखी एक मुद्दा आहे. इतर राजे सैनिकांना पगार न देता लुटीतला हिस्सा देत. स्वाभाविकच सैनिक जास्तीतजास्त लूट करीत. शिवाजी महाराजांनी सैनिकांना लुटीतला हिस्सा देण्याची रीत रद्द केली. लुटीचा सर्व ऐवज खजिन्यात जमा करायचा आणि सैनिकांना ठरावीक मेहनताना द्यायचा अशी रीत पाडली. यामुळे लूट करण्यात आणि जास्तीतजास्त लूट करण्यात शिपायांचा हितसंबंध राहिला नाही. लूट मिळो अगर न मिळो, कमी मिळो अगर जास्त मिळो सैनिकांना पगार मिळत असे. त्यामुळे उगाच लूट करण्याची, चैनीसाठी लूट करण्याची प्रवृत्ती राहिली नाही.[१२]

शिवाजी महाराजांचे स्वत:चे शुद्ध चारित्र्य, जाणीवपूर्वक हेतू मनाशी बाळगून दिलेल्या स्पष्ट आज्ञा, आज्ञेचा भंग करणाऱ्यांना जरब बसेल अशा शिक्षा, उत्पादक शेतकऱ्यांमधूनच केलेली सैन्याची रचना, शिपायांचा शेतीशी व कष्टाशी जिवंत संबंध, रोख पगार देण्याची रीत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अन्यायाचा व लुटींचा प्रतिकार करण्याच्या हेतूने सुरू केलेले कार्य यांमुळे शिवाजीचे सैन्य आणि इतर राजांचे सैन्य यात फरक होता. महाराष्ट्रातील सामान्य रयतेला शिवाजी महाराजांचे सैन्य हे लुटारू सैन्य वाटत नव्हते, तर लूट थांबवायला निघालेले संरक्षक सैन्य वाटत होते. रयत सैन्याला साहाय्य करीत होती आणि सैन्य रयतेला वाचवत होते.

सामान्य जनतेसाठी राज्य चालवण्याकरता सैन्य आणि रयत यांचे संबंध एकत्वाचे असावे लागत. सैन्याची जनतेला भीती वाटता कामा नये. सैन्य आणि जनता हे एकमेकांना पूरक राहतील अशी रचना करावी लागते. तरच यश मिळते. आधुनिक काळातसुद्धा अशी जनता आणि असे सैन्य यांची उदाहरणे आहेत. व्हिएतनामचे उदाहरण हे ताजे उदाहरण.

## व्यापारा-उद्योगांस संरक्षण

आपल्या राज्यातील वस्तूंचा व्यापार वाढावा म्हणून परराज्यातून येणाऱ्या मालावर जबर कर बसवून स्वदेशी मालाला संरक्षण देण्याचे धोरण सर्व आधुनिक देश वापरीत आले आहेत. परंतु सरंजामशाहीच्या मध्ययुगातसुद्धा शिवाजी महाराजांनी असा कर बसवून देशी व्यापारास व उद्योगांस उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले होते असे दिसते.

६ डिसेंबर १६७१ रोजी महाराजांनी कोकणातील कुडाळचे सरसुभेदार नरहरी आनंदराव यांना एक पत्र लिहिले आहे. त्या पत्रात महाराज लिहितात,

"संगमेश्वराहून बारदेशीचे मीठ महागच पडे ऐसा जकातीचा तह देणे. जरी जबरी जकातीचा तह नेदा, मुलाहिजा कराल म्हणजे कुल उदमी खळक बारदेशाकडे वोहडेल. आपली कुळ बंदरे पडतील. ऐसी गोष्टी आहे. तरी रोखा पावेल तेच घटिकेस कुळ घाटी जकाती जबर करणे..."[१३]

महाराजांच्या दूरदृष्टीचा आणि सर्वंकष दृष्टीचा हा आणखी एक पैलू आहे. स्वराज्यातील शेतीबरोबरच व्यापार-उदिमांचीही काळजी महाराज घेत असत.

शिवाजी महाराजांच्या काळात महाराष्ट्रात डच व्यापारी व्यापार करीत होते. त्यांनी व्यापारास परवानगी मागितली. ती महाराजांनी दिली. परंतु काही बंधने लादली. त्यात जकातीचे एक बंधन आहे. शिवाजी महाराजांनी डच कंपनीला २४ ऑगस्ट १६७७ रोजी कौलनामा दिला. त्यात म्हटले आहे,

"जिंजी प्रांताच्या परिसरात डच कंपनीला व्यापार करण्यास परवानगी देण्यात येत आहे. डचांना कुड्डालोर येथे मालावर अडीच टक्के जकात भरावी लागेल."[१४]

"सर्व आयात व निर्यात मालाची आगाऊ माहिती दिल्यास अधिकारी मालाची पार्सल तपासणीसाठी उघडणार नाहीत. हवालदार व इतर अधिकारी यांना योग्य तो भाव (कर) दिल्याशिवाय कंपनीचा माल घेण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे."

## गुलामांच्या व्यापारास बंदी

वर उल्लेखलेल्या कौलनाम्यात किंवा करारात गुलामांच्या व्यापारास प्रतिबंध करणारे एक महत्त्वाचे व आजवर बऱ्याच प्रमाणात दुर्लक्षित झालेले



124298

एक कलम आहे. ते असे, "मुसलमानांच्या राज्यात कोणाकडूनही अटकाव न होता तुम्हाला स्त्री व पुरुष यांची गुलाम म्हणून खरेदी व विक्री करण्यास परवानगी होती. परंतु आता माझ्या राज्यात तुम्हांस स्त्रियांची किंवा पुरुषांची गुलाम म्हणून खरेदी व विक्री करण्यास संमती नाही. जर तुम्ही तसे करण्याचा प्रयत्न केलात तर माझे लोक तुम्हांस प्रतिबंध करतील. हे कलम कटाक्षाने पाळले पाहिजे."[१५]

ज्या काळात गुलामांचाही व्यापार भारतात कुठे कुठे चालत होता; स्त्री-पुरुष मजूर पकडून गुलाम करून परदेशी जबरीने नेले जात होते अशा काळात स्वतःच्या रयतेचा गुलाम म्हणून व्यापार करण्यास शिवाजी महाराज प्रतिबंध करीत होते.

सर्व ठिकाणी, सर्व बाबतीत रयतेची सर्व प्रकारची काळजी घ्यावयाची, हे शिवाजी महाराजांच्या राज्याचे धोरण होते.

❑❑❑

# ३. धर्मश्रद्ध – पण धर्मद्वेष्टा नव्हे

## शिवाजी आणि धर्म

शिवाजी महाराजांचा एकूण धर्माविषयी दृष्टिकोन काय होता? व्यवहार कसा होता? हिंदू धर्मासंबंधी आणि मुस्लीम धर्मासंबंधी शिवाजी कसा वागला? हे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे प्रश्न आहेत. सांप्रत काळाच्या दृष्टीनेसुद्धा हे प्रश्न महत्त्वाचे आहेत.

शिवाजी हिंदू होता. शिवाय तो महाराष्ट्रात जन्माला आला व त्याची कर्मभूमीही महाराष्ट्रच होती. यामुळे हिंदूंना शिवाजीसंबंधी अभिमान वाटतो. साहजिकच आहे. त्यातल्यात्यात महाराष्ट्रीय हिंदूंना जरा जास्तच अभिमान वाटतो. तेही स्वाभाविकच आहे. त्यात गैर असे काही नाही. स्वत:चे थोरपण, स्वत:च्या धर्माचे मोठेपण, स्वत:च्या प्रदेशाचे मोठेपण हे स्वत:च्या प्रदेशातील आणि स्वत:च्या धर्मातील नामवंत, कीर्तिवंत, गुणी व थोर इतिहास-पुरुषांच्या प्रकाशात बघणे व मांडणे हा मानवी स्वभाव आहे.

त्या प्रदेशातील, त्या धर्मातील अशा थोर व्यक्तींची संख्या जितकी कमी असेल तितक्या जास्त प्रमाणात हा अभिमान दुणावतो.

तथापि स्वधर्मातील थोर पुरुष म्हणून त्या पुरुषाची जी प्रतिमा आपण निर्माण करतो, ती अनेकदा अनवधानाने भडक रंगवली जाते. अनेकदा स्वत:ला सांप्रतकाळी सोईचे म्हणून मुद्दाम एकांगी रीतीने रंगवली जाते आणि असे करीत राहण्याच्या क्रमात विकृती तयार होते व मूळ खरी प्रतिमा वाकडीतिकडी तयार होते.

शिवाजी महाराजांचे कार्य, त्यांचा कारभार, त्यांचा काळ, त्यांनी केलेल्या सुधारणा आणि विशेषत: त्यांचा धर्मासंबंधीचा दृष्टिकोन या बाबतीतील त्यांची जनमानसातील प्रतिमा यथायोग्य व ऐतिहासिकदृष्ट्या बरोबर तयार न व्हायला अनेक कारणे आहेत.

महाराष्ट्रातल्या निरक्षर, अडाणी माणसालासुद्धा शिवाजी माहीत आहे. त्याच्या कथा माहीत आहेत. ठिकाणं, नावं, प्रसंग, संबंध इत्यादी अनेक बाबी माहीत आहेत. ही माहिती या खेडोपाडीच्या निरक्षरांपर्यंत कशी पोहोचली?

शिवाजी, शिवकाल, शिवचरित्रातील चमत्कृतीपूर्ण प्रसंग, उदात्त प्रसंग, नाट्यमय प्रसंग इत्यादींवर महाराष्ट्रात अनेक पोवाडे रचले गेले. शिवाजी महाराजांच्या काळात व तिथून आज अखेर महाराष्ट्रात असा एक तरी शाहीर होऊन गेला की त्याने शिवाजीवर एकही पोवाडा वा लावणी वा गाणे रचले नाही? याचे स्पष्ट उत्तर 'नाही' असेच आहे. सर्वांनी ते केले आणि ते साहजिकच होते. जी कथा पोवाड्यांची तीच कथा लोकगीतांची व लोककथांची, तीच स्थिती कीर्तनांची, तीच अवस्था आख्यानांची व व्याख्यानांची, तीच स्थिती तमाशांची, नाटकांची व सिनेमांची. निरक्षर अडाणी लोकांपर्यंत ह्याच माध्यमातून इतिहास पोहोचतो.

जाणूनबुजून खोडसाळपणे घुसडलेल्या विकृती सोडल्या आणि अनवधानाने झालेला एकांगीपणा सोडला तरी या प्रचार व प्रसारमाध्यमांच्यासुद्धा काही मर्यादा आहेत.

करमणूक करून घेण्याच्या मुख्य इराद्याने जमलेल्या जनसमुदायास शेवटपर्यंत पोवाडा वा नाटक ऐकायला व बघायला भाग पाडायचेच असेल तर चमत्कृतीखेरीज कसे चालेल? अतिशयोक्ती केली नाही, आलंकारिकता आणली नाही अन् नुसते अंकगणित छाप सैन्याचे आकडे अन् सनावळ्याच सांगितल्या अन् तार्किक पद्धतीनं विश्लेषण केलं तर या कार्यक्रमांचा दुसरा प्रयोग तरी होईल का? शिवाय ऐकणाराच्या जाणिवेची पातळी लक्षात ठेवूनच पोवाडा इत्यादी लिहावे लागते. पुन्हा लिहिणाऱ्याच्या स्वत:च्या जाणिवेच्या मर्यादा असतात. तेव्हा या माध्यमांच्या मर्यादा शिवाजीची प्रतिमा आहे तशी करायला कारणीभूत आहेत, हे खरे. अर्थात त्याला आपमतलबीपणा, वर्तमानातील प्रासंगिक स्वार्थ, इतिहासाकडे पाहण्याची चुकीची पद्धत, संशोधक वृत्तीचा अभाव किंवा किमानपक्षी अपुरेपणा इत्यादी दुसरीही कारणे आहेत. असो.

## शिवाजी व मुसलमान

'शिवाजी हा मुसलमानांच्या विरुद्ध होता', 'त्याचे जीवितकार्य मुसलमान धर्माचा प्रतिकार करणे हे होते', 'तो हिंदू धर्मरक्षक होता', 'हिंदू पदपातशहा होता', 'गोब्राह्मण प्रतिपालक होता' अशी प्रतिमा बऱ्याच विस्तृत प्रमाणात जनमानसात आहे.

'शिवाजी न होता, तो सुंता होती सबकी' हे भूषण कवीचे कवन हा दृष्टिकोन व्यक्त करते. 'शिवाजीचे युद्ध हे धर्मयुद्ध होते', 'धर्म ही शिवाजीच्या कार्याची प्रेरणा होती', 'शिवाजी धर्मासाठी लढला', 'तो धर्मासाठी लढला म्हणूनच यशस्वी झाला', 'खरे म्हणजे तो परमेश्वराचाच अवतार होता', 'तो विष्णूचा किंवा शिवाचा अवतार होता. परमेश्वराने हा अवतार धारण केला तो धर्मरक्षणाकरताच केला होता', 'भवानी मातेने शिवाजीला जी तलवार दिली ती धर्मरक्षणाकरताच दिली', 'शिवकार्याचा आधार धर्म नसता तर शिवाजी यशस्वी होऊ शकला नसता इत्यादी इत्यादी'. असे अनेक समज जनमानसात खूपच विस्तृत प्रमाणात आहेत.

ऐतिहासिक सत्याच्या आधारावर ही सर्व प्रमेये नीट तपासून घ्यायला हवीत. आपण हिंदू आहोत म्हणून किंवा ही प्रमेये खरी असणे आपणास सांप्रत काळी सोईचे होईल म्हणून ती तशीच आंधळ्या श्रद्धेने स्वीकारणे योग्य होणार नाही किंवा उलट पक्षी ''आपण मुस्लीम धर्माचे आहोत. हिंदूंचा द्वेष करायला मुसलमानांना शिकवणे ही आपली आजची गरज आहे. बरेच हिंदू 'शिवाजी महाराज की जय' म्हणतात म्हणून आपणही तो हिंदू धर्माचा रक्षक व मुसलमान धर्माचा भक्षक होता असे चिकित्सा न करता मानूया'' हा दृष्टिकोनसुद्धा तितकाच चूक होय. वस्तुस्थिती काय सांगते?

## शिवाजी, प्रताप व पृथ्वीराज इत्यादी

शिवाजी हा हिंदू होता किंवा हिंदू धर्मरक्षक होता म्हणून तो यशस्वी झाला असे म्हणावे, तर मग राणा प्रताप किंवा पृथ्वीराज चौहान हे यशस्वी का झाले नाहीत? खरे म्हणजे हे दोघे तर निर्विवादपणे 'उच्चवर्णीय क्षत्रिय हिंदू' होते. शिवाजीच्या क्षत्रियत्वासंबंधी निदान काहींना तरी शंका होती. शौर्य, त्याग, जिद्द, कष्ट इत्यादी बाबतीत राणा प्रताप आणि पृथ्वीराज शिवाजीपेक्षा कमी नव्हते. कदाचित काकणभर वरचढच असतील. मग असे का व्हावे? धर्मयुद्ध म्हणावे, तर एकजण धर्मयुद्धात यशस्वी होतो अन् या दुसऱ्या दोघांना

पराजित' होऊन परागंदा का व्हावे लागते? हे हिंदू राज्य व्हावे ही 'श्रींची' इच्छा असे मानावे तर मग 'श्रींना' राणा प्रतापच्या अन् पृथ्वीराज चौहानाच्या प्रदेशातही 'हिंदू राष्ट्र व्हावे' अशी इच्छा का झाली नाही?

हिंदू धर्मावरील निष्ठेमुळे शिवाजीला यश प्राप्त झाले हे खरे नाही. धर्मरक्षणाखेरीज शिवाजी दुसरे आणखी काहीतरी चांगले करायला निघाला होता असे दिसते.

समजा की, शिवाजीच्या काळात मुसलमान धर्माखेरीज इतर दुसऱ्या कोणत्या तरी धर्माचे राजे असते—अगदी हिंदू धर्माचे राजे असते—तर मग शिवाजीने मुसलमानांचा द्वेष केला असता का? शिवाजी मुसलमान राजांविरुद्ध का लढला? ते मुसलमान होते म्हणून की राजे होते म्हणून? आणि दोन्ही कारणांमुळे लढला तर त्यातील प्रमुख व महत्त्वाचे कारण कोणते? ते राजे होते हे महत्त्वाचे की ते मुसलमान होते हे महत्त्वाचे?

## काही मुस्लीम राज्यकर्त्यांची धार्मिक सहिष्णुता

शिवाय सर्वच मुसलमान राजे हिंदूंबद्दल आणि हिंदू धर्माबद्दल असहिष्णू होते असे दिसत नाही. इतिहासात मुस्लीम राज्यकर्त्यांच्या हिंदू धर्माबद्दलच्या सहिष्णू वृत्तीचे अनेक पुरावे उपलब्ध आहेत. विशेषतः ज्या महाराष्ट्रात शिवाजीनं कार्य केलं त्या मुलखातील मुसलमान शाह्यांच्या सहिष्णू वृत्तीचे व हिंदूंशी असलेल्या राजकीय व कौटुंबिक संबंधांचे अनेक पुरावे आहेत.

पारसनीसांच्या 'मराठे सरदार' या पुस्तकातील हा उतारा पहा :

"निजाम, कुतूब व आदिलशाहीत मराठ्यांचे प्राबल्य फार असे. निजामशाहीचा मूळ पुरुष गांगवी हा बहिरंभट कुलकर्णी यांचा मुसलमान झालेला मुलगा होता. अहमदनगरच्या बादशहाचा बाप पण हिंदूच होता. विजापूरचा संस्थापक युसूफ आदिलशहाने मराठ्याची मुलगी केली होती. बेदरच्या कासीम बरीद या संस्थापकाच्या मुलाने पण साबाजीच्या मुलीशी लग्न केले होते. या संस्कारामुळे हिंदूंबद्दल सहिष्णुता असून मराठ्यांचे प्राबल्य या पाचही राज्यांत होते..."[१६]

त्याच पुस्तकातील न्या. रानडे यांचा उद्धृत केलेला हा आणखी एक उतारा पहा :

"दक्षिणेतील मुसलमानांचे उत्तरेकडील कडव्या धर्माभिमानी (मुसलमान)

जातींपासून दुरीकरण, बहामनी राज्यात हिंदूंविषयी चांगले मत व त्यांचे प्राबल्य, वसुली व खजिना या खात्यांत ब्राह्मण व प्रभू यांचा प्रवेश, त्यांच्यामुळे सरकारी दप्तरात मराठी भाषेचा शिरकाव, शक्तीचे समतोलन होऊन मराठी शिलेदारास बढत्या, बादशहाचे हिंदू मुलींशी शरीरसंबंध झाल्यामुळे हिंदूंची दरबारावर पडलेली छाप, बाटलेल्या हिंदूंचे स्वजातीयांवरील उत्कट प्रेम, या सर्व कारणांमुळे दक्षिणेतील बादशहांच्या ठिकाणी हिंदूंबद्दल सहिष्णुभाव उत्पन्न होऊन हिंदूंना उत्तेजन, सवलती व अधिकार मिळाले होते.''[१७]

बहामनी राज्याचा संस्थापक हसन गंगू बहामनी याच्या नावाचे स्पष्टीकरणसुद्धा काय सांगते? हसन जाफर या नावाचा एक मुसलमान मनुष्य गंगू नावाच्या कुणा ब्राह्मणाकडे पूर्वायुष्यात नोकरी करीत होता. पुढे तो दिल्लीच्या बादशहाच्या (तुघलक) पदरी मोठा सरदार झाला. तो बादशहाचा महाराष्ट्रातील सुभेदार होता. त्यानं बादशहाविरुद्ध बंड केलं व महाराष्ट्रात स्वत:चं राज्य स्थापन केलं. पूर्वीच्या धन्याची आठवण व कृतज्ञता म्हणून तो स्वत:चं नाव अर्धे मुसलमान व अर्धे हिंदू असं हसन गंगू लावू लागला. स्वत:च्या राज्यास बहामनी म्हणजे 'ब्राह्मणाशी संबंधित' असे म्हणून लागला.

हिंदू-मुस्लीम संबंध शत्रुत्वाचे व टोकाच्या शत्रुत्वाचे असते तर असे घडले नसते.

जोवर त्यांच्या राज्याला हिंदूंकडून धोका निर्माण होत नाही; जोवर हिंदू सरदार त्यांच्या राज्याला मदतच करतात, तोवर मुस्लीम राज्यकर्ते हिंदूंसंबंधी सहिष्णू होते. राज्यालाच जर धोका निर्माण झाला तर मग मुस्लीम असो की हिंदू ते असहिष्णू होते.

हिंदू की मुस्लीम हे महत्त्वाचे नव्हते. राज्य महत्त्वाचे होते.

दिल्लीचेसुद्धा सर्व सुलतान कडवे मुसलमान होते हे खरे नाही. अकबराची सहिष्णुता सर्वांना ज्ञात आहे. त्याने तर 'दिनेइलाही' या नावाने एक नूतन संमिश्र धर्म स्थापण्याचा प्रयत्न केला. त्या काळी सांस्कृतिक एकता बऱ्या प्रमाणात निर्माण झाली होती. तोरडमल हा हिंदू प्रधान मुस्लीम राजाच्या पदरी स्वत:ची बुद्धी कारणी लावतच होता. शहाजहान बादशहाच्या पदरी उच्च कुलीचे अस्सल तेलंगे ब्राह्मण जगन्नाथ पंडित संस्कृत भाषेत काव्य करीत.

पंडितराज जगन्नाथांची एक कथा प्रसिद्ध आहे. शहाजहानाच्या पदरी

असलेल्या या हिंदू पंडितानं आपल्या पदरी यावे व हिंदू राजांचे भूषण वाढवावे म्हणून जयपूरच्या हिंदू राजाने त्यांना बोलावले होते. या आमंत्रणाला पंडितराज जगन्नाथांनी पाठवलेले उत्तर मासलेवाईक आहे. त्यांनी उत्तरादाखल लिहिले,

"दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा मनोरथान् पुरविंतु समर्थ: अन्यैनृपालै: परिदीयमानं शाकाय वा स्थल्लवणाम वा स्थान।" (माझे मनोरथ पूर्ण करण्याचे सामर्थ्य केवळ दिल्लीश्वर (दिल्लीचा राजा) किंवा जगदीश्वर (परमेश्वर) या दोघांच्यातच आहे. बाकी राजांनी मला काही देण्याचे मनात आणलेच तर ते फार तर माझ्या मीठ-मिरचीला पुरण्याइतपतच राहील.)

दिल्लीश्वराची जात महत्त्वाची नव्हती. तो जे देतो आणि जितके देतो ते महत्त्वाचे होते. शहाजहानचा मुलगा दारा हा संस्कृतचा जाणकार होता. त्याची बैठक काशीच्या संस्कृत पंडितांत असे. त्याच काळी 'छांदोग्य उपनिषद', 'बृहदारण्यक उपनिषद', 'केनोपनिषद' इत्यादी उपनिषदांच्या नावांच्या चालीवर 'अल्लोपनिषद'सारखे लिखाण झाले होते.[१८]

शेजवलकरांनी तर असे लिहून ठेवले आहे की, "औरंगजेबाच्या ऐवजी त्याचाच थोरला भाऊ दारा हा राज्यावर बसला असता तर या अफाट देशाचे एकीकरण एकाच राजवटीखाली होऊन हा देश बळकट होण्याचा संभव निर्माण झाला असता."[१९] थोडक्यात, म्हणजे सर्वच मुसलमान राज्यकर्ते हिंदू धर्मद्वेष्टे नव्हते.

## शिवाजीचे मुसलमान सरदार

शिवाजीच्या पदरी अनेक मुसलमान सरदार, वतनदार व इतर चाकर होते आणि ते अगदी मोठमोठ्या हुद्द्यांवर व जबाबदारीच्या जागांवर होते.

शिवाजीच्या तोफखान्याचा प्रमुख एक मुसलमान होता. त्याचे नाव इब्राहिमखान. तोफखाना म्हणजे लष्कराचे एक प्रमुख अंग. कदाचित सर्वात महत्त्वाचे. तोफा हे त्या काळचे सर्वात प्रगत हत्यार. किल्ल्यांच्या लढाईत त्याचे महत्त्व फार मोठे. अशा महत्त्वाच्या तोफखान्याचा प्रमुख एक मुसलमान होता.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचं उदाहरण म्हणून त्यांनी केलेली आरमाराची उभारणी सांगण्यात येते आणि ते बरोबरच आहे. कोकणपट्टीच्या विस्तृत भूभागाला समुद्राचे सान्निध्य आहे. या सर्व भागाच्या रक्षणासाठी आरमार

आवश्यक होते. ते शिवाजीने उभारले. या अशा महत्त्वाच्या विभागाचा प्रमुखसुद्धा एक मुसलमान सरदार होता. त्याचे नाव दौलतखान. दर्यासारंग दौलतखान.

शिवाजीच्या खास अंगरक्षकांत व खाजगी नोकरांत अत्यंत विश्वासू म्हणून मदारी म्हेतर याचा समावेश होता. आग्र्याहून सुटकेच्या नाट्यमय प्रसंगात या विश्वासू मुसलमान साथीदाराने शिवाजीराजांना काय म्हणून साथ दिली? शिवाजी मुस्लीमद्वेष्टा असता तर असे घडले असते का?

शिवाजीच्या पदरी असे अनेक मुसलमान चाकर होते. त्यात काजी हैदर हा एक होता. सालेरीच्या लढाईनंतर औरंगजेबाच्या दक्षिणेतील अधिकाऱ्यांनी शिवाजीशी सख्य जोडावे म्हणून एक हिंदू ब्राह्मण वकील पाठवला. तेव्हा शिवाजीनं उलट काजी हैदर यास मोंगलांकडे पाठवलं. म्हणजे मुसलमानांचा वकील हिंदू आणि हिंदूंचा वकील मुसलमान. त्या काळातील समाजाची फाळणी हिंदू विरुद्ध मुसलमान अशी असती तर असे घडले नसते.

सिद्दी हिलाल हा असाच आणखी एक मुसलमान सरदार शिवाजीच्या पदरी होता. १६६०मध्ये रुस्तूमजमा व फाजलखान यांचा शिवाजीनं रायबागेजवळ पराभव केला. त्या वेळी सिद्दी हिलाल शिवाजीच्या बाजूनं लढला त्याप्रमाणेच १६६० मध्ये सिद्दी जौहरने पन्हाळगडास वेढा दिला होता तेव्हा नेताजी पालकरनं त्यांच्या सैन्यावर छापा घालून वेढा उठवण्याचा प्रयत्न केला त्या वेळीसुद्धा हिलाल व त्याचा पुत्र वाहवाह हे नेताजीबरोबर होते. या चकमकीत सिद्दी हिलालला पुत्र वाहवाह जखमी व कैदी झाला होता.

हिंदू शिवाजीच्या बाजूने मुसलमान सिद्दी हिलाल आपल्या पुत्रासह मुसलमानांच्या विरोधात लढला.

त्या लढ्यांचे स्वरूप निव्वळ हिंदू विरुद्ध मुसलान असे असते तर असे घडले असते का? सभासद बखरीत ७६ पानावर शिवाजीच्या अशाच एका मुसलमान शिलेदाराचा उल्लेख आहे. त्याचे नाव शामाखान. राजवाड्यांच्या 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या ग्रंथाच्या खंड १७ मधील पान १७वर नूरखान बेग याचा 'शिवाजीचा सरनोबत' म्हणून उल्लेख आहे.[१०]

हे सरदार एकटे नव्हते हे स्पष्टच आहे. त्यांच्या हाताखालील मुस्लीम शिपायांसह ते शिवाजीच्या चाकरीत होते.

पण या सर्वांहून एक महत्त्वाचा अस्सल पुरावा आहे. त्यावरून मुस्लीम धर्मीय शिपायांबद्दलचे शिवाजी महाराजांचे धोरणच स्पष्ट होते.

रियासतकार सरदेसाई यांच्या 'शककर्ता शिवाजी' या पुस्तकातील हा उतारा पहा,

"...सन १६४८च्या सुमारास विजापूरच्या लष्करातले पाचसातशे पठाण शिवाजीकडे नोकरीस आले. तेव्हा गोमाजी नाईक पानसंबळ याने त्याला सल्ला दिला, तो फार चांगला म्हणून शिवाजीने मान्य केला व पुढे तेच धोरण ठेवले. नाईक म्हणाला,

"तुमचा लौकिक ऐकून हे लोक आले आहेत त्यांस विन्मुख जाऊ देणे योग्य नाही. हिंदूंचाच संग्रह करू, इतरांची दरकार ठेवणार नाही अशी कल्पना धरिली तर राज्य प्राप्त होणार नाही. ज्यास राज्य कारणे त्याने अठरा जाती, चारी वर्ण यांस आपापले धर्माप्रमाणे चालवून त्यांचा संग्रह करून ठेवावे."[२१]

१६४८ मध्ये अजून शिवाजीचं संपूर्ण राज्य स्थापन व्हावयाचं होतं. स्थापन करण्यासाठी काय धोरण होते हे वरील स्पष्ट आधारावरून व्यक्त होतं.

ग्रँड डफनेसुद्धा त्याच्या शिवाजीवरील चरित्र ग्रंथात पृष्ठ १२९वर गोमाजी नायकाच्या सल्ल्याचा उल्लेख करून म्हटले आहे की,

"यानंतर शिवाजीने आपल्या सैन्यात मुसलमानांनासुद्धा सामावून घेतले आणि त्यांच्या स्थापनेत याचा फार मोठा उपयोग झाला..."[२२]

शिवाजीचे सरदार व शिवाजीचे सैन्य हे फक्त हिंदू धर्माचे नव्हते. त्यात मुस्लीम धर्मीयांचासुद्धा भरणा होता. हे यावरून स्पष्ट व्हावे. शिवाजी हा मुस्लीम धर्म नाहीसा करण्याचे कार्य करीत असता तर हे मुस्लीम शिवाजीच्या पदरी राहिले नसते. शिवाजी मुस्लीम राज्यकर्त्यांचे जुलमी राज्य नाहीसे करायला निघाला होता. रयतेची काळजी वाहणारे राज्य आणायला निघाला होता. म्हणून मुस्लीमसुद्धा त्याच्या या कार्यात सहभागी झाले होते.

धर्माचा प्रश्न मुख्य नव्हता. राज्याचा प्रश्न मुख्य होता. धर्म मुख्य नव्हता. राज्य मुख्य होते. धर्मनिष्ठा मुख्य नव्हती. राज्यनिष्ठा व स्वामिनिष्ठा मुख्य होती.

## मुसलमान राज्यकर्त्यांच्या पदरी हिंदू सरदार

ज्याप्रमाणे शिवाजीच्या पदरी मुसलमान सरदार व सैन्य होतं त्याचप्रमाणे मुसलमान राजांच्या—शहेनशहांच्या—पदरी अगणित मराठे व हिंदू सरदार होते. त्यांची यादी तर खूपच मोठी आहे.

खुद्द शिवाजी महाराजांचे वडील विजापूरच्या मुस्लीम आदिलशहाच्या पदरी मोठे सरदार होते. शहाजी महाराजांचे सासरे लखुजी जाधव निजामशाहीचे महाराष्ट्रातील एक मनसबदार होते. जावळीचे मोरे, फलटणचे निंबाळकर, सावंतवाडीचे खेमसावंत, शृंगारपूरचे सूर्यराव शृंगारपुरे हे सर्वजण आदिलशाहीचे मनसबदार होते.

ज्याच्या सैन्यसामर्थ्यापुढे आणि डावपेचांपुढे शिवाजी महाराजांना हार पत्करावी लागली व नामुष्कीचा तह करून आग्र्यास जाऊन संभाजीसह कैद होऊन पडावं लागलं, तो उत्तरेचा मातब्बर सरदार मिर्झाराजे जयसिंह तर अस्सल रजपूत हिंदू होता आणि मुस्लीम शहेनशहाच्या पदरी मानाची असेल पण चाकरीच करीत होता. मिर्झाराजे जयसिंह शिवाजीवर चाल करून आला तेव्हा त्याच्या सैन्यात अनेक हिंदू सरदार होते, जाट होते, मराठे होते, रजपूत होते. राजा रायसिंग सिसोदिया, सुजनसिंग बुंदेला, हरीभान गौर, उदयभान गौर, शेरसिंग राठोड, चतुर्भुज चौहान, मित्रसेन, इंद्रभान बुंदेला, बाजी चंद्रराव, गोविंदराव इत्यादी इत्यादी.

कोंडाणा किल्ला हस्तगत करताना तानाजी मालुसरे वीरमरण पावला आणि कोंडाण्याचा सिंहगड झाला. त्या लढाईतील कोंडाण्याचा किल्लेदार उदयभानू हा एक हिंदू रजपूतच होता आणि तो मुसलमान राजाचा किल्लेदार होता.

अकबराच्या पदरी पाचशेहून अधिक मनसब असणारे जेवढे सरदार होते त्यात हिंदू सरदारांचे प्रमाण २२.५ टक्के होते. शहाजहानच्या राज्यात हे प्रमाण २२.४ टक्के होते. अगदी सर्व मुस्लीम राज्यकर्त्यांत अगदी कडवा म्हणून तो समजला जातो, त्या औरंगजेबाच्या पदरी सुरुवातीला हिंदू मनसबदारांचे हे प्रमाण २१.६ टक्के होते. ते पुढे वाढले व ३१.६ टक्के झाले.[२१]

औरंगजेबानेच राजा जसवंतसिंग या हिंदू रजपूतला दक्षिणेचा सुभेदार नेमले होते. याच औरंगजेबाचा पहिला प्रधान रघुनाथदास नावाचा हिंदू होता.

तो स्वत: राजपूत असताना राजपूतांच्या विरुद्ध लढला. राणा प्रतापसिंगाच्या सैन्याचा एक सेनापती हकीमखान नूर हा मुस्लीम होता. पानिपतच्या लढाईत पेशव्यांच्या तोफखान्यांचा प्रमुख इब्राहिमखान गारदी मुस्लीम होता.

जे हिंदू मुसलमान राजाच्या पदरी इमानेइतबारे चाकरी करीत होते आणि धन्याशी इमान राखून प्रसंगी हिंदूंविरुद्धसुद्धा लढत होते, त्यांना त्या काळी कुणी 'धर्मबुडवे' किंवा 'धर्मद्रेष्टे' किंवा 'मुस्लीमधार्जिणे' म्हणत नव्हते. धर्मनिष्ठेपेक्षा स्वामिनिष्ठेला जास्त मान्यता होती.

प्राचीन व मध्ययुगीन भारतात धर्मामुळे व धर्मासाठी लढाया होत नव्हत्या, लढायांचे मुख्य कारण राज्य मिळवणे, राज्य बळकावणे वा टिकवणे हे होते. हे करायला उपयोगी ठरेल तेवढ्यापुरता धर्माचा वापर केला जाई हे खरे. परंतु ती मुख्य बाब नव्हती.

अशी कितीतरी उदाहरणे सांगता येतील.

## मुसलमान विरुद्ध मुसलमान
## हिंदू विरुद्ध हिंदू
## हिंदू-मुसलमान विरुद्ध हिंदू-मुसलमान

शिवाजी महाराजांच्या पदरी मुस्लीम सरदार, चाकर व सैन्य होते व मुस्लीम राजांच्या पदरी हिंदू सरदार, चाकर व सैन्य होते, हे जसे खरे आहे तसेच त्या काळात कोण कोणाविरुद्ध लढला ह्याची पाहणी केली तर त्या लढाया केवळ हिंदू विरुद्ध मुसलमान अशाच झाल्या असे दिसत नाही.

मुस्लीम धर्म मानणाऱ्या राजांमध्ये आपसात लढाया होत होत्या.

इब्राहिमखान लोदी या मुसलमान दिल्लीपतीचा पराभव करूनच दुसरा मुसलमान बाबर दिल्लीपती झाला आणि त्यानेच मोंगल राजवट स्थापन केली. हुमायून आणि शेरशहा हे दोघेही इस्लाम धर्म मानणारे होते, परंतु ते एकमेकांशी प्राणपणाने लढले. विजापूर व गोवळकोंड्याच्या शाह्या ह्या मुसलमान शाह्या होत्या. औरंगजेब या मुस्लीमधर्मीय शाह्यांविरुद्ध दीर्घकाळ लढला. धर्म महत्त्वाचा नव्हता, तर राज्य महत्त्वाचे होते. धर्माला महत्त्व असेल तर दुय्यम होते, मुख्य गोष्ट राज्य होते.

एका बाजूला राणा प्रताप आणि दुसऱ्या बाजूला अकबर अशी सुप्रसिद्ध लढाई हळदीघाटात झाली. राजस्थान, रजपूत आणि राणा प्रताप यांच्या दृष्टीने

ही लढाई अतिमहत्त्वाची पण हळदीघाटीच्या या लढाईस हिंदू-मुसलमान यांच्या मधली लढाई असे म्हणता येईल काय?

मुसलमान अकबराच्या सैन्याचे नेतृत्व राजपूत मानसिंगाकडे होते. त्या सैन्यात ६०,००० मोंगल सैन्य तर ४०,००० रजपूत सैनिक होते. राणा प्रतापच्या सैन्यात जसे ४०,००० रजपूत सैनिक होते तसेच 'हकीमखान नूर' याच्या नेतृत्वाखाली पठाणांची एक मोठी तुकडी होती. तसेच ताजखान या पठाण राजाचे घोडदळही होते. त्याच्या तोफखान्याचा प्रमुखही एक मुसलमान सरदार होता.[२४]

गुरुगोविंदसिंहदेखील औरंगजेबच्या काळात केंद्रीय मुस्लीम सत्तेविरुद्ध लढले. त्यांच्या सैन्यातदेखील शीखांबरोबर हजारो मुसलमान होते. औरंगजेबच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसांत सत्ता-स्पर्धा झाली. त्यात त्यांनी बहादूरशहाला मदत केली.

जाट, रजपूत, मराठा, शीख यांच्या उठावामागे धार्मिक आधार फार कमी होता. प्रामुख्यानं ते केंद्रीय सत्तेच्या जाचक धोरणांविरुद्धचे उठाव होते. त्या काळात स्वामिनिष्ठेच्या कल्पनेमुळे धर्माचा विचार न करता सरदार, जहागीरदार व सैनिक आपल्या स्वामीची सेवा करीत असत. सरंजामी युगातल्या खड्या सैन्यामध्ये हिंदू राष्ट्रवादाची किंवा इस्लाम प्रसाराची भावना नसे. राजा जोवर पोटाला देतो तोवर इमानेइतबारे त्याची चाकरी करायची ही त्या काळात सर्वमान्य नीती होती.

## देवळांची लूट, मोडतोड इत्यादी

"मुसलमान राजे हे क्रूर होते. त्यांनी देवळे पाडली, देवळे भ्रष्ट केली, धर्म बुडवला म्हणून सर्व मुसलमान हिंदूंविरुद्ध व हिंदू धर्माविरुद्ध असतातच व आहेतच आणि ज्या अर्थी ते हिंदूंविरुद्ध आहेत त्या अर्थी हिंदूंनी त्यांच्याविरुद्ध असले पाहिजे" असा हिंदू संघटनांचा युक्तिवाद असतो व आहे.

धर्माधारे हिंदूंना संघटित करणाऱ्या संघटनांचा जसा हा युक्तिवाद असतो तसाच मुस्लीम धर्मावर आधारलेल्या मुस्लीम संघटनांचाही तसाच पण वेगळा युक्तिवाद असतो.

मुस्लीम संघटनांचे त्याच्या अनुयायांना प्रतिपादन असते की, "हिंदू धर्म

म्हणजे काफरांचा धर्म. आपल्या पूर्वजांनी तो बुडवण्यासाठी प्रयत्न केले ते बरोबरच केले. (जमले तर) आपणही तसेच करावे. निदान हिंदूंविरुद्ध आपण असावे" असा त्यांचा प्रचार असतो व आहे. आपण राज्यकर्ते परंतु राज्यकर्ते म्हणून आपले महत्त्व उरले नाही ही खंत आणि त्यातून संघटित होण्याचा त्यांचा हा प्रयत्न.

आक्रमक मुस्लीम सैन्यानं सत्ता काबीज करताना व राज्यविस्तार करताना हिंदूंची देवळे फोडली व लुटली हे सत्य आहे. परंतु ते पूर्ण सत्य नाही, अर्ध सत्य आहे. अरब, तुर्क, अफगाण इत्यादी आक्रमकांच्या टोळीवजा सैन्यांना नियमित पगार दिला जात नसे. त्यांनी लूट करावी आणि लुटीतल्या हिश्श्यातून त्यांचा पगार घ्यावा अशी रीत असे. हिंदूंच्या मंदिरांत खूप संपत्ती असे. आक्रमक सैन्य ही संपत्ती लुटत असे. लुटताना देवळे पाडत व संपत्ती वाटू घेत.

दऱ्याकपारीत आणि डोंगरमाथ्यावरच्या ज्या देवळांत संपत्ती नसे पण देव असत अशा देवळांच्या वाटेला हे आक्रमक सैन्य जात नसे. कारण काय? संपत्ती लुटणे हा मुख्य हेतू; देवळे पाडणे हा मुख्य हेतू नसे.

लुटीची संपत्ती मुख्य, धर्म दुय्यम. मुख्य हेतू साध्य करायला आवश्यक म्हणून देवळे पाडत. याच लुटीतला मोठा हिस्सा राजाकडे जाई. राजाचे उत्पन्नाचे ते एक साधन असे.

देवळाभोवतालच्या लोकांना नाउमेद करणे, त्यांची लढण्याची ऊर्मी मोडून त्यांच्यात भय निर्माण करणे हासुद्धा एक हेतू असे. लोक धर्मश्रद्ध व देवभोळे असत. ज्याने देव लुटला तो आपणास नक्कीच लुटेल असे भय तयार होई. "एवढे जागृत दैवत परंतु ते त्यांचे काही करू शकले नाही. मग आपण माणसे काय करणार?" अशी नाउमेद पसरे. मुलूख जिंकायला सोपे जाई.

त्या काळातील देवळे केवळ धर्मकेंद्रे नव्हती. ती संपत्तीची केंद्रे होती, मानाची केंद्रे होती आणि सत्तेचीही केंद्रे होती. देवळे लुटण्याचा आणखी एक फायदा होई. "आम्ही काफरांची देवळे फोडतो, त्यांचा धर्म बुडवतो" असे सांगून आपल्या लुटीला मुलामा चढवता येई. धर्मांध मुल्ला-मौलवींचा आणि त्यांच्या मार्फत एकूण मुस्लीम समाजाचा पाठिंबा मिळवायला सोपे जाई. स्वत:ची दुष्कृत्ये लपवायला धर्माचा उपयोग करून घेतला जाई.

## अगोदर लुटले मग इनाम दिले

राज्य प्रस्थापित करताना किंवा राज्यविस्तार करताना जे मुस्लीम देवळे लुटीत, तेच राजे एकदा राज्य जिंकले, स्थिरस्थावर झाले की मग मंदिरांना, देवळांना इनामे देत. अशी किती उदाहरणे आहेत.

धर्मनिष्ठ किंवा धर्मवेडा म्हणून प्रसिद्ध पावलेल्या औरंगजेबानं राज्यविस्तार करताना जी आक्रमणे केली त्या काळात मंदिरे उद्ध्वस्त केलीं हे खरे. परंतु त्याच औरंगजेबानं अनेक देवळांना धन दिले. अहमदाबादच्या जगन्नाथ मंदिराला त्यानं २०० गावे इनाम दिली आहेत. मथुरा व बनारस इथल्या हिंदू देवस्थानांनासुद्धा त्यानं देणग्या दिल्या आहेत.

अफजलखानाने पंढरपूर व तुळजापूर येथील मंदिरांतील मूर्ती फोडल्या की नाही यासंबंधी जाणत्यांत मतभेद आहेत. काहींच्या मते त्याने त्या फोडल्या होत्या, पण शेजवलकरांना वाटते की 'त्या फोडल्या नसाव्यात त्या फार प्राचीन वाटतात.'[२५] ते काही असो. पण अफजलखान वाईचा सुभेदार होता तेव्हा त्यानं अनेक भटा-भिक्षुकांची जुनी वतने चालू ठेवली व नवीन दिली अशा नोंदी आहेत व तेही सत्य आहे. शिवाय तुळजाभवनीचे मंदिर अफजलखानाने तोडलं म्हणून सांगतात. त्या वेळी खानांबरोबर पिलाजी मोहिते, शंकररावजी मोहिते, कल्याणराव यादव, नाईकजी सराटे, नागोजी पांढरे, प्रतापराव मोरे, झुंझारराव घाटगे, काटे, बाजी घोरपडे आणि संबाजीराव भोसले हे उपस्थित होते हे विसरून चालणार नाही. १७९१ मध्ये मराठ्यांकडून लुटीत पडझड झालेलं देवी शारदेचं शृंगेरीचं मंदिर मुसलमान टिपू सुलतानाने दुरुस्त केलं हे सर्वांना माहीत आहे.

राज्ये स्थिर झाल्यावर त्यांनी मंदिरांना देणग्या व इनामे का दिली? देणग्या व इनामे घेऊन हिंदू खूष राहत असतील व आपल्या राज्याला त्रास देत नसतील तर ते मुस्लीम राज्यकर्त्याला हवे होते.

देवळे पाडली व लुटली त्यालाही कारण राज्यच आणि देवळांना इनामे दिली किंवा देवळे दुरुस्त केली त्यालाही कारण राज्यच.

## राज्य मुख्य, धर्म दुय्यम

शिवाय फक्त मुस्लीम राजेच देवळे लुटीत होते हे खरं नाही. हिंदू राजेसुद्धा संपत्तीसाठी देवळे लुटीत असत.

काश्मीरचा ‘हर्षदेव’ नावाचा राजा हिंदूंचीसुद्धा मंदिरे लुटत असे. धातूसाठी मूर्ती वितळवी, वितळवण्यापूर्वी त्यांच्यावर विष्ठा व मूत्र शिंपडून त्यांचा पावित्र्यभंग करी इत्यादींचे तपशीलवार वर्णन कल्हणाच्या ‘राजतरंगिणी’ या ग्रंथात आहे. देवाच्या मूर्तीची विटंबना केली म्हणून त्या काळी दंगे झाल्याची नोंद मात्र नाही.

त्याची उत्पन्नाची जी खाती होती त्यात त्याने ‘देवोत्पादन’ हे खातेच उघडले होते.[२९]

मुस्लीम राज्याला त्रासदायक ठरू लागले तर मुस्लीम राज्यकर्ते मुस्लीम धर्मगुरूंची, मुल्ला-मौलवींचीसुद्धा पर्वा न करता त्यांनाही छळत.

बखरकारांनी महंमद तुघलकावर मुल्ला व सय्यद यांच्या कत्तली केल्याचा आरोप नोंदवून ठेवला आहे. काही इतिहासकारांनी असे लिहून ठेवले आहे की जहांगीर बादशहाला मुल्ला मंडळी एवढी घाबरत की तो आला की ती लपून बसत.

तात्पर्य काय? त्या काळातल्या राज्यकर्त्यांच्या दृष्टीनं राज्य महत्त्वाचं होतं; धर्म तितका महत्त्वाचा नव्हता. स्वत:चे राज्य स्थापायला आणि स्थिर करायला त्यांनी धर्माचा आधार घेतला हे खरं आहे. पण धर्म मुख्य नव्हता. राज्य मुख्य होते. पूर्ण सत्य हे असे आहे.

## शिवाजी महाराजांच्या मराठे व हिंदूंविरुद्ध लढाया

छत्रपती शिवाजी महाराजांना स्वत:चे राज्य स्थापन करण्यासाठी छोट्या-मोठ्या अनेक लढाया कराव्या लागल्या. राज्यकर्ते मुस्लीम धर्माचे होते. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध तर लढावे लागलेच, परंतु मराठ्यांविरुद्धसुद्धा अनेक लढाया लढाव्या लागल्या. इतिहासाने या लढ्यांच्या सविस्तर नोंदी ठेवल्या आहेत. त्याकडे दुर्लक्ष करणे हे बरोबर होणार नाही.

रियासतकार सरदेसाई आपल्या ‘मराठी रियासत’ या ग्रंथात म्हणतात, “विजापूरकरांशी युद्ध म्हणजे हिंदू-मुसलमानांतील युद्ध नव्हे. अशा प्रकारचे स्वरूप त्या युद्धास येणे शक्य नव्हते”, “शिवाजीची मोठी अडचण विजापूरकरांच्या ताब्यात गुंतलेली मोठी मोठी मराठे सरदार घराणीही होती. त्यांच्या मनात शिवाजीबद्दल आदर किंवा पूज्यबुद्धी नव्हती. मोहिते, मोरे, सावंत, दळवी, सुर्वे, निंबाळकर आदी शेकडो सरदार आरंभापासून कमी-

जास्त प्रमाणात शिवाजीच्या विरुद्ध होते.''

हे आणि इतर अनेक हिंदू-मराठे सरदार शिवाजीच्या विरुद्ध का होते? हे सर्वजण तर हिंदूच होते. धर्म मानणारे व अनुसरणारे होते. शिवकार्याचे स्वरूप हिंदू धर्मरक्षण करणे असे असते तर मग या सर्व हिंदूंनी त्याला विरोध का करावा?

रियासतकार सरदेसाईंप्रमाणेच सभासद, केपन, पारसनीस यांनीसुद्धा शिवाजीला विरोध करणाऱ्या पहिल्या दर्जाच्या अनेक मराठे सरदारांच्या नामावली दिल्या आहेत. शिवाजीचे कार्य जर 'धर्मकार्य' होते तर मग या कार्याला या परम धर्मप्रिय मराठे सरदारांनी विरोध का केला? सरदेसाई म्हणतात, ''हाती असलेले घालविण्याची भीती त्यांना होती.'' यांच्या हाती काय होते? बखरकार केपन आपल्या मराठ्यांच्या बखरीत म्हणतो, शिवाजी हा 'नाशकर्ता' होता. त्याने कशाचा नाश केला? तोच बखरकार सांगतो,

''शिवाजीच्या हाती जे विजापूरचे मुलूख लागले होते, त्यातील पहिली मुखत्याची चाल मोडून प्रतिवर्षी (जमिनीच्या पिकांची) पाहणी करून (तो सारा) घेत असे.''

हे विधान अगदी स्पष्ट आहे. कशाचा नाश केला ते स्पष्ट आहे. मक्तेबाजीचा त्याने नाश केला, म्हणून रागावलेला हा बखरकार आणखी एक सत्य मात्र नोंदवून गेला आहे. तो म्हणतो, ''यामुळे येथे प्रजेस मात्र हितावह पडले असेल.''[२७]

शिवाजीने कुणाचा नाश केला आणि कुणाच्या हिताचे केले हे स्पष्ट आहे.

असल्या हितविरोधामुळेच शिवाजीला घाटगे, खंडागळे, बाजी घोरपडे, बाजी मोहिते, निंबाळकर, डबीर, मोरे, बादल सावंत, सुर्वे, खोपडे, पांढरे, कोकणचे देसाई, मावळचे देशमुख वगैरे प्रमुख मराठे हिंदू सरदारांचा विरोध होता. व्यंकोजी भोसले व मंबाजी भोसले हे अगदी जवळचे भाऊबंदही विरोधी होते. आईकडून नातेसंबंध असलेले जगदेवराव जाधव, रधोजी माने हेसुद्धा विरोधी होते. शाहिस्तेखान स्वराज्यावर चालून आला तेव्हा त्याच्याबरोबर औरंगजेबाचे उत्तरेतील हिंदू सरदार असणे स्वाभाविकच आहे. पण महाराष्ट्रातील सुखाजी गायकवाड, दिनकरराव काकडे, रंभाजीराव पवार, सर्जेराव घाटगे, कमलोजीराव काकडे, जसवंतराव काकडे, त्र्यंबकराव खंडागळे, कनकोजीराव

गाडे, अंताजीराव खंडागळे, दत्ताजीराव खंडागळे हे मराठे सरदारसुद्धा होते आणि यापेक्षा भयानक म्हणजे त्र्यंबकरावजी भोसले, जिवाजीराव भोसले, बालाजीराजे भोसले, परसोजीराजे भोसले ही भोसले मंडळी शिवाजीच्या रक्ताची, नात्याची होती. शाहिस्तेखानाच्या सैन्यात सिंधखेडचे दत्ताजीराजे जाधव आणि रुस्तुमराव जाधव हेही होते. ही जाधव मंडळी जिजामातेच्या माहेरची—पुण्याची—जहागिरी आपल्याला मिळावी, या आशेनं लोणीचे कृष्णाजी काळभोर खानाला सामील झाले होते. खानाने शितोळ्यांची देशमुखी जप्त करून काळभोरांना दिली होती. बाळाजीराव होनप पुण्याच्या लाल महालाशेजारीच राहत. स्वराज्याच्या छत्रछायेत राहूनसुद्धा या बाळाजीराव होनपांना शिवाजीराजापेक्षा शाहिस्तेखान जवळचा वाटला. असे हे एतद्देशीय, असे हे हिंदू. अशी त्यांची देशनिष्ठा आणि त्यांची धर्मनिष्ठा.

ह्यांची निष्ठा वतनावर होती हे स्पष्टच आहे.

गौरवास्पद अपवाद होता तो कान्होजी जेधे यांचाच.

शिवाजी महाराजांचा स्वत:चा या वतनदारांसंबंधीचा दृष्टिकोन अगदी स्पष्ट आणि तितकाच कडवट होता. एके ठिकाणी आमात्यांनी त्यांच्यासंबंधी म्हटले आहे, ''बळकट व्हावे, दुसऱ्याचे घ्यावे, दावे-दरवडे करावे हा यांचा सहज हव्यास... परचक्र आले म्हणजे वतनाच्या आशेने अगोदरच सलुखा करतात, स्वत: भेटतात. तिकडचे भेद इकडे व इकडील तिकडे करून राज्यात शत्रूंचा प्रवेश करितात... देश मारितात.''[२६]

या वतनदार सरदारांच्या दृष्टीने त्यांची वतने महत्त्वाची होती. धर्म महत्त्वाचा नव्हता. त्यांची वतननिष्ठा जाज्वल्य होती. धर्मनिष्ठा महत्त्वाची नव्हती.

## शिवाजी आणि धर्म

याचा अर्थ शिवाजी धर्मच मानत नव्हता किंवा तो निधर्मी होता किंवा त्याने राज्य निधर्मी राज्य म्हणून घोषित केलं होतं, असा मात्र नाही.

शिवाजी हिंदू होता. त्याची धर्मावर श्रद्धा होती. त्या श्रद्धेप्रमाणे तो वागत होता. देव-देवतांना आणि साधुसंतांना पूजत होता. धर्मासाठी व देवळांसाठी दान देत होता व खर्च करीत होता.

पण तो इस्लाम धर्माच्या विरुद्ध होता काय? तो हिंदू धर्मावर श्रद्धा

ठेवत होता, म्हणजे मुस्लीम धर्माचा द्वेष करीत होता काय? मुसलमानांचे 'हिंदूकरण' किंवा 'महाराष्ट्रीयीकरण' करण्याचा त्याचा इरादा वा प्रयत्न होता काय?

इतिहासाशी इमान राखून खरे बोलायचे, तर या साऱ्या प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशी आहेत.

शिवाजीनं सुरतेच्या केलेल्या दोन्ही वेळच्या लुटीची तपशीलवार वर्णनं उपलब्ध आहेत. जुन्नरची बाजारपेठ लुटल्याची व अशाच इतरही लुटीची वर्णनं आहेत. पण एक तरी मशीद पाडल्याचे उदाहरण इतिहासात नमूद आहे काय? निदान मुळात मंदिर असलेली पण मुसलमानांनी मशिदीत रूपांतर केले अशी तरी मशीद पाडून तिथे पुन्हा मंदिर बांधल्याची नोंद आहे काय? मुळीच नाही. याउलट मशिदींना दान व इनामे दिल्याच्या नोंदी मात्र आहेत.[२९]

सभासदाच्या बखरीतील हा उतारा पहा. "मुलखात देव-देवस्थाने जागोजागी होती. त्यास दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक स्थान पाहून यथायोग्य चालविले. मुसलमानांचे पीर, मशिदी, त्यांचे दिवाबत्ती, नैवेद्य, स्थान पाहून चालविले."

जी गोष्ट मशिदींची तीच गोष्ट मुस्लीम साधुसंतांची. शिवाजी आणि त्या काळातील इतरही मराठे-हिंदू दर्ग्यांना भजत व देणग्या देत. मुस्लीम साधू, पीर, फकीर यांना मान देत. शिवाजी महाराज अनेकांना गुरू मानतात त्यात 'याकुतबाबा' या एका मुस्लीम संताचाही समावेश आहे.

मुस्लीम धर्माबद्दल शिवाजी महाराजांची सहिष्णुता अनेक रीतीने इतिहासात नमूद आहे. खाफीखान या मुस्लीम इतिहासकारानं नोंदवून ठेवलेला हा उतारा खूप बोलका आहे.

"शिवाजीने सैनिकांकरिता असा सक्त नियम केला होता की, सैनिक ज्या ज्या ठिकाणी लूट करण्यास जातील; तेथे तेथे त्यांनी मशिदीस, कुराण ग्रंथास अथवा कोणत्याही स्त्रीस तोषीस अगर त्रास देता कामा नये. जर एखादा कुराणाचा ग्रंथ हाती आला तर त्याबद्दल पूज्यभाव दाखवून तो आपले मुसलमान नोकरांच्या स्वाधीन करीत असे. केव्हाही हिंदू किंवा मुस्लीम स्त्रिया हाती सापडल्यास व त्यांचे रक्षण करण्यास कोणी जवळ नसल्यास त्यांचे नातलग त्यांची सुटका करण्यास येईपर्यंत शिवाजी स्वत: तिची काळजी करीत असे."[३०]

२ नोव्हेंबर १६६९च्या एका पत्रात रघुनाथ पंडितरावांनी राजांची आज्ञा उल्लेखली आहे ती तर त्याहून स्पष्ट आहे. ते लिहितात,

"श्रीमंत महाराज राजे यांनी ज्याचा जो धर्म त्याचा त्यांनी करावा. यात कोणी बखेडा करू नये असे फर्मावले आहे."[३१]

**मुस्लीम धर्माविरुद्ध स्वत:ची मते लोकमान्य करण्यासाठी जे कुणी शिवाजीचा वापर करीत असतील किंवा करतील त्यांना वरील ऐतिहासिक बाबींचा जाब द्यावा लागेल. त्यांचा मुस्लीम धर्मद्वेष कुठे खपत असेल तर त्यांनी तो स्वत:च्या नावाने खपवावा. त्यांच्या मालावर शिवाजीचा शिक्का मारून खपवू नये. तो माल शिवाजीचा म्हणून खपवू नये.**

**तसेच मुस्लीम धर्मीयांनी सांप्रतच्या तथाकथित शिवभक्तांच्या कारवाया व भाषणे पाहून शिवाजीस ओळखू नये. शिवाजीचा इतिहास पहावा आणि शिवाजीचा मुस्लीम धर्मासंबंधीचा दृष्टिकोन समजावून घ्यावा अन् मग काय ते ठरवावे.**

शिवाजी स्वत: हिंदू होता व धर्मश्रद्ध होता परंतु राजा म्हणून त्याने स्वत:च्या राज्यातील प्रजेत धर्मावरून भेद केला नाही. हिंदूंना एक वागणूक व मुस्लिमांना दुसरी वागणूक असे केले नाही. मुसलमानांना ते वेगळ्या धर्माचे म्हणून पक्षपातीपणाने वागवले नाही. ही बाब जशी हिंदूंनी लक्षात घ्यावी तशीच ती मुस्लिमांनीसुद्धा लक्षात घ्यावी.

मुसलमान धर्मात अकबरासारखे परधर्म सहिष्णू राजे होऊन गेले तसेच औरंगजेबासारखे हिंदूंवर जिझिया कर लादून एकांगी पक्षपात करणारेही होऊन गेले.

औरंगजेबाने धर्मांध मुल्ला-मौलवींच्या सांगण्यावरून जिझिया कर बसवला. त्या कराच्या विरुद्ध उठाव झाला त्या सुमारास शिवाजी महाराजांनी औरंगजेबास फारसी भाषेत एक पत्र लिहिले आहे. त्या पत्रातील मजकुरावरून स्वधर्माकडे व परधर्माकडे कसे पहावे या संबंधीचा दृष्टिकोन अगदी खुलासेवार स्पष्ट होतो.

आपल्या पत्रात शिवाजी लिहितो की, "औरंगजेबाने गरीब व निराधार प्रजेकडून जिझिया कर वसूल करण्याचे जे धोरण स्वीकारले आहे ते मुगल राजसत्तेच्या मूळ सिद्धान्ताच्या विरुद्ध आहे. औरंगजेबाचे पणजे अकबर बादशहा यांनी ५२ वर्षे राज्य केले. त्या काळात सर्वांना न्यायाने वागविले.

त्यामुळे त्यांना जनतेने जगद्गुरू अशी पदवी दिली. त्याचेच धोरण पुढे जहांगीर व शहाजहान या बादशहांनी चालविले. त्यांच्या या धोरणामुळे त्यांची जगभर प्रसिद्धी झाली. हे बादशहा सहज जिझिया कर वसूल करू शकले असते पण त्यांनी तसे केले नाही. त्यामुळे त्यांना दिगंत कीर्ती व पैसा मिळाला. त्यांचे राज्य वाढत राहिले पण औरंगजेबाच्या राज्यात मात्र हिंदू व मुसलमान शिपाई दुःखी आहेत. धान्याचे भाव वाढले आहेत. अशात गरीब ब्राह्मण, जोगी, बैरागी, जैन साधू व संन्यासी यांच्याकडून जिझिया कर घेणे फारशी पुरुषार्थाची बाब नाही. त्यामुळे खरे पाहिले असता मुघल वंशाचीच शान जाणार आहे.''

शिवाजी पुढे लिहितो की, ''कुराण धर्मग्रंथ ही प्रत्यक्ष ईश्वराची वाणी आहे. ते अस्मानी किताब आहे. त्यात ईश्वरास 'जगाचा ईश्वर' म्हटले आहे. 'मुसलमानांचा ईश्वर' असे म्हटलेले नाही. कारण हिंदू व मुसलमान या जाती ईश्वरापाशी एकरंग आहेत. मुसलमान लोक मशिदीत बांग देतात, ती भगवंताची स्तुतीच होय आणि हिंदू लोकही देवळात घंटा वाजवून ईश्वराची स्तुतीच करतात. म्हणून जातिधर्मावर जुलूम करणे भगवंताशी वैरत्व करणे होय. कारण शास्त्र व न्याय या दोन्हीही दृष्टीने विचार केला तरी जिझिया पट्टी ही गैर आहे.''

म्हणून शिवाजीने औरंगजेबास असे लिहिले आहे की, ''त्याने विवेकास फाटा देऊ नये. यापूर्वी गुजरातच्या सुलतानाने असाच विवेकास फाटा दिला होता पण त्याचा परिणाम चांगला झाला नाही. त्याप्रमाणे बादशहाचं होईल. कारण कोणताही ज्वालाग्राही पदार्थ अग्नीच्या सान्निध्यात नष्ट होतो. त्याचप्रमाणे कोणतेही राज्य प्रजेच्या असंतोषात भस्म होते. मनुष्यास विनाकारण उपद्रव केला असता निर्माण होणारा द्रोहाग्नी हा राळापेक्षाही जलद दौलत भस्म करू शकतो. म्हणून बादशहाने आपापले स्वधर्मात सर्व जातींबद्दल मनात विकल्प ठेऊन कोणत्याही प्रकारचा जुलूम करू नये. कारण राज्यातील प्रजा, कीटक न्याये गरीब आहे. परंतु हिंदू लोकांस दुःख दिले असता त्याचे द्रोहाग्नीत संपूर्ण साम्राज्य नष्ट होईल.''[३२]

शिवाजीने येथे भारतीयांच्या दृष्टीने महत्त्वाचं तत्त्व प्रतिपादन केलं आहे. भारतातील लोकांना अकबर व इतर बादशहांनी धर्माच्या कारणामुळे छळले नाही. त्यांच्या उदार धार्मिक धोरणामुळे अकबर बादशहास जगद्गुरू म्हणून संबोधण्यात आले. पण गरीब आणि निरपराध लोकांवर कर लादून औरंगजेब

इस्लाम धर्माच्या विरोधी काम करीत आहे. कारण कुराण ही ईश्वरवाणी आहे आणि ईश्वराच्या लेखी हिंदू व मुसलमान वेगळे नाहीत. प्रजेला जर राजाने त्रास दिला, तर राजा कितीही बलवान असला तरी त्याचा पाडाव झाल्याशिवाय राहणार नाही.

**शिवाजीचा काळ लक्षात घेता शिवाजीचे हे धोरण व त्याचे विचार अनन्यसाधारण असेच आहेत. कारण धर्माचा लोकजीवनावर मोठा प्रभाव होता. पण आपल्या धर्माइतकाच इतरांचा धर्मही श्रेष्ठ व उच्च आहे आणि उपासना पद्धती वेगवेगळ्या असल्या तरी त्याचा उद्देश एकच आहे. हे महत्त्वाचे तत्त्व शिवाजीने मांडले. अकबर, दारा शुकोह, इब्राहिम आदिलशहा यांचे विचारही यापेक्षा वेगळे नव्हते.**

शिवाजी हा धार्मिक राजा होता. तो हिंदू धर्माचा अभिमानी होता व त्याने हिंदू देवळांना व ब्राह्मणांना इनामे दिली; या गोष्टी खऱ्या आहेत पण त्याचा हिंदू धर्माचा अभिमान इतर धर्मीयांच्या द्वेषावर आधारलेला नव्हता. मुसलमानांचा द्वेष केल्याशिवाय आपणास श्रेष्ठ हिंदू बनता येत नाही, असे त्याला कधीच वाटले नाही. कारण मध्ययुगातदेखील त्याची धर्मसाधना डोळस होती.

❑❑❑

# शिवाजी–ब्राह्मण, ९६ कुळी, कुळवाडी, शूद्र

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावामागे ज्या काही बिरुदावल्या लावल्या जातात त्यात 'गोब्राह्मण प्रतिपालक' ही बिरुदावली जास्त प्रसिद्ध आहे. 'गायींचा' आणि 'ब्राह्मणांचा' प्रतिपाळ करणारा अशी बिरुदावली सारखी प्रसिद्धी केली जाते.

छत्रपती शिवाजी महाराजांची अस्सल म्हणून मान्यता पावलेली अनेक पत्रे उपलब्ध आहेत. यातील एकाही पत्रात शिवाजी महाराजांनी स्वत:स 'गोब्राह्मण प्रतिपालक' म्हणवून घेतलेले नाही. शिवाजीच्या समकालीनांनी शिवाजीस लिहिलेली पत्रं आहेत. त्या पत्रांपैकी एकाही पत्रात कुणीसुद्धा शिवाजीस 'गोब्राह्मण प्रतिपालक' म्हणत नाहीत. उलट शिवाजी महाराजांची राज्याभिषेक शक असलेली २९ पत्रे उपलब्ध झालेली आहेत. या सर्व पत्रांत शिवाजी स्वत:स 'क्षत्रिय कुलवंतस श्रीराजा शिवछत्रपती' असे म्हणवून घेतो. तो स्वत:स 'गोब्राह्मण प्रतिपालक' म्हणवून घेत नाही. मग हे 'गोब्राह्मण' प्रकरण आले कोठून?

शिवाजी स्वत:स 'गोब्राह्मण प्रतिपालक' म्हणवून घेई, असे श्री. ब. मो. पुरंदरे लिहितात व त्यासाठी शिवचरित्र साधने खंड ५, क्र. ५३४ व ५३७ असा आधार देतात. या सर्व पत्रांची व आधारांची छाननी करून श्री. शेजवलकर निर्वाळा देतात की, "५३४ क्रमांकाच्या लेखात शिवाजी स्वत:स गोब्राह्मण प्रतिपालक म्हणवून घेत नाहीत, तर पत्रात ज्याचा उल्लेख आहे तो ब्राह्मण त्यास तशी पदवी देतो. ५३७ क्रमांकाच्या लेखात तर 'गोब्राह्मण प्रतिपालक' असा शब्दच आलेला नाही. म्हणजे सब कुछ झूठ. शिवाजीने स्वत:स 'गोब्राह्मण प्रतिपालक' म्हणवून घेणे आणि ब्राह्मणांनी त्यास तसे म्हणणे यातले अंतर स्पष्ट

आहे. काम करवून घ्यायला किंवा याचना करायला गेलेला कुणीही राजास तू आमचा प्रतिपाल करणारा आहेस असे म्हणणारच, त्यात विशेष काय?"[३३]

मग शिवाजीला लावलेली किंवा खरे सांगायचे तर मागाहून बळेच चिकटलेली बिरुदावली कुणी लावली असावी? 'गो' लावणे शक्य नाही. त्यामुळे उत्तर स्पष्ट आहे. स्वत:चा कार्यभाग साधण्यासाठी इतिहासातील थोर पुरुषांनी आपल्याला सोयीची अशी बिरुदावली लावण्यास फार तर हुशारी किंवा चलाखी केली असे म्हणता येईल. लोक अडाणी आहेत व मुळापर्यंत जात नाहीत तोपर्यंत पचेलही. पण म्हणून ते सत्य नव्हे. म्हणून तो इतिहास नव्हे.

ग्रँड डफने आपल्या पुस्तकात 'गाई, रयत व स्त्रिया यांना लुटण्यास शिवाजीने आपल्या शिपायास बंदी केली होती'[३४] असे नमूद केले आहे. त्याला इतरही आधार आहेत.

पण मग गाई, रयत व स्त्रिया यांचा प्रतिपालक असलेला शिवाजी 'गोब्राह्मण प्रतिपालक' कसा केला गेला? रयत आणि स्त्रिया यांना बाजूस सारून त्या ठिकाणी ब्राह्मण कधी व कुणी आणले याचा अंदाज करणे कठीण जाऊ नये.

शिवाजीच्या राज्यात ब्राह्मणांस खास सवलतीसुद्धा कुठे दिसत नाहीत. उलट एका पत्रात आगळीक केलेल्या ब्राह्मणासंबंधी शिवाजी महाराज लिहितात, "ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करू पाहतो." असे बजावतात आणि धमकावतात की, "जे गनिमांचे गनीम ते तसाच नतीजा पावणार."[३५]

सर्व मराठे ज्याप्रमाणे शिवाजी महाराजांकडे नव्हते तसेच सर्व ब्राह्मण शिवाजी महाराजांच्या बाजूने नव्हते. अनेक विरुद्ध होते. म्हणूनही शिवाजी महाराज 'ब्राह्मण प्रतिपालक' अशी बिरुदावली घेणे शक्य नव्हते व तशी त्यांनी घेतलेली नव्हती.

दक्षिणा उपटण्यासाठी शिवाजीच्या काळात ब्राह्मणांनी शिवाजीच्या विरुद्ध कोट चंडी यज्ञ केल्याचा एक मजेदार उल्लेख शिवचरित्र साहित्यात आहे.

दिल्लीच्या शहेनशहाचे मातब्बर सरदार मिर्झाराजे जयसिंग शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी महाराष्ट्रात आले. त्या वेळी त्यांना शिवाजीविरुद्ध जय मिळावा म्हणून महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी कोट चंडी यज्ञ केला होता. तो उल्लेख असा,

"मिर्झाराजा जयसिंगाची चिंता, शिवाजी मोठा दंगेखोर, मोठा हुन्नरवंत आणि मर्दाना, शिपाई अंगाचा. खासा, अफजलखान अंगे मारिला, शास्तखानाच्या डेऱ्यात शिरोनी मारामारी केली. आपणास यश कसे येईल म्हणून चिंता केली. तेव्हा मोठे मोठे ब्राह्मण पुरोहित यांनी उपाय सांगितला. 'दैवी प्रयोगी अनुष्ठाने करावी म्हणजे यश येईल.' मग मिर्झा बोलीला 'जे कोट चंडी करावी आणि आकरा कोटी लिंगे करावी, कामनार्थ बगलामुखी कालरात्री प्रीत्यर्थ जप करावा.' चारशे ब्राह्मण अनुष्ठानास घातले. प्रत्यही अनुष्ठाने चालिले. अनुष्ठानास दोन कोट रुपये अलाहिदा काढून ठेविले आणि तीन मास अनुष्ठान काढून सिद्ध केले. अनुष्ठानाची पूर्णाहुती करून ब्राह्मणास दान दक्षिणा देऊन संतर्पण केले. मग दरमजल चालिले." शिवाजी जर ब्राह्मण प्रतिपालक होता आणि शिवाजीचे राज्य जर ब्राह्मण हिंदू धर्मरक्षणाकरिता होते तर एवढा कोटी चंड यज्ञ ब्राह्मणांनी कसा केला?"[३६]

## छत्रपतींच्या राज्याभिषेकास ब्राह्मणांचा विरोध

महाराष्ट्रातल्या ब्रह्मवृंदांनी शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करायला विरोध केला, हे सत्य तर सर्वांना माहीतच आहे. चातुर्वर्ण्याच्या रचनेप्रमाणे व हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे राजा होण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांना आणि क्षत्रियांनाच होता. शिवाजी शूर असला, त्याने राज्य कमावले, तरी तो राजा होण्यास पात्र नाही असे धर्ममत होते. काहींना त्यांच्या क्षत्रियत्वाची शंका होती आणि उरलेल्यांना तो मुळात क्षत्रिय कुळातला असला तरी 'संस्कारक्षय' झाल्याने क्षत्रिय राहिला नव्हता. शिवाजीची मुंज झाली नव्हती. मंत्रविधींसह लग्न लागले नव्हते. मग शिवाजी राजा कसा होऊ शकणार?

काही सनातनी धर्ममार्तंडांची त्यावरही कडी होती. ते सांगत होते,

"नंदांतम् क्षत्रिय कुलम." नंद राजाचा अंत झाला तोच क्षत्रिय कुळाचा अंत होय. त्यानंतर कुणी क्षत्रिय उरलाच नाही. अकबराच्या काळी कृष्ण भट शेष याने 'शूद्राचार शिरोमणी' नावाचा एक ग्रंथ लिहिला. त्याने असे प्रतिपादन केले की, "परशुरामाने संपूर्ण पृथ्वी निःक्षत्रिय करून टाकली. आता हिंदू धर्मात राज तेजाचे व राज वंशाचे क्षत्रिय कोणीच उरले नाहीत. मग शिवाजीला राज्याभिषेक कसा करणार?"[३७]

महाराष्ट्रातल्या ब्रह्मवृंदांपैकी कुणी राज्याभिषेक करण्यास तयार नाही. म्हणून मग काशीचा गागाभट्ट आला व त्याने साग्रसंगीत राज्याभिषेक वैदिक

पद्धतीने केला. तसे गागाभट्टाचे मूळ घराणे नांदेडचे पण तो विद्वान ब्राह्मण काशीस होता. राजांनी त्याला व इतर ब्राह्मणांना प्रचंड दक्षिणा दिल्या. यात काही अतिशयोक्ती असेल पण एक वर्णन असे आहे की, गडावर राज्याभिषेक समयी राजांनी ब्राह्मणांना दक्षिणा म्हणून इतके सोने दिले की त्यांना ते गडावरून खाली आणता येईना.

## शिवाजीचे ब्राह्मण सहकारी

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला महाराष्ट्रातल्या ब्राह्मणांनी विरोध केला होता. त्यावरून किंवा महाराष्ट्रातल्या ब्राह्मणांनी मिर्झाराजे जयसिंग यांना यश मिळावे म्हणून कोटी चंडी यज्ञ केला होता त्यावरून महाराष्ट्रातले सर्व ब्राह्मण शिवाजीच्या विरुद्ध होते असा कुणी निष्कर्ष काढला तर तो मात्र पूर्णतया चूक ठरेल.

हा प्रश्न केवळ व्यक्तिगत या किंवा त्या ब्राह्मण समूहाचा नव्हता किंवा या किंवा त्या पुरोहिताचा नव्हता. प्रश्न मूळ चातुर्वर्ण्य धर्माचाच होता व आजही आहे.

शूद्र हे प्रजापतीच्या पायापासून जन्माला आले. वरील तिन्ही वर्णांची सेवा करणे हे त्यांचे धर्मकर्तव्य आहे. त्यांना राजा होता येणार नाही अशी धर्माज्ञा आहे. राजा हा देवाचा अंश असतो आणि शूद्रात देवाचा अंश असणे शक्य नाही. म्हणून शूद्र राजा होऊ शकत नाही. असा धर्माचा आग्रह आहे. मुसलमान राजा होऊ शकतो. पण शूद्र होऊ शकत नाही. अशी सनातन हिंदू धर्माची रीत आहे. म्हणून शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला धर्माचाच विरोध होता. नुसता ब्राह्मणांचा नव्हता. शिवाजीच्या स्वराज्य उद्योगात अनेक ब्राह्मण साथीदार होते. दादोजी कोंडदेव हे तर त्यांचे गुरूच होते. रामदासाने शिवाजीला उपदेश व मार्गदर्शन केले की नाही याबाबत कडाक्याचे वाद आहेत. ते तज्ज्ञांवर सोपवून आपण बाजूस ठेवले तरी दादोजींच्या भूमिकेसंबंधी शंकेला जागा नाही. मोरापंत पिंगळे हे तर पेशवे पदावर होते. ते एक मुख्य प्रधान होते. मोरोपंत, अण्णाजी दत्तो व दत्ताजी त्रिंबक हे प्रधान तर होतेच पण मोठे कुशल वीर होते. शिवाजीची आग्र्याहून सुटका करून घेण्याच्या रोमांचकारी घटनांना त्र्यंबकपंत डबीर आणि रघुनाथपंत कोरडे ह्या महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी आणि कृष्णाजी काशी व विसाजी या उत्तरेकडील ब्राह्मणांनी मोलाची मदत केल्याची इतिहासाने नोंद केलेली आहे.

प्रश्न नुसता ब्राह्मणांचा नव्हता तर सनातन हिंदू धर्माचा होता. त्या काळाच्या मर्यादांचा होता व या मर्यादा शिवाजीनेसुद्धा स्वीकारून मान्य केल्या होत्या. म्हणून सकृत दर्शनी आज हास्यास्पद दिसणाऱ्या गोष्टी त्या काळात घडल्या.

'संस्कारक्षय' झाला वगैरे आक्षेपांना उत्तर म्हणून गागाभट्टाने शिवाजी महाराजांची मुंज ४४ व्या वर्षी केली. मंत्रविधींसह पुन्हा विवाह केला. दान-दक्षिणा म्हणून लक्षावधी सुवर्ण मोहरांची उधळण करावी लागली आणि मग राज्याभिषेक झाला.[३८]

'हिंदू धर्मरक्षक' म्हणून शिवाजीला बिरुदावली लावणाऱ्या आजच्या तमाम मतलबी धर्मांधांनी ही गोष्ट विसरू नये की, याच हिंदू धर्मानि व याच धर्माच्या रक्षकांनी शिवाजीला राज्याभिषेक करायला विरोध केला होता व ४४व्या वर्षी मुंज आणि एकदा झालेला विवाह पुन्हा दुसऱ्यांदा करणे असल्या हास्यास्पद गोष्टी करविल्या होत्या.

अर्थात हिंदू धर्म मानणाऱ्या शिवाजीलासुद्धा या काळाच्या आणि धर्माच्या मर्यादा होत्या. प्रत्येक थोर पुरुषाला काळाच्या मर्यादा असतात, परिस्थितीच्या मर्यादा असतात. तशा त्या शिवाजीलासुद्धा होत्या.

गौरव करण्याच्या भरात तारतम्य सोडून काही वेळा शिवाजी महाराजांचा काळनिरपेक्ष गौरव केला जातो. शिवाजीचे राज्य 'धर्मनिरपेक्ष राज्य होते,' शिवाजी खरा 'समाजवादी' होता इत्यादी हास्यास्पद विधानेसुद्धा काही मंडळी करतात. अर्थात ते खरे नाही, हे स्पष्ट आहे. सरंजामी समाजरचनेच्या काळात स्वत: एक राजा असलेला शिवाजी धर्मनिरपेक्ष असणे शक्य नव्हते, समाजवादीही असणे शक्य नव्हते. शिवाजी त्याच्या समकालीनांपेक्षा किती लांब पल्ल्याचा विचार करी हे महत्त्वाचे. त्या परिस्थितीतही त्याने किती दूरदृष्टीचा विचार केला आणि त्या परिस्थितीतही त्याने किती प्रगतिशील पावले उचलली, राजा असूनही रयतेची कशी कदर केली हे महत्त्वाचे.

शिवाजी महाराजांचा पहिला राज्याभिषेक रायगडावर शके १५९६ ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीस म्हणजे ६ जून १६७४ रोजी झाला हे बहुतेक सर्वांना ठाऊक आहे. परंतु शिवाजीचा आणखी एक दुसरा राज्याभिषेक झाला होता. तो पहिल्या राज्याभिषेकानंतर लगेच साधारणत: तीन महिन्यांनी ललिता पंचमीच्या दिवशी म्हणजे अश्विन शुद्ध पंचमीस झाला होता.

निश्चलपुरी गोसावी या नावाचा कुणी यजुर्वेदी तांत्रिक गोसावी होता. पहिल्या राज्याभिषेकानंतर तो शिवाजी महाराजांना भेटला. दरम्यान पहिल्या राज्याभिषेकानंतर १३ दिवसांनी शिवाजीची थोर आई जिजाबाई हिचे निधन झाले होते. शिवाजीचा सेनापती प्रतापराव गुर्जर वारला होता. शिवाजीची एक पत्नी काशिबाई मृत्यू पावली होती. ह्या सर्व गोष्टी पहिला राज्याभिषेक करताना गागाभट्टाने चुका केल्या म्हणून घडल्या असे या निश्चिलपुरीचे म्हणणे होते. त्याने मुहूर्त बरोबर काढला नव्हता, उपदेवतांना संतुष्ट केले नव्हते, त्यांना बळीचे दान दिले नव्हते. त्यामुळे ह्या आपत्ती ओढवल्या असे त्यांचे म्हणणे होते.

शिवाजी महाराज व त्यांचे सल्लागार हे धर्मश्रद्ध व पापभिरू होते. त्या सर्वांना त्या काळातील जाणिवांच्या व ज्ञानाच्या मर्यादा होत्या. त्यांनी निश्चिलपुरीचे म्हणणे मान्य केले आणि मग पुन्हा दुसरा राज्याभिषेक झाला. पुन्हा उरल्यासुरल्या देवदेवतांना यज्ञ करून व दाने देऊन संतुष्ट केले गेले. ब्राह्मणांना पुन्हा दक्षिणा देण्यात आल्या.[३१] एकाच व्यक्तीचे दोन राज्याभिषेक झाल्याचे कुठेच ऐकिवात नाही.

अर्थात दोन दोन राज्याभिषेक करून आणि दोन दोन वेळा देवदेवता व ब्राह्मण पुरोहितांना संतुष्ट करूनही उपयोग झालेला दिसत नाही. राज्याभिषेकानंतर स्वत: शिवाजी महाराजांना जेमतेम सहा वर्षेच आयुष्य मिळाले व तसे ते अकालीच मृत्यू पावले.

काळाच्या व तत्कालीन जाणिवांच्या मर्यादा लक्षात घेऊनच या दोन राज्याभिषेकांकडे पाहायचे ऐवढेच तात्पर्य.

## '९६ कुळी' वाल्यांचा शिवाजीविरोध

त्या काळी शिवाजी महाराजांना शूद्र किंवा 'हलक्या जातीचा' समजणाऱ्यांत महाराष्ट्रातील फक्त ब्राह्मणच होते असे नाही. स्वत:ला क्षत्रिय म्हणविणारे ९६ कुळीचे मराठे सरदारही शिवाजीचा 'राजा' म्हणून सुरुवातीस हक्क मानत नव्हते. या अहंमन्य कुळीत ९६ नावे आहेत. त्यात 'भोसले' हे नाव नाही.

अजूनही कर्मठपणाने जातपात पाहून सोयरसंबंध ठरवणारे आणि स्वत:ला उच्च मराठे समजणारे 'भोसले' आडनावाच्या मराठ्यांना हलके समजतात.

त्या काळी जवळ जवळ सर्वच ९६ कुळीचे मराठे स्वत:स 'राजे' म्हणवत. शिंदे राजे, मोरे राजे इत्यादी. त्यांची राज्ये नव्हती. पण ते स्वत:स राजे म्हणवत. नगर जिल्ह्यात व आजूबाजूस अजूनही जवळ जवळ सर्व मराठे (आणि इतर काहीसुद्धा) स्वत:च्या आडनावापुढे पाटील लावतात. जसे लांडगेपाटील, कोल्हेपाटील, काळेपाटील, विखेपाटील इत्यादी सारेच पाटील.

स्वत:ला राजे म्हणवणारे तेव्हाचे ९६ कुळीचे मराठे शिवाजीबरोबर कसे वागत याची एक कथा नमूद आहे. जावळीचे मोरे हे विजापूरशाहीचे एक सरदार होते. त्यांना 'राजे' म्हणत. शिवाय त्यांना चंद्रराव ही पदवी होती. या जावळीच्या मोऱ्यांनी आपल्या स्वराज्य कार्यात सहभागी व्हावे म्हणून शिवाजीने प्रयत्न केले. पत्रे पाठवली. दूत पाठविले. ऐकेना, तेव्हा जरबेचा खलिता पाठविला अन् इशारात केली की जर ऐकणार नसतील तर जावळी काबीज करू आणि कैद करू. या पत्रात शिवाजीने स्वत:स राजे असे संबोधले होते. या पत्रास जावळीच्या मोऱ्यांनी उर्मटपणाने पाठवलेले पत्र मिळाले आहे. त्या पत्रात मोरे म्हणतात, "तुम्ही राजे कसे? तुम्ही स्वत:ला राजा म्हणवून घेता म्हणून तुम्ही राजे? तुम्ही जेवत असाल तर हात धुवायला जावळीत या. आमचे युद्ध होऊ द्या!"

अर्थात शिवाजीने मोऱ्यांची इच्छा पूर्ण केली. युद्ध केले व जावळी जिंकली हा भाग वेगळा. जावळीचे मोरे स्वत:ला राजे म्हणवत परंतु शिवाजीला 'राजा' मानायला तयार नव्हते, ही या संदर्भातील महत्त्वाची गोष्ट.

जी गोष्ट जावळीच्या मोऱ्यांची तीच गोष्ट रांझ्याच्या पाटलाची. सामान्य कुणब्याच्या पोरीवर बलात्कार केला म्हणून त्याला मुसक्या बांधून पुण्यास शिवाजीसमोर हजर केला अन् शिवाजीने त्यास शिक्षा फर्मावली. तेव्हा तो तिथे हजर असलेल्या दादोजी कोंडदेवांना म्हणाला, "पंत, गोतमुखाने न्याय व्हावा."

पाटलाच्या म्हणण्याचा अर्थ स्पष्ट आहे. न्याय करण्याचा अधिकार राजाचा, वरिष्ठ वर्णीयांचा, ब्राह्मणाचा किंवा जात पंचायतीचा. शिवाजी राजा नाही, तो वरिष्ठ वर्णाचा नाही, म्हणून त्याला शिक्षा देण्याचा अधिकार नाही. धर्मशास्त्राप्रमाणे काटेकोर रीतीने पाहायचे तर रांझ्याच्या पाटलाचे म्हणणे खरे होते. परंतु शिवाजीने धर्माज्ञा बाजूला ठेवून स्वत:च न्याय केला. पाटील मानो अगर न मानो शिवाजीने पुढे येऊन हजर व्हायला त्याला निरोप पाठवला, तेव्हासुद्धा तो एकट्या स्वाराबरोबर आला नाही. उलट स्वारालाच म्हणाला होता, "तुझ्या शिवाजीला जाऊन सांग, तू नावाचा राजा आहेस. तसा मी

नावाचा पाटील नाही. गावचा अधिकारी पाटील आहे. मी माझी प्रजा बटीक समजतो.''

थोडक्यात काय तर उच्चवर्णीय ब्राह्मण असो किंवा उच्चवर्णीय मराठे असो, सुरुवातीस ते शिवाजीला मानायला तयार नव्हते.

चातुर्वर्ण्य रचनेचा, वर्णवर्चस्वाचा त्रास शिवाजीलासुद्धा झाला. तो धर्म मानीत असल्याने त्याने मार्ग काढला. राज्याभिषेक करवून घेतला. स्वबळाने, शौर्याने, युक्तीने संपादन केलेल्या राज्याचा तो राजा होता. अगदी औरंगजेबसुद्धा त्याला मानीत होता. पण हिंदू धर्म मानीत नव्हता. म्हणून शिवाजीला राज्याभिषेक करवून घ्यावा लागला. धर्माची मान्यता घ्यावी लागली.

## कुळवाडी भूषण

महात्मा जोतीराव फुले यांनी शिवाजी महाराजांचा एक पोवाडा लिहिला आहे. या पोवाड्यात सुरुवातीस धृपदातच ते शिवाजीला 'कुळवाडी भूषण' म्हणतात. पोवाड्याचा शेवट करताना ते म्हणतात, जोतीराव फुल्यांनी गाईला, 'पूत शूद्राचा.''[४०] मथितार्थ असा की, शिवाजी भोसला हा 'शूद्राचा पुत्र' होता. म. फुले इतिहाससंशोधक नव्हते किंवा इतिहासकार नव्हते. समतेचा पुरस्कार व प्रचार करणारे कर्ते सुधारक होते. त्यामुळे त्यांनी शिवाजीस असे म्हटले असेल असे म्हणून त्यांच्या पोवाड्याचा आधार दूर करता येणे शक्य आहे. परंतु संशोधकांतही याविषयी मत-मतांतरे दिसतात. ते बिचकत बोलतात व लिहितात. पण मते अलग आहेत.

शेजवलकरांनी त्यांच्या शिवछत्रपतींच्या चरित्राच्या आराखड्यात शिवाजीच्या कौटुंबिक माहितीची नोंद एका प्रकरणात एकत्र केली आहे. त्यातील हे टिपण पहा,

## शिवाजीच्या कुळाचा पूर्वेतिहास

उदेपूरच्या राणा भीमसिंगाचा बागसिंग नावाचा दासीपुत्र होता. राणाच्या मृत्यूनंतर त्याचे भाऊबंद सिसोदे रजपूत त्यास कडू समजू लागले. म्हणून तो प्रथम खानदेशात आला व नंतर पुण्याजवळ जमीन विकत घेऊन तेथील जमीनदार झाला. त्याच्या चार मुलांपैकी मालोजी व बंबोजी हे दोघे होत.[४१] (बुंदेल्याची बखर, भाषांतरकार : पा. न. पटवर्धन, १९२०, पृ. १)

शिवाजी रजपूत असल्यासंबंधीचे अनेक उल्लेख आहेत व त्यांना वेगवेगळे आधारही आहेत. या सर्व आधारांचा अभ्यास केलेले म. म. दत्तो वामन पोतदार लिहून ठेवतात की, ''त्या संबंधात फार अडचणी येतात. पुढील काळातल्या अगदी शाहू महाराजांपूर्वीच्या प्रतिवृत्तात असे दिसते की, बहुसंख्य घराणी सिसोदियांपैकी आहेत की नाहीत, यासंबंधी उदेपूर येथून चौकशी करण्यात आली. त्याच्याही पूर्वी ते सिसोदिया आहेत की नाही याविषयी मतभेद होते. शिवाजी हा रजपूत होता आणि त्याचे भोसले घराणे राजपुतान्यातील सिसोदियापैकीच होते. याबद्दल माझ्या मनात शंका नाही. शहाजीच्या एका पत्रात तर 'आम्ही तो रजपूत' असा उल्लेख आहे. त्यावरून हा मुद्दा अधिक स्पष्ट होतो.''

शिवाजी महाराज जन्माने 'क्षत्रिय' होते की नाही हा मुद्दा निरर्थक आहे. ''शिवाजी क्षत्रिय होता - मी क्षत्रिय आहे'' म्हणून मीसुद्धा थोर आहे. 'किंवा' ''शिवाजी भोसला होता माझेही आडनाव भोसले आहे. म्हणून मी थोर आहे'' असे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कुणाला सांगावयाचे असेल त्याचा प्रश्न वेगळा. शिवाजीच्या थोरपणाशी नाते सांगायला व त्यांच्या थोरपणात स्वत: गौरवून घ्यायला जात किंवा आडनाव याखेरीज ज्यांच्याकडे दुसरे काही नसेल त्यांनी शिवाजीच्या जन्मकुळाची चर्चा करावी. तो कोणत्या कुळात जन्माला आला, ह्यापेक्षा त्याने काय केले हे महत्त्वाचे. कुठे जन्माला यावे हे आपल्या हातात नसते. काय करावे हे बरेचसे आपल्या हातात असते. अर्थात ज्यांच्या हातून काही घडत नाही, ते कुळाची थोरवी गाण्याखेरीज काय करणार?

## शिवाजीचे सहकारी सामान्य शेतकरी

परंतु शिवाजीच्या नावाने वर्णश्रेष्ठत्व कुणी स्थापू पाहील तर त्यांनी हे लक्षात ठेवावे की, शिवाजीच्या स्वराज्य कार्यात बहुसंख्य साथीदार—फार मोठ्या बहुसंख्येने असलेले साथीदार—उच्चवर्णीय नव्हते. तसेच ते सरदार, जमीनदार, वतनदारही नव्हते. तर खालच्या म्हणून समजल्या गेलेल्या जातींचे व गोरगरीब शेतकरी होते.

ज्या मावळ्यांच्या चिवटपणावर, ज्यांच्या अव्यभिचारी निष्ठेवर आणि असीम त्यागावर शिवाजी अतुलनीय पराक्रम करू शकला ते सर्व मावळे म्हणजे सामान्य शेतकरी होते.

जुन्या वतनदारांनी, सरदारांनी सुरुवातीला शिवाजीला फारशी साथ दिली

नाही. परंतु शिवाजीने छोटे मोठे नवे सेनानायक निर्माण केले. ते सर्व जन्माने सर्वसामान्य लोक होते व पराक्रमाने मोठे झाले.

पन्हाळ्याच्या वेढ्यातून निसटून जायला मदतकारक ठरला तो 'शिवा' न्हावी होता. अफजलखानाच्या वधाच्या वेळी शिवाजीचा विश्वासू अन् चपळ लढवय्या म्हणून बरोबर गेलेला जिवा महाला हासुद्धा जातीने न्हावी होता. त्याचे आडनाव संकपाळ. तो जावळी प्रांतातला मौजे कोंडीवलीचा. तोसुद्धा एक सर्वसामान्य रयत होता.

शिवाजीच्या हेरखात्याचा प्रमुख बहिर्जी नाईक हा रामोशी जातीचा होता. प्रत्यक्ष शेती करून उपजीविका करणाऱ्या सर्वसामान्य कुणब्यांना शिवाजीने साथीला घेतले व राज्य स्थापले. शेती करणारा मराठा-कुणबी हा परंपरेने शूद्रच समजला जाई.

व्यक्तींच्या या उदाहरणांबरोबर समुदायांचे उल्लेखही इतिहासात आहेत.

सभासदाच्या बखरीत एक नोंद आहे. बेरड, रामोशी, आडेकरी वगैरे लोकांना त्यांच्या मगदुराप्रमाणे नोकऱ्या दिल्या.[४२] त्यामुळे शिवाजीच्या राज्यात गुन्हे व उपद्रव कधीही होत नसे. गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या लोकांना त्यांच्या पराक्रमाला वाव मिळतो व मग ते सहसा उपद्रव करीत नाहीत.

शिवाजी महाराजांनी जे आरमार उभारले तेसुद्धा परंपरागत क्षत्रिय किंवा मराठ्यांच्या साहाय्याने नव्हे. शिवाजीचा आरमार प्रमुख जसा दर्यावर्दी मुसलमान होता तसेच आरमारातले बहुसंख्य सैनिक कोळी, सोनकोळी, भंडारी, मुसलमान इत्यादी जातींतील लोकच होते. समुद्राच्या साह्याने पोट भरणाऱ्या कष्टकऱ्यांनाच शिवाजीने सैनिक बनवले.[४३]

सामान्यांना शिवाजीने मोठे केले आणि मग या सामान्यांनी शिवाजीला मोठे केले आणि मग सर्वांनी मिळून खूप मोठे कार्य केले.

चांगला विचार सामान्य लोक जेव्हा स्वीकारतात तेव्हा तो विचार हीच एक शक्ती होते आणि ती शक्ती सामान्यांकडून असामान्य कार्य करवून घेते. सामान्यांच्या सहकार्याखेरीज व सहभागाखेरीज इतिहासांतील असामान्य कार्ये घडत नाहीत.

उच्च कुळातले जे असत ते बहुतेक सर्व प्रस्थापित असत. त्यांचे त्या काळी बरे चाललेले असे. जे चालले आहे ते बदलावे असे त्यांना वाटत

नसे. जे सामान्य होते त्यांनाच बदल हवा होता. शिवाजीने त्यांनाच संघटित केले, शहाणे केले, मोठे केले आणि जुलमाला आळा घातला. ज्यांना जुलूम सहन करावा लागतो तेच जुलूम नाहीसा करतात. जुलूम करण्यातच जे सहभागी असतात ते जुलूम नाहीसा कसा करतील?

## शिवाजी व धर्मांतर

शिवाजी हिंदू धर्म पाळणारा होता पण त्याची धर्मश्रद्धा आंधळी नव्हती. धर्माला मान्य नसणाऱ्या गोष्टीही तो करी व कार्य साधी. कार्य महत्त्वाचे होते. धर्माचे काटेकोर पालन महत्त्वाचे नव्हते. एकदा मुसलमान झाला म्हणजे धर्म सोडला. धर्म सोडला म्हणजे मेला. मग मेलेला जिवंत कसा होणार? आणि या जन्मात पाप केल्याने पुढच्या जन्मात तर माणूससुद्धा होणार नाही. किडा किंवा मुंगी होणार. असे हिंदू धर्मशास्त्र सांगते. शिवाजीच्या काळात तर कठोरपणे सांगे. परंतु शिवाजीने मुसलमान झालेल्या हिंदूंना पुन्हा हिंदू करून घेतले. नुसते करून घेतले असे नाही तर त्यांच्याशी सोयरसंबंध जोडले. ते धर्मातून गेले होते म्हणजे हलके किंवा शूद्र झाले होते व आपण त्यांच्याशी संबंध कसा ठेवावा असे शिवाजीला वाटले नाही.

बजाजी निंबाळकर व नेताजी पालकर हे मुसलमान सुंता झालेले व मुसलमानांत दहा-पाच वर्षे राहिलेले मराठे शिवाजीने परत हिंदू करवून घेतले. 'लांड्या' म्हणून ज्याला हिणवत होते त्या बजाजी निंबाळकरास शिवाजीने स्वतःची मुलगी दिली. अफगाणिस्तानात आठ वर्षे राहिलेल्या नेताजी पालकरास शुद्ध करून स्वतःच्या पंक्तीस बसवून घेतले.

धर्मासंबंधीचा हा विचार पेशवाईत इतका मागे पडला की पेशवाईतला सर्वात शूर पुरुष बाजीराव स्वतःच्या मुसलमान प्रेयसीच्या—मस्तानीच्या—मुलास हिंदू करण्याची इच्छा असूनही हिंदू करू शकला नाही. समशेर बहाद्दरास कृष्णसिंग करीन म्हणणाऱ्या बाजीरावास ते तर जमले नाहीच उलट स्वतःलाच घराबाहेर पडावे लागले.

शिवाजीचा हिंदू धर्म आणि पेशवाईतला हिंदू धर्म एकच काय? शिवाजीने अस्पृश्यांस व महारांस किल्लेदार केले होते. पेशवाईत त्यांच्या पाठीला झाप बांधून अन् गळ्यात लोटके अडकवून रस्त्यांची शुद्धता केली जात होती. शिवाजीचा हिंदू धर्म आणि पेशव्यांचा हिंदू धर्म एकच काय? शिवाजीच्या नावाने सेना स्थापून हिंदूंचे ऐक्य घडवायला निघालेल्या सेनापतींना कोणता

हिंदू धर्म प्रस्थापित करायचाय? शिवाजीचा की पेशवाईतला?

शिवाजी महाराज अंधश्रद्धेच्या व खुळ्या समजुतींविरुद्ध कसे होते याची एक गमतीदार नोंद आहे.

मूल 'पालथे' जन्मणे हे अशुभ आहे अशी अंधश्रद्धा होती. राजाराम महाराज जन्मताना पालथे जन्मले. सर्वजण ते पाहून गप्प बसले. पुत्रजन्माचा आनंद कुणी दाखविना. महाराजांना हे समजले. ते म्हणाले, "पुत्र पालथा जन्मला, तो मुसलमान पातशाही पालथी घालील." मग सगळे आनंद व्यक्त करू लागले.[४४]

श्रद्धा वेगळी. अंधश्रद्धा वेगळी.

□□□

# इतिहासाचा विपर्यास का?

## शिवाजी आणि अवतार

शिवाजीवर मनापासून प्रेम करणाऱ्या कितीतरी मोठ्या जनसमुदायांत शिवाजी हा परमेश्वराचाच अवतार होता, अशी समजूत आहे. कुणी त्यास शिवाचा अवतार म्हणवतात तर कुणी विष्णूचा. आपल्या देशात आणि परंपरेत माणसाचा देव व्हायला वेळ लागत नाही. ऐतिहासिक थोर पुरुषाचं सोडा, एखाद्या चांगल्या माणसालासुद्धा 'देवमाणूस' म्हणण्याची आपली रीत आहे.

कुणी एखादा थोर पुरुष असला, त्यानं लोकहिताचं काही कार्य केलं की त्याला आपण देव मानतो. हा जसा देवभोळेपणा असतो आणि आहे तसा काहींचा सिद्धसाधकपणाही असतो. देव तयार केल्याखेरीज भक्तांचं साधत नसतं आणि म्हणून भक्त देव घडवत असतात आणि आपलं कार्य साधत असतात. शिवाजीला समकालीनांनी अवतार मानला होता की नाही कुणास ठाऊक. परंतु त्याच्या अंगी काही अलौकिक सामर्थ्य, चमत्कारिक सामर्थ्य इत्यादी लादलं होतं असं दिसतं. शिवाजीला पक्षासारखं उडता येतं. तो शाहिस्तेखानासमोर भिंतीतून प्रगटला, त्याला अदृश्य होण्याचं सामर्थ्य लाभलं होतं, अशी वर्णनं आढळतात. ही सारी वर्णनं खोटी आहेत यात वाद नाही. त्या काळी या अफवांचा शिवाजीला निष्ठा मिळवायला आणि यश संपादन करायला उपयोगही झाला असेल. पण अडाणीपणा आणि इतिहास यात फरक आहे.

शिवाजी माणूस होता. चांगला माणूस होता. थोर माणूस होता. हुशार व दूरदृष्टीचा माणूस होता. नीतिमान आणि व्यवहारी माणूस होता. शूर

लढवय्या आणि कुशल संघटक होता. पण माणूस होता. देव नव्हता. अवतार नव्हता.

शिवाजीचा देव केला म्हणजे काय होतं? देव केला की मग शिवाजीसारखं वागण्याची आपणावर जबाबदारी राहत नाही. "शिवाजीसारखं वागा", "रयतेला सतावू नका", "बलात्कार करणारांना पाठीशी घालू नका", "रयतेच्या भाजीच्या देठाला हात लावू नका", "स्वत:च्या धर्मावर श्रद्धा ठेवा पण परधर्माचा द्वेष करायला शिकवू नका" असं सांगितलं तर सरळ उत्तर येतं, "तो शिवाजी कुठं? आपण कुठं? तो देवाचा अवतार आणि आपण माणूस. आपल्याला ते कसं जमणार? आपण आपलं असंच वागायचं."

देव असल्यामुळे वर्षातून एकदा 'शिवाजी महाराज की जय' म्हणायचं, जयंती करायची, वर्गणी गोळा करायची, थोडी खर्चायची, थोडी खायची. जमलं तर थोडी खर्चायची अन् जास्त खायची. कपाळाला अष्टगंध लावायचा, गुलाल उधळायचा की काम झालं. शिवभक्त म्हणवून घ्यायला आपण रिकामे झालो. शिवाजीसारखं वागायची आपल्यावर जबाबदारी नाही. शिवाजीनं रयतेला मदत केली. आता त्याच्या भोंदू भक्तांनी रयतेला भीती घालायला त्याचाच उपयोग करायचा. दारूच्या अड्ड्यावर, मटक्याच्या गाडीवर, बेकायदा वाहतूक करणाऱ्या मोटारीवर शिवाजीचा झेंडा अन् शिवाजीचा फोटो लावायचा अन् काळे धंदे चालवायचे. हा शिवाजीचा गैरवापर आहे. शिवाजी नीट समजून घेऊन हे थांबवले पाहिजे. भोंदू कोण अन् भक्त कोण हे ओळखायला शिवाजी समजून घ्यावा.

## शिवाजी व भवानी तलवार

भोळ्याभाबड्या शिवभक्त रयतेमध्ये आणि अर्धवट शिकलेल्यांमध्येसुद्धा शिवाजीच्या यशाचं एक कारण पुन:पुन्हा सांगून रुजवलं गेलंय. ते म्हणजे शिवाजी महाराजांना भवानीमाता प्रसन्न झाली होती. म्हणून शिवाजी यशस्वी झाला.

महाराष्ट्राचे एक मुख्यमंत्री शिवाजीची ही भवानी तलवार शोधून आणून लोकप्रिय व्हायच्या उद्योगात बराच काळ होते. तर दुसरीकडे महाराष्ट्रात आमचे राज्य येणार असे स्वप्न उराशी बाळगणारे दुसरे नेते महाराष्ट्रातून 'जय शिवाजी जय भवानी' असा गजर उठवत आहेत.

शिवाजी महाराजांनी वापरलेली तलवार पोर्तुगालमध्ये तयार झाली होती, हे आता संशोधकांनी दाखवून दिले आहे. पोर्तुगालमध्ये धातूपासून तलवारी तयार करण्याचे शास्त्र आपल्यापेक्षा तेव्हा प्रगत होते. पोर्तुगिजांबरोबर गोव्यात ही तलवार आली. तिथून ती सावंताकडे गेली व तिथून शिवाजी महाराजांकडे आली असा खरा इतिहास आहे. या तलवारीशी भवानी मातेचा काही संबंध नाही. साताऱ्यात एक म्युझियम आहे. त्यात एक तलवार आहे. ही तलवार शिवाजी महाराज वापरीत असे सांगितले जाते. तीच भवानी तलवार आहे की नाही यासंबंधी वाद आहे. परंतु साताऱ्याच्या म्युझियममधील या तलवारीवर पोर्तुगीज भाषेतील अक्षरे आहेत. आजही ती कुणासही पाहता येतील.

लोकांचा अडाणीपणा, लोकांची श्रद्धा हेच आपले भांडवल करून लग्गा साधू पाहणारे लोकांना सत्य समजू देण्यास तयार नसतात. सारखे सारखे सकाळ-संध्याकाळ 'जय शिवाजी जय भवानी' म्हटल्याने शिवाजी समजत नाही. भवानीमाता कळत नाही.

## भोंदू भक्तांपासून शिवाजीला धोका

अनेक थोर पुरुषांच्या बाबतीत एक शोकांतिका पुन:पुन्हा घडवली जाते. त्या थोर पुरुषाला त्याच्या हयातीत त्या काळातले प्रस्थापित लोक विरोध करतात. त्याच्या तत्त्वाला व कार्याला विरोध करतात. जमलं तर ठारसुद्धा करतात. सर्व काही करतात. एवढंही करून त्याचं थोरपण नाहीसं होत नाही. सामान्य लोक त्याला व त्याच्या मागे त्याच्या विचाराला मानतात. तसे वागायचा प्रयत्न करतात. मग तेच प्रस्थापित लोक दुसरी युक्ती करतात. ते स्वत:च त्या थोर पुरुषाचे भक्त बनतात. त्याचा उदो उदो करतात. त्याच्या जयंत्या अन् मयंत्या साजऱ्या करतात. त्याची देवळं बांधतात. फोटो छापतात. हे सर्व करताना एक युक्ती योजतात. त्या थोर पुरुषांचा सामान्यांच्या कल्याणाचा विचार विकृत करतात, नाही तर पुसून टाकतात. प्रस्थापितांना विरोध करण्याची त्यांची शिकवण लोकांपर्यंत पोहोचणार नाही अशी काळजी घेतात. लोकांनाच फसवतात. खोटा इतिहास लिहितात. खोटा इतिहास शिकवतात. खरं आणि खोटं यांची बेमालूम भेसळ करून विकतात अन् मुळात जो विचार प्रस्थापितांच्या विरोधी असतो तोच विचार त्यांचं बस्तान पुन्हा बसवायला उपयोगात आणतात.

ज्या थोर पुरुषांच्या प्रतिमा आणि प्रतीके सामान्यजनांना आदराच्या,

श्रद्धेच्या अन् निष्ठेच्या वाटतात, त्याच प्रतिमा हे टगे उचलतात. त्या विकृत करतात आणि त्यांचा गाभाच गारद करून टाकतात. प्रस्थापित मंडळी मोठी हुशार असतात. कुणी सत्तेमुळे प्रस्थापित असतात, कुणी संपत्तीने प्रस्थापित असतात, कुणी प्रतिष्ठेने प्रस्थापित असतात. खरं म्हणजे हे सर्व एकच असतात.

असे अनेकांच्या बाबतीत घडत आलं आहे आणि आजही घडतंय.

ज्ञानेश्वरानं संस्कृतातलं ज्ञान प्राकृतात आणलं. मूठभरांची ज्ञानाची मक्तेदारी मोडली. लोकांना ज्ञान दिलं. अगदी अडाण्यातल्या अडाण्याला ज्ञान दिलं. त्यांना समजेल अशा भाषेत दिलं. अगदी अडाण्याचं रूपक अशा अर्थानं रेड्यालासुद्धा वेद बोलायला लावला. ज्ञानाच्या प्रस्थापित मक्तेदारांविरुद्ध बंड केलं.

ज्ञानाच्या मक्तेदारांनी त्याच्या हयातीत त्याला कडाडून विरोध केला. संन्याशाची पोरं म्हणून ज्ञानेश्वराला आणि त्याच्या भावंडांना वाळीत टाकलं. त्यांची मुंज करायला नकार दिला. (ज्ञानेश्वराकडे लाखो गणती मोहरा नव्हत्या आणि त्याला कुणी गागाभट्ट भेटला नाही. नाही तर कुणी सांगावं कदाचित शिवाजीचा राज्याभिषेक झाला तशी त्याचीही मुंज झाली असती). ज्ञानेश्वराने अगदी अल्प वयात समाधी घेतली. (समाधी घेतली हे तरी खरं का?)

ज्यांनी ज्ञानेश्वराच्या हयातीत त्याला विरोध केला, ज्ञानप्रसाराला ज्यांनी विरोध केला, त्यांचे सांस्कृतिक, धार्मिक, लौकिक असे सर्व वारसदार नंतर ज्ञानेश्वरांची स्तुती करू लागले आणि ज्ञानेश्वरासारखा थोर पुरुष झालाच नाही असं तेच सांगू लागले आणि ज्ञानेश्वरांचं नाव घेत घेत सामान्यांना शिक्षणाचा हक्क नाकारू लागले. त्यांना शहाणं व्हायला प्रतिबंध करू लागले. ज्ञानेश्वरांच्याही अगोदर प्राकृतात ग्रंथ रचून ज्ञानप्रसार करणाऱ्या चक्रधरांना तर संतांनीही वाळीत टाकले.

तुकारामाच्या हयातीत मंबाजी आणि त्याचे सर्व साथीदार यांनी त्याला कसून विरोध केला. त्याचे अभंग नदीत बुडवले. गाथा इंद्रायणीच्या डोहात बुडवली आणि तुकारामाचे काय केले कोणास ठाऊक. पण तो सदेह वैकुंठाला गेला अशी आवई मात्र जोरात उठवली. अगदी त्याला न्यायला स्वर्गातून आलेलं विमानसुद्धा सिनेमात दाखवलं अन् चित्रात रंगवलं.

नदीत बुडवूनही तुकारामाचे अभंग लोकांत राहिलेच. ते तेच म्हणू लागले

आणि जेव्हा अभंग बुडवूनसुद्धा अन् तुकारामाला स्वर्गाला पोहोचवूनही तुकाराम संपत नाही असं दिसून आलं तेव्हा मंबाजीचे सर्व प्रकारचे सर्व वारसदार तुकारामाचे कौतुक करू लागले. त्याच्या अभंगात आपले फुसके अभंग घुसडू लागले. त्याच्या अभंगावर कथा-कीर्तने करू लागले. पण हे करताना एक करू लागले की तुकारामाने अंधश्रद्धेवर व अन्यायावर जे कोरडे ओढले होते ते लोकांपर्यंत पोहोचणार नाहीत अशी दक्षता घेऊ लागले.

फार लांब कशाला? म. गांधींचे काय केले? ठरवून खून केला. कट करून खून केला. कटातले काही शिताफीने सुटले. कोण फाशी गेले. कोण भोगून सुटले. आता काय सांगतात, "म. गांधींची हत्या एका माथेफिरूनं केली." कट करणारे माथेफिरू होते काय? राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पुण्याच्या पुढाऱ्याने—नथुराम गोडसे याने—म. गांधींचा खून केला. तो माथेफिरू होता काय?

म. गांधींचा खून झाला तेव्हा पेढे वाटले व खाल्ले. नथुराम गोडसेचा हुतात्मा म्हणून गौरव केला आणि आता नथुराम गोडसेचे सहकारी अन् अनुयायी काय सांगतात? ते म्हणतात, "आम्ही गांधीवादी समाजवादी" आहोत. आहे की नाही कमाल?

खून करूनही महात्मा गांधी संपत नाहीत असे दिसले म्हणून मग हे स्वतः गांधीवादी बनून गांधींना संपवायला निघालेत. दुसरे काय? जगाच्या इतिहासात अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

## शिवाजी आज असता तर...

शिवाजीलासुद्धा ज्ञानेश्वर, तुकाराम, म. गांधी यांच्यासारखंच विकृत करायचा कार्यक्रम बराच काळ सुरू आहे. सध्याही चालू आहे.

शिवाजी वतने देण्याच्या विरुद्ध होता. त्याने आयुष्यभर वतने देण्याचे टाळले. आताचे प्रस्थापित शिवभक्त नवी नवी वतने तयार करीत आहेत. वतनदारांना सांगत आहेत की तुमच्या वतनात तुम्ही हवं ते करा. रयतेला हवं तसं लुटा. खा, प्या, मजा करा. आमचे राज्य चालवायला आम्हाला मदत करा म्हणजे झालं. म्हणजे आम्हीसुद्धा रयतेला लुटू. तुम्ही थोड्या प्रमाणात लुटा. आम्ही मोठ्या प्रमाणात लुटू. तुम्ही हजारांत, क्वचित लाखांत खा. आम्ही कोटींत खाऊ.

शिवाजीच्या काळातील वतने आता नाहीत हे खरे. पण नवी वतने आणि नवे वतनदार वाढताहेत. झेड. पी.ची वतने सर्व जिल्ह्यांत आहेत. साखरसम्राट म्हणजे नवे वतनदारच आहेत. वेगवेगळी कार्पोरेशन्स म्हणजे वतनदाऱ्या आहेत. मोठ्या सहकारी संस्था, म्युनिसिपालट्या, आमदारक्या, खासदारक्या यांना वतनाचे स्वरूप आले आहे आणि या वतनदाऱ्या आता वंशपरंपरेने दिल्या-घेतल्या जात आहेत.

लोकशाहीत सत्तेचे विकेंद्रीकरण हवेच, त्याला विरोध कुणी करणार नाही. पण विकेंद्रीकरण म्हणजे वतनदारी नव्हे. शिवाजीच्या काळात वतनदार जसे जनतेला छळीत त्यापेक्षा हे नवे वतनदार जास्त छळतात. साखरसम्राटाच्या विरुद्ध कुणी एखादा रयत गेला तर तो संपलाच. त्याला कर्ज मिळत नाही, खत मिळत नाही, त्याचा ऊस जात नाही. दोन वर्षांत तो बरबाद होतो अन् एक बरबाद झाला की दुसरे दहा जण धजत नाहीत अन् वतनदारांचं वतन घट्ट होतं.

रयतेच्या पोरीबाळींवर या नव्या वतनदारांचा डोळा आहे की नाही? बलात्कार होताहेत की नाही? रयतेच्या भाजीच्या देठालासुद्धा हात लावू नका म्हणून शिकवून गेलेल्या शिवाजीच्या महाराष्ट्रात नव्या राजांची, सरदारांची अन् वतनदारांची सरबराई करण्यात रयत रंजीस येते की नाही?

आणि हे सारं 'शिवाजी महाराज की जय' म्हणत सुरू असतं. हे अगदीच भयानक. शिवाजी हे सारं पाहायला असता तर? त्यानं काय केलं असतं? तो नाही हे खरं आहे. तो स्वत: येणार नाही हेसुद्धा तितकंच खरं आहे. पण त्याची शिकवण आहे ना? त्याची शिकवण अंगी बाणून नव्या वतनदारांवर प्रहार करणं हेच खरं शिवाजीचं स्मरण करणं होय.

आज शिवाजीच्या नावानं आणि शिवाजीच्या जयघोषात हिंदू-मुसलमान दंगे होत आहेत. या धर्मांधांना सांगायला पाहिजे की शिवाजी धर्मांध नव्हता. हिंदू धर्मावर श्रद्धा ठेवीत होता पण मुसलमान धर्माचा द्वेष करीत नव्हता. श्रद्धावान होता पण अंधश्रद्ध नव्हता.

हिंदूंत दंगेखोर धर्मांध आहेत. तसे मुसलमानांतसुद्धा दंगेखोर आहेत. धर्मांध आहेत. काही मुसलमान तर स्वत:ला शहेनशहाचेच वारस समजतात. आपण या देशात राज्य केले होते असे समजतात. अरे या देशात जेव्हा मुसलमानांचे राज्य होते तेव्हासुद्धा सारे मुसलमान बिर्याणी झोडत नव्हते अन् शराब पीत नव्हते. बहुसंख्य बिचारे गरीबच होते.

शिवाय शिवाजीचं स्वराज्य स्थापायला ज्या मुसलमानांचे प्राण खर्ची पडले; ज्यांचे रक्त सांडले तेसुद्धा तुमचेच पूर्वज होते ना? की औरंगजेब तेवढा तुमचा पूर्वज आणि मदारी म्हेतर कुणीच नव्हे! आदिलशहा तेवढा पूर्वज अन् इब्राहिमखान, दौलतखान अन् काझी हैदर तुमचे कुणीच नव्हेत? शिवाजीनं स्थापलेलं स्वराज्य फक्त हिंदूंसाठी नव्हतं. ते महाराष्ट्रातल्या मुसलमानांसाठीसुद्धा होतं. मग महाराष्ट्रातल्या मुसलमानांनी शिवाजी आपला मानला पाहिजे की नको?

शिवाजीच्या नावानं मुसलमानांवर जसे हल्ले होताहेत तसेच दलितांवरसुद्धा हल्ले होतात. "जय भवानी, जय शिवाजी" या घोषणा होतात. राखीव जागांना विरोध करणारे "शिवाजी महाराज की जय" म्हणतात आणि हे विसरतात की शिवाजीनं जाणीवपूर्वक आपल्या नोकरीत दलितांना ठेवलं होतं. त्यांना मोठं केलं होतं.

## इतिहासाचा विपर्यास का केला जातो?

अगदी अलीकडच्या काळातील असो किंवा जुन्या काळातील असो, थोर पुरुषांच्या चारित्र्याचा, त्यांच्या विचारांचा, त्यांच्या प्रेरणांचा विपर्यास का केला जातो?

हे उगाच घडत नाही. त्यात अडाणीपणाचा जसा भाग असतो तसा खोडसाळपणाचा अन् आपमतलबीपणाचाही भाग असतो. दोन्हींचा परिणाम मात्र तसा एकच होतो.

## आता शिवाजीचे पहा

सर्वांनी मिळून शिवाजीचे काय केले? गेल्या पन्नास वर्षांत शिवाजीला मोठा केला की छोटा केला? प्रादेशिक विस्ताराच्या मापानं शिवाजीची मान्यता विस्तारली की कमी झाली?

पन्नास वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांचे फोटो महाराष्ट्राबाहेरसुद्धा असत. मध्य प्रदेशात असत. दक्षिणेत कर्नाटकात असत. बडोद्यात वा गुजरातेत असत. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ झाली आणि आपण सर्वांनी शिवाजी महाराजांच्या इतिहासाच्या साह्यानं महाराष्ट्राची अस्मिता जागी केली. संयुक्त महाराष्ट्राची भाषिक राज्यांची चळवळ बरोबरच होती. राज्यभाषा कोश तयार करवून घेणाऱ्या शिवाजी महाराजांच्या इतिहासाची आठवण करणं आणि उपयोग करणं

रास्त आणि योग्यच होतं. पण आपण तारतम्य ठेवलं नाही.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे एक खंदे प्रचारक आचार्य अत्रे तेव्हा म्हणायचे की, "महाराष्ट्राला इतिहास आहे अन् इतरांना फक्त भूगोल आहे." या वाक्याला हमखास प्रचंड टाळ्या पडायच्या, पण हा अतिरेक झाला. महाराष्ट्राला शिवाजी प्रिय आहे. शिवाजीचा इतिहास आहे, तसा कर्नाटकाला राणी चेन्नमाचा इतिहास नाही काय? राजस्थानला राणा प्रतापाचा इतिहास नाही काय? मध्य प्रदेश आणि गुजराथ ही राज्ये काय काल अचानक जन्माला आली? प्रचाराच्या भरात तारतम्य सुटले. संयुक्त महाराष्ट्र झाला आणि शिवाजी जो महाराष्ट्राच्या बाहेर होता त्याला आपण महाराष्ट्रात कोंडला. फक्त महाराष्ट्राचा केला.

आता महाराष्ट्रात काय सुरू आहे? शिवसेना स्थापली. सुरुवातीला बिगर महाराष्ट्रीयांविरुद्ध आणि आता मुसलमानांविरुद्ध जे काही बोलले किंवा केले गेले व केले जाते ते सर्व शिवाजीच्या नावाने केले जाते. हिंदू एकता स्थापना केली. मराठा महासंघ स्थापला. पतित पावन संघटना स्थापली. शिवाजीचा आणि भवानीचा गजर सुरू ठेवला.

शिवाजी जो महाराष्ट्राचा होता त्याला आता महाराष्ट्रातल्या हिंदूंचा केला. आता तर त्याला साऱ्या हिंदूंचाही ठेवला नाही. त्याला 'गोब्राह्मण प्रतिपालक' केला. मराठा महासंघ स्थापून मराठ्यांचा केला. राखीव जागांना विरोध करताना खच्चून 'शिवाजी महाराज की जय' केला. मराठवाड्यात आणि इतरत्र दलित वस्त्यांवर हल्ले करताना "जय भवानी, जय शिवाजी"चा घोष केला अन् शिवाजीला फक्त उच्चवर्णीय हिंदूंचा केला. ब्राह्मणांचा अन् नव्या-जुन्या, खऱ्या-खोट्या ९६ कुळीच्या मराठ्यांचा केला.

स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी शिवाजीचा उपयोग केला. अशीच गोष्ट जागतिक महायुद्धाच्या काळात घडली होती. ब्रिटिशांना सैन्यात लोक यायला हवे होते. त्यांनी पोस्टर्स छापली. त्यावर शिवाजीचा फोटो छापला अन् आवाहन केले, "शिवाजीच्या मावळ्यांनो! सैन्यात चला! शिवाजी शूर होता, तुम्ही शूर आहात. लढाईला चला!" देशाला पारतंत्र्यात डांबून ठेवणाऱ्यांनी शिवाजीचा उपयोग करून घेतला. आता देशाचे तुकडे पाडायला निघालेले आणि गोरगरीब रयतेत जातिधर्माच्या नावाने बेदिली माजवणारे शिवाजीच्या नावाचा उपयोग करताहेत.

ते करताहेत ते करू द्या. पण आपण का करू द्यावे? ते खोटा इतिहास सांगतात किंवा सांगतच नाहीत. नुसतेच 'जय' म्हणतात. पण आपण खरा इतिहास सांगावा. नुसते 'जय' म्हणू नये.

सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा, ज्ञान या बाबतीत ज्यांचं बरं चाललेलं असतं ते आहे ते टिकवायला नुसत्या बळाचा वापर करत नाहीत. नुसत्या दंडुक्याचा, शस्त्राचा आणि शासनाचा वापर करीत नाहीत. विचाराचा वापर करतात. इतिहासाचा वापर करतात. लोकांना असा विचार सांगतात, असा विचार पटवतात, असे तत्त्वज्ञान त्यांच्या गळी मारतात, असा इतिहास त्यांना शिकवतात की त्यांचे फावते. ज्याच्या हाती जे आहे ते त्याच्याकडेच राहायला या विचाराची, या तत्त्वज्ञानाची, खऱ्या, खोट्या, विकृत, खोडसाळ इतिहासाची मदत होते. विचार हे अगदी प्रभावी हत्यार आहे. टिकाऊ आहे. बंदुकीपेक्षा श्रेष्ठ आहे. या हत्याराचा प्रस्थापित वापर करीत असतात.

पण ज्यांच्या हाती काही आहे ते जसे विचाराचा उपयोग करून आहे ते टिकवतात तसेच त्यांच्या हातचे काढून घ्यायचे असेल तर काढून घेऊ पाहणाऱ्यांनासुद्धा विचाराचे हत्यार बळकट करावे लागते.

वैचारिक पायाखेरीज बदल होऊ शकत नाही. म्हणून आजच्या रयतेनं शिवाजीचा खरा इतिहास शोधला पाहिजे. त्याचा योग्य अर्थ लावला पाहिजे. इतिहासात टाकाऊ असेल ते टाकले पाहिजे. पुढे घेऊन जाण्यायोग्य जे असेल त्यात नव्या प्रगत विचारांची भर घालून प्राप्त काळाला योग्य अशा रीतीने अभ्यासून ते पुढे नेले पाहिजे.

शिवाजीच्या इतिहासात, शिवाजीच्या विचारात, व्यवहारात, शिवाजीच्या कार्याच्या प्रेरणेत आजही उपयुक्त ठरू शकेल असे बरेच काही आहे. ते नीट समजून घेतले पाहिजे आणि पुढे नेले पाहिजे.

❑❑❑

# छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे

## चिपळूणच्या जुमलेदार, हवालदार व कारकुनास लिहिलेले पत्र

श. १५९३ वैशाख शु. १५
सु. १०७४ सफर १२
इ. १६७३ मे १९

**श्री भवानी शंकर**

मशरुल अनाम राजश्री जुमलेदारानी व हवालदारानी व कारकुनानी दिमत पायगो मुक्काम मौजे हलवर्ण ता। चिपळूण मामले दाभोळ प्रति राजश्री शिवाजी राजे सु।। अर्बा सबैन व अफल. कसबे चिपळूणी साहेबी लष्कराची विले केली आणि याउपरि घाटावरी कटक जावे ऐसा मान नाही. म्हणून एव्हां छावणीस रवाना केले. ऐसियास, चिपळूणी कटकाचा मुक्काम होता याकरिता दाभोळच्या सुबेयांत पावसाळ्याकारणे पागेनसामा व दाणा व वरकड केला होता तो कितेक खर्च होऊन गेला व चिपळूण आसपास विलातीत लष्कराचीच सवीस व गवताची व वरकड हरएक बाब लागली त्या करिता हाल काही उरला नाही. ऐसे असता वैशाखाचे वीस दिवस, उनाळा, हेही पागेस अधिक बैठी पडली. परंतु जरूर जाले त्याकरिता कारकुनाकडून व गडोगडी गल्ला असेल तो देववून जैसी तैसी पागेची बेगमी केली आहे. त्यास, तुम्ही मनास ऐसा दाणा, रातीब, गवत मागाल, असेल तोंवरी धुंदी करून चाराल, नाहीसे जाले म्हणजे मग काही पडत्या पावसात मिळणार नाही, उपास पडतील, घोडी मरायास लागतील. म्हणजे घोडी तुम्हीच मारिली ऐसे होईल व विलातीस तसवीस देऊ लागला. ऐशास, लोक जातील, कोण्ही कुणब्याचेथील दाणे

आणील, कोण्ही भाकर, कोण्ही गवत, कोण्ही फाटे, कोण्ही भाजी, कोण्ही पाले. ऐसे करू लागलेत म्हणजे जी कुणबी घर धरून जीवमात्र घेऊन राहिले आहेत तेंही जाऊ लागतील. कितेक उपाशी मराया लागतील. म्हणजे त्याला ऐसे होईल की मोंगल मुलकात आले त्याहूनही अधिक तुम्ही! ऐसा तळतळाट होईल! तेव्हा रयतीची व घोडियांची सारी बदनामी तुम्हावरी येईल. हे तुम्ही बरे जाणून, सिपाही हो अगर पावखलक हो, गाव राहिले असाल त्याणी रयतेस काडीचा अजार द्यावया गरज नाही. साहेबी खजानांतून वाटणिया पदरी घातलिया आहे ती ज्याला जे पाहिजे, दाणा हो अगर गुरेंढोरे वागवीत असाल त्यास गवत हो, अगर फाटे, भाजीपाले व वरकड विकावया येईल ते रास घ्यावे, बाजारास जावे, रास विकत आणावे, कोण्हावरी जुलूम अगर ज्याजती अगर कोण्हासी कलागती करावयाची गरज नाही व पागेस सामा केला आहे तो पावसाळा पुरला पाहिजे. ऐसे तजविजीने दाणा रातीब कारकून देत जातील तेणेप्रमाणेच घेत जाणे, की उपास न पडता रोज बरोज खायाला सांपडे आणि होत होत घोडी तवाना होत ऐसे करणे. नसतीच कारकुनासी धसपस कराया, अगर अमकेच द्या, तमकेच द्या ऐसे म्हणाया, धुंदी करून खासदारकोठीत + कोठरात शिरून लुटाया गरज नाही व हाली उनाळ्याला आहे तइसे खलफ पागेचे आहेत, खण धरून राहिले असतील व राहातील. कोण्ही आगट्या करितील, कोण्ही भलतेच जागी चुली रधनाळा करितील, कोण्ही तंबाकूला आगी घेतील, गवत पडिले आहे, ऐसे अगर वारे लागले आहे, ऐसे मनास ना आणिता म्हणजे अविस्राच एखादा दगा होईल. एका खणास आगी लागली म्हणजे सारे खण जळोन जातील. गवताच्या लहळ्यांस कोणीकडून तरी विस्तो जाऊन पडला म्हणजे सारे गवत व लहळ्या आहेत तितक्या एकेएक जाळो जातील. तेव्हा मग काही कुणबियांच्या गर्दना मारल्या अगर कारकुनांस ताकीद करावी तैसी केला तऱ्ही काही खण कराया एक लाकूड मिळणार नाही, एक खण होणार नाही. हे तो अवघियाला कळते. या कारणे, बरी ताकीद करून, खासे खासे असाल ते हमेषा फिरत जाऊन, रंधनेकरिता, आगट्या जाळीता, अगर रात्रीस दिवा घरांत असेल, अविस्राच उंदीर वात नेईल, ते गोष्टी न हो. आगीचा दगा न हो. खण गवत वांचेल ते करणे म्हणजे पावसाळा घोडी वाचली. नाही तर मग घोडी बांधावी नलगेत, खायास घालावे नलगे, पागाच बुडाली!!! तुम्ही निसूर जालेत!!! ऐसे होईल. या कारणे तपशिले तुम्हास लिहिले असे. जितके खासे खासे जुमलेवार, हवालदार, कारकून आहा तितके हा रोखा तपशिले ऐकणे, आण हुशार

राहाणे वरचेवरी रोजाचारोज खबर घेऊन ताकीद करून, येणेप्रमाणे वर्तणूक करिता ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल, त्यास, मराठियाची तो इज्जत वाचणार नाही, मग रोजगार कैसा? खळक समजो जास्ती केल्यावेगळ सोडणार नाही. हे बरे म्हणून वर्तणूक करणे. छ.१२ सफर.

❏❏❏

पायगो - फौज
विलेकेली - व्यवस्था नेमून दिली
पावखलक - पायदळातील लोक
तवाना - सशक्त
निसूर - निष्काळजी.
दलवटणे - सैन्याची छावणी
रातीब - रोजचा खुराक
ज्याजती - जुलूम
रंधनेकरिता - अन्न शिजवताना

## महसुलासंबंधी सुबेदारास पत्र

श. १५९८ भाद्र. शु. ८
सु. १०७७ रजब ६
इ. १६७६ सप्टें. ५

श्री शंकर

मशहूरल हजरत राजश्री रामाजी अनंत सुबेदार मामले प्रेभावेली प्रती राजश्री शिवाजी राजे दंडवत सुहूर सन सबा सबैन अलफ साहेब मेहरबान होऊन सुभात फर्माविला आहे. येसियास चोरी न करावी इमाने इतबारे साहेबकाम करावे येसी तू क्रियाच केलीच आहेस तेणेप्रमाणे येक भाजीच्या देठास तेही मन न दाखविता रास व दुरुस वर्तणे याउपरि कमाविस कारभारास बरे दरतुरोज लावणी संचणी उगवणी जेसी जेसी जे जे वेलेस जे करू येते ते करीत जाणे हर भातेने साहेबाचा वतु... होये ते करीत जाणे मुलकात बटाईचा तह चालत आहे परंतु रयतीवर जाल रयतीचा वाटा रयतीस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे रयेतीवर काडीचे जाल व गैर केलिया साहेब तुजवर राजी नाहीत जैसे बरे समजणे दुसरी गोष्ट की रयेतीपासून यैन जिनसाचे नक्ष घ्यावे येसा येकंदर हुकूम नाही सर्वथा येन जिनसाचे नख्त घेत घेत नव जाणे येन जिनसाचे येन जिनसच उसूल घेऊन जमा करीत जाणे आणि मग वेलचे वेलेस विकीत जाणे की ज्या ज्या हुनेरेने माहाग विकेल आणि फायेदा होयें ते करीत जाणे उसूल हंगामसीर घ्यावा आणि साठवण करून आणि विकरा येसा करावा की कोण्हे वेलेस कोण जिनमच विकावा ते हंगामी तो जिनस विकावा जिनस तरी पडेन जाया नव्हे आणि विकरा तरी माहाग यैसे हुनेरेने नारल खोबरे, सुपारी, मिरे, विकीत जाणे महाग धारणे जरी दाहा बाजार यैन जिनस विकेल तर तो फायेदा जाहालियाचा मजरा तुझाच आहे येसे समजणे त्याउपरि रयेतीस तवाना करावे आणि कीर्द करवावी हे गोस्टीस इलाज साहेबी तुज येसा फर्माविला आहे की कष्ट करून गावाचा गाव फिरावे ज्या गावात जावे तेथील कुलबी किती आहेती ते गोला करावे त्यात ज्याला जे सेत करावया कुवत माणुसबल असेली त्या माफीक त्या पासी बेलदाणे संच आसीला तर बरेत जाले. त्याचा तो कीर्द करील ज्याला सेत करावयास कुवत आहे माणूस आहे आणि त्याला जोतास बैल नांगर पोटास दाणे नाही त्यावीण तो आडोन निकामी जाला असेल तरी त्याला रोख पैके हाती घेऊन दोचो बैलाचे पैके द्यावे बैल घेवावे व पोटास

खंडि दो खंडि दाणे द्यावे जे सेत त्याच्याने करवेल तितके करवावे पेस्तर त्यापासून बैलाचे व गल्याचे पैके वाढीदिडी न करिता मुदलच उसनेच हळूहळू याचे तवानगी माफीक घेत घेत उसूल घ्यावा जोवरी त्याला तवानगी येई तोवरी वागवावे या कलमास जरी दोन लाख लारीपावेतो खर्च करिसील आणि कुणबिया कुनब्याची खबर घेऊन त्याला त॒ ॒नगी ये ती करून कीर्द करिसील आणि पडजमीन लाऊन दस्त जाजती करून देसील तरी साहेबा कबूल असतील तैसेच कुलबी तरी आहे पुढे कष्ट करावया उमेद धरितो आणि मागील बाकीचे जलित त्यावरी केले आहे ते त्यापासून घ्यावया मवसर तरी काही नाही ते बाकीचे खडवे तो कुलबी मोडोन निकाम जाला या उपरि जाऊन पाहातो येसी जे बाकी रयतीवरी आसेल ते कुलाचे कुल माफ करावया खडवे तोकुब करून पेस्तर साहेबास समजाविणे की ये रवेसीने कीर्द करवून साहेबाचा फायेदा केला आहे आणि आमकी येक बाकी गैर उसली मफलीस कुलास माफ केली आहे येसे समजावणे साहेब ते माफीची सनद देतील जे बाकी नफर निसबत आसली ते हिसेबीच उसूल घेत जाणे बाकीदार माहाल न करणे ये रवेसीने तुजला पदनसी येत तपसिले करून हा रोखा लिहून दिधला आसे आकलेने व तजवजीने समजोन याप्रमाणे कारबार करीत जाणे की तुझा कामगारपणाचा मजरा होये आणि साहेब तुजवरी मेहरबान होत ते करणे जाणिजे रा। छ ६ माहे रजब.

दस्त - सरकारी महसूल.  जाजत्ती - जास्ती
जलित - जुलूम  तवानगी - सामर्थ्य
मफलीस - गरीब  मजरा - मोबदला
कीर्द - लावणी  नफर निसबत - माणसाच्या अंगची
पदसीयत - पदाला योग्य असा उपदेश

## जिजिया कराबद्दल औरंगजेबास पत्र

श. १५७९
इ.स.१६५७

सत्यवचनी शिवाजी - औरंगजेब

प्रारब्धयोगाने हुजूरून निरोपाशिवाय आलो. परंतु यथायोग्य सेवेचे

सांप्रदायांत हजर आहे. ती चांगली सेवा व उत्तम प्रयत्न. हिंदुस्थान व इराण व दुराण व रूम व शाम येथील बादशहा व उमराव मोगल व राजे लोकच राणे यास व खेरीज सात मुलुखाचे रहाणार व खुषकी व तरी येथील मुशाफर यास जाहीर आहेत. त्यापेक्षा आपले अंत:करण समुद्राप्रमाणे आहे त्यासही विदित जाहलेच असेल. याजकरता कित्येक गोष्टी ज्यात आबालवृद्धांचे कल्याण राही अशा लिहिल्या जातात. सांप्रत आम्ही इकडे आल्यावर पादशाही खजिना रिकामा जाहला व सारे द्रव्य खर्च झाले. याजकरिता हिंदू लोकांपासून जजिया पट्टीचे द्रव्य उत्पन्न करून पादशहातीचा क्रम चालविला आहे ऐसे ऐकण्यात आले. त्यास पूर्वी अकबर बादशहा याणी न्यायाने बावन्न वर्षे राज्य केले. यामुळे इसवी व दाउदी व महमदी वगैरे याती खेरीज ब्राह्मण व शेवडे वगैरे हिंदू लोक यांचे धर्म चांगले चालले व त्या धर्माचे संस्थापनाविषयी ते बादाशाही मदत ठेवीत होते याजकरता जगतगुरू अशी त्यांची प्रसिद्धी जाहली व अशा सद्वासनेच्या योगाने हरएक स्थळी त्यांची नजर पडत होती तेथे यश येत होते व कित्येक मुलूख सर केले. त्याजवर नुरुद्दीन जहांगीर बादशहा याणी बावीस वर्षे बादशाही ईश्वरी लक्ष ठेऊन केली नंतर स्वर्गास पोहोचले. शहाजहान साहेब किरान याणी बत्तीस वर्षे बादशहात करून उपरात राहिले. आयुष्य चांगलेपणात घालून निरंतर कीर्ति मिळविली. येविषयी दृष्टान्त जो पुरुष जिवंत असताना लोकिकवान व मागे ज्यांची चांगली कीर्ति असा जो त्यांजला अचल लक्ष्मी प्राप्त जाहली असे आहे. सदरी लिहिले पादशहाचा प्रताप व पराक्रम असा त्याणी दस्तुर व वहिवाटी केल्या. त्याचे रक्षण करण्यात अलमगीर फिकिरवंद जाहले. ते बादशहाही जजियापट्टी घेण्यास समर्थ होते. परंतु सारे लहान-मोठे आपलाले धर्मावर आहेत ते सर्व ईश्वराचे आहेत. असे जाणून कोणावर जुलूम करावा हे त्यानी मनात आणिले नाही. त्यांचे उपकाराची कीर्ति अद्याप आहे व हरएक लहानमोठे यांचे मुखी त्यांची स्तुती व आशीर्वाद आहे. जशी नियेत तशी त्यास वरकत. त्या बादशहांची दृष्टी लोकांचे कल्याणांत होती. हली आपले कारकीर्दीत कित्येत किले व मुलूख गेले बाकी राहिले तेही जातात, कारण जे खराबी करण्याविषयी कमतर नाही. जे रयत लोक खराब आहेत. हरएक महालाचे उत्पन्न लाखास एक हजार येणे कठीण असे जाहले. बादशहा व बादशहाजादे यांचे घरी दारिद्र्याचा वास जाहला. तेव्हा पदरचे मनसबदार व उमराव यांची अवस्था कळतच आहे. सारंश, शिपाई लोक हैराण, व सवदागर पुकारा करतात व मुसलमान रडतात, हिंदुलोक मनात जळतात आणि कित्येक लोकांस पोटास मिळत नाही असे आहे. तेव्हा

राज्य चालविणे कसे? त्यांजवर जजिया पट्टीचा उपद्रव या प्रकारचा. ती पूर्व पश्चिमे पावेतो जाहीर जाहला आहे की, हिंदुस्थानचे पातशाहा फकीर व ब्राह्मण व शेवडे व जोगी व संन्यासी व वैरागी व अनाथ गरीब व थकलेले व पडलेले असे एकंदर लोकांपासून जजिया घेतात व यातच पुरुषार्थ असे समजतात व तैमुर पातशाहाचे नाव बुडवितात असे जाहले आहे. अस्मानी किताब म्हणजे कुराण. ते ईश्वराची वाणी आहे. त्यात आज्ञा केली ती ईश्वर जगाचा किंवा मुसलमानांचा आहे. वाईट अथवा चांगले असो, हे दोन्ही ईश्वराचे निर्मित आहेत. कोठे मसजीद आहे त्याचे स्मरण करून बांग देतात कोठे देवालय आहे तेथे घंटा वाजवितात. त्यास कोणाचे धर्मास विरोध करणे हे आपले धर्मापासून सुटणे व ईश्वराचे लिहिले रद्द करून त्याजवर दोष ठेवणे आहे याविषयी चांगले अगर वाईट जे पाहावे त्यास रद्द करू नये पदार्थाची निंदा करणे हे पदार्थ करणारावर शब्द ठेवणे आहे. न्यायाचे मार्गाने पाहता जजिया पट्टीचा कायदा केवळ गैर पेशजी सुलतान अहमद गुजराथी हा असाच गैर चालीने वागला तो लवकरच बुडाला. त्यास या वृद्धापकाळी असे बद्ध होणे हे पराक्रमास अगदी योग्य नाही. येविषयी दृष्टांत जुलूम ज्याजवर जाला त्याणे खेद करून हाय हाय म्हणून मुखाने धूर काढल्यास त्या धुराने जितके लवकर जळेल तितके जलदीने जळता अग्नीही संमधास जाळणार नाही. अंतकरण पातकाने मलिन जाले ते स्वच्छ करावे ही चांगली सल्ला आहे. याजवर हिंदू लोकांस पीडा करण्यातच धर्म आहे असे मनामध्ये आले असल्यास आधी राजा राजसिंग यांजपासून जजिया घ्यावा म्हणजे इकडून कठीण नाही. उपरांत सेवेसी हजर आहे. परंतु गरीब अनाथ ते मुंग्या चिलटासारखे आहेत. त्यास उपसर्ग करण्यात काही मोठेपणा नाही. पदरची मंडळीही पाहता पाहता अग्नी तृणाने झाकतात, याचेही आश्यर्य वाटते. अस्तु. राज्याचा सूर्य हा प्रतापाचे उदयाचलापासून तेजस्वी असो.

❑❑❑

# संदर्भ आणि टिपा


१. सभासद कृष्णाजी अनंत, सभासदाची बखर (प्र. न. जोशी संपादित) पृ. २३-२४.

२. सरदेसाई गो. स, शककर्ता शिवाजी, पृ. २६ व ३६-३७.

३. सभासद कृष्णाजी अनंत, बखर, पृ. २५

४. उक्त, पृ. २६.

५. सभासद, कृष्णाजी अनंत, बखर, पृ. २६.
कुलकर्णी, अ. रा. शिवकालीन महाराष्ट्र, पृ. ७४-७५.

६. देशपांडे प्र. न. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, पृ. ४-५.

७. ९१ कलमी बखर (सं. बाकसकर) पृ. १४४.
Pagadi, S. Chhatrapati Shivaji, p. 292-93.

८. Sarkar J. N. Shivaji and his times, p. 365.

९. देशपांडे, प्र. न., छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, पृ. १९७-१९८.

१०. रामचंद्रपंत अमात्य, आज्ञापत्रे (सं. प्र. न. जोशी), पृ. ४३-४४.

११. देशपांडे, प्र. न., छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, पृ. १५७-५८.

१२. Pagadi, S., Chhatrapati Shivaji, 36-37.

१३. देशपांडे, प्र. न., छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, पृ. १४३.

१४. देशपांडे प्र. न., छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, पृ. १४६-४७.

१५. Pagadi S. Chhatrapati Shivaji, p. 287.

१६. पारसनिस, मराठे सरदार.

१७. पारसनिस, मराठे सरदार.

१८. Hasarat B. Dara Shikoh : Life and works, p. 260-68.

१९. शेजवलकर, त्र्यं. शं., श्री शिवछत्रपती, पृ. ५६१.

२०. राजवाडे, वि. का. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १७. पृ. १७.

२१. सरदेसाई गो. स., शककर्ता शिवाजी, पृ. ४०-४१.

२२. Grant Duff History of Marathas Vol. I, p. 129.

२३. Ather Ali The Mughal Nobility under Aurangjeb, p. 30-31.

२४. हिंदू-मुस्लिम तणाव व जमातवादाचा धोका, मागोवा प्रकाशन, पृ. ९

२५. शेजवलकर, त्र्यं. शं., श्री शिवछत्रपती, पृ. ३५६-५७
Pagadi, S., Chhatrapati Shivaji, p. 96.

२६. Mukhia, H. Medieval Indian history and Communal approach in Communilism and writing of Indian History, p. 34.

२७. केपन, मराठ्यांची बखर.

२८. रामचंद्रपंत अमात्य, आज्ञापत्रे, पृ. २७.

२९. सभासद कृ. अ. बखर. पृ. ३३.

३०. Pagadi S., Chhatrapati Shivaji, p. 39.

३१. देशपांडे प्र. न., छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, पृ. १९९-२००.

३२. गर्गे स. मा., औरंगजेब, जिझीया कर व शिवाजी महाराज, पृ. १५३-५५. Kamble B. R., Shivaji and his times.

३३. शेजवलकर त्र्यं. शं., श्री शिवछत्रपती, पृ. ५०२.

३४. Sarkar J. N. Shivaji and his times, p. 205-206 and 211-13.

३५. देशपांडे, प्र. न., छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, पृ. १६७

३६. सभासद, कृ. अ., बखर, पृ. ३३.

३७. Sarkar G. N., Shivaji & his times, p. 202-206.

३८. उक्त, पृ. २१४-११५.

३९. Pagadi S., Chhatrapati Shivaji, p. 69.

४०. फुले, जो. म., फुले यांचे समग्र वाङ्मय (सं. कीर व मालशे) पृ. ७-३८.

४१. पटवर्धन, स., बुंदेल्यांची बखर, पृ. १.

४२. सभासद, कृ. अ., सभासदाची बखर, पृ. २१.

४३. Bhavare N. G., Castes Fovours. Patronage and privileges under Shivaji's rule, in Kamble B. R. (Ed.) Shivaji and Times, p. 186-237.

४४. सभासद, कृ. अ., सभासदाची बखर, पृ. ६५.

❑❑❑

## शिवाजीवरील काही महत्त्वाचे ग्रंथ


१. प्रा. दि. वि. काळे, छत्रपती शिवाजी महाराज, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६१.

२. श्री. ए. ए. केळुसकर, श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र.

३. श्री. गो. स. सरदेसाई, शककर्ता शिवाजी, के. भि. ढवळे, मुंबई, १९३५.

४. श्री. अ. रा. कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७७.

५. श्री. वि. का. राजवाडे, ऐतिहासिक प्रस्तावना, चित्रशाळा प्रेस, पुणे.

६. श्री. लालजी पेंडसे, धर्म की क्रांती, लालजी पेंडसे, मुंबई, १९४२.

७. कॉ. एस. ए. डांगे, बारा भाषणे, अभिनव प्रकाशन, मुंबई, १९७५.

८. प्रा. दि. के. बेडेकर, संयुक्त महाराष्ट्र, चित्रशाळा प्रेस, पुणे १९४७.

९. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, शिवचरित्र, प्रस्तावना व आराखडा, मराठा मंदिर, मुंबई, १९६४.

१०. श्री. द. ग. गोडसे, शक्ती सौष्ठव, पॉप्युलर, मुंबई, १९७८.

११. श्री. द. ग. गोडसे, संमदे तलाश, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८०.

१२. प्रा. प्र. न. देशपांडे, शिवाजी महाराजांची पत्रे.

१३. श्री. शरद जोशी व इतर, शेतकऱ्यांचा राजा शिवाजी, शेतकरी प्रकाशन, रायगड.

१४. जयंत गडकरी, शिवाजी लोककल्याणकारी राजा.

१५. राजारामशास्त्री भागवत, मराठ्यासंबंधीचे चार बोल.

१६. प्रा. नरहर कुरुंदकर, शिवाजी महाराजांचे जीवन रहस्य.

१७. Sarkar J. N., Shivaji and his times, Orient Longman, Delhi, 1973.

१८. Sen S. N., The Administrative System of Marathas. Calcutta, 1925.

१९. Ranade M. G., The Rise of Maratha Power, Punalekar and sons, Bombay, 1902.

२०. प्रा. गं. बा. सरदार, संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती.

२१. Pagadi Setu Madhavrao, Chhatrapati Shivaji, Continental Publication, Pune, 1974.


❑❑❑


124298
31-3-08

I. I. A. S. LIBRARY

Acc. No.

This book was issued from the library on the date last stamped. It is due back within one month of its date of issue, if not recalled earlier.

CP&SHPS—519-I.I.A.S./2004-25-6-2004-20000.

"अनेकांच्या मनात वर्तमानकाळातील हिंदूविरोधी मुसलमान अशा प्रकारचा झगडा असतो. स्वत:च्या मनातील हा असत्य आणि अनुचित संघर्ष मागच्या इतिहासामध्ये पाहण्याची काहीजणांची धडपड असते. या दृष्टीने शिवाजीमहाराजांकडे हिंदूंचा राजा म्हणून पाहणे काहीजणांना आवडते. प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांच्या चरित्रात अशा धार्मिक संघर्षाला फारसा वाव नाही. ते स्वत: हिंदूधर्मीयांच्या धार्मिक राजवटीच्या निर्मितीसाठीं झगडत नव्हते. आपल्या राज्यात हिंदूंच्या धार्मिक आदेशांनुसार श्रुति-स्मृति-पुराणांना अनुसरून एक राज्य निर्माण करण्याची त्यांची इच्छाही नव्हती; तसा त्यांचा प्रयत्नही नव्हता. प्रत्यक्ष त्यांच्या स्वत:च्या आरमारात दर्यासारंग दौलतखान, इब्राहीमखान असे अनेक मुस्लीम अधिकारी होते. त्यांच्या फौजेत विजापूरहून आलेले सातशे पठाणही होते. त्यांनी स्वत: सर्व मुस्लीम धर्मसंस्थांना संरक्षण देण्याचा कसोशीने प्रयत्न केला. राजकारणाच्या पटावर औरंगजेबाविरुद्ध ते उभे होते, तरी त्यांनी औरंगजेबाला त्याचे पणजे अकबर बादशहा यांच्या थोरवीची आठवण करून दिली आहे. कुतुबशाहीशी त्यांचे संबंध पाय: प्रेमाचे आणि मित्रत्वाचे राहिले. या घटनेकडे आपण दुसऱ्या बाजूकडूनही पाहू शकतो. त्यांना आयुष्यभर ज्या वतनदारांविरुद्ध लढावे लागले ती नुसती त्यांच्या धर्माची माणसे नव्हती, तर त्यांच्या सोयरसंबंधातील माणसे होती. घोरपडे, निंबाळकर, जाधव, सावंत, सुर्वे असे अनेक वतनदार नेहमीच त्यांच्याविरुद्ध राहिले. शिवाजीमहाराजांविरुद्ध त्यांच्याच धर्मातील वतनदार का राहिले, या प्रश्नाचे उत्तर आणि लक्षावधी जनतेने त्यांना ईश्वरी अवतार म्हणून का पाहिले, या प्रश्नाचे उत्तर एकच आहे."

**नरहर कुरुंदकर, छत्रपती शिवाजी महाराज जीवनरहस्य**

"आलमगीर औरंगजेब हा आपल्या काळातला कुशल सेनापती, युद्धनीतितज्ज्ञ आणि मुत्सदी असा राजा होता. इ.स.१६८१ मध्ये आपल्या लक्षावधींच्या फौजा घेऊन औरंगजेब जेव्हा दक्षिणेत उतरला त्या वेळी त्या संघर्षाचे स्वरूप आशयाच्या दृष्टीने धार्मिक नव्हते. एक तर औरंगजेबाच्या फौजेत अक्षरश: लाखांनी मोजावे लागेल एवढे मोठे प्रमाण हिंदू सैन्याचे होते. औरंगजेबाच्या फौजेत असणाऱ्या हिंदूंना हा लढा दोन धर्मांच्यामधील आहे असे वाटलेले दिसत नाही. स्वत: औरंगजेबसुद्धा मराठ्यांच्या राज्याबरोबर आदिलशाही व कुतुबशाही ही दोन मुस्लीम राज्ये नष्ट करण्याचे ठरवून आलेला होता! मुसलमान आदिलशाहा व कुतुबशाहा आणि हिंदू संभाजी एका बाजूला आणि मुसलमान औरंगजेब, त्याचे लाखो हिंदू सैनिक व शेकडो हिंदू सरदार दुसऱ्या बाजूला असा हा संघर्ष होता. हा दोन धर्मांच्यामधील संघर्ष नव्हता. तरीही औरंगजेब या संघर्षात यशस्वी होऊ शकला नाही."

**नरहर कुरुंदकर, छत्रपती शिवाजी महाराज जीवनरहस्य**

Library IIAS, Shimla
MR 891.46 P 195 S
00124298

आदिलशहाचे सरदार - शहाजी महाराज
शिवाजीचा आरमार प्रमुख - दौलतखान
शिवाजीचा खास नोकर - मदारी म्हेतर
अफजलखानाचा वकील - कृष्णाजी भास्कर
शिवाजीचा वकील - काजी हैदर
औरंगजेबाचा सरदार - मिर्झाराजे जयसिंग
शिवाजीचा तोफखाना प्रमुख - इब्राहीम खान
स्वामीनिष्ठा की धर्मनिष्ठा?
'लांड्या' बजाजीस मुलगी दिली.
मुसलमान नेताजीस हिंदू केला.

शिवा न्हाव्याने शिवाजीस वाचवले
"होता जिवा - म्हणून वाचला शिवा"

"रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये"
"झाडे म्हणजे रयतेची लेकरे"

जमीन मोजली.
वनने देण्यास विरोध.
वसूल ठरवून दिला.
दुष्काळात वसूल माफ.

क्षत्रिय कुलवंतस?
कुलवाडी भूषण?

भवानी तलवार कुठून आली?

गोब्राह्मण प्रतिपालक?
हिंदू धर्मरक्षक?
मुस्लीम धर्मद्वेष्टा?
हिंदू पतपातशहा?

"कुणाही स्त्रीस बटकीण करू नका"
"गायी, शेतकरी व स्त्रिया
यांना तोबीस नको."
"अशीच आमुची आई असती..."

शूद्र?
किल्लेदार - महार
हेरप्रमुख बहिर्जी - रामोशी
आरमार सरदार - मायनाक भंडारी

Library IIAS, Shimla
MR 891.46 P 195 S
00124298